# Tulasi Mahatmyam Marathi

# तुळशीमाहात्म्यं मराठी

## Document Information

Text title : Tulasi Mahatmyam Marathi

File name : tulasImAhAtmyammarAThI.itx

Category : devii, devI, tulasI, mAhAtmya

Location : doc_devii

Transliterated by : Rushikesh Ghatole

Proofread by : Mandar Puranik mandar.prog at hotmail dot com

Latest update : July 7, 2026

Send corrections to : sanskrit at cheerful dot c om

This text is prepared by volunteers and is to be used for personal study and research. The file is not to be copied or reposted without permission, for promotion of any website or individuals or for commercial purpose.

**Please help to maintain respect for volunteer spirit.**

Please note that proofreading is done using Devanagari version and other language/scripts are generated using **sanscript**.

July 14, 2026

*sanskritdocuments.org*

# तुळशीमाहात्म्यं मराठी

श्रीगणेशाय नमः । श्रीगुरुभ्यो नमः ।
अथ तुळसीमाहात्म्यप्रारंभः ।

## १. प्रथमोऽध्यायः

श्रीगणेशाय नमः ।
श्रीगणेशासीं नमन । ज्याचे ठाईं नाहीं भिन्नपण ।
जो दुमदुमीत परिपूर्ण । सर्वां ठाई ॥ १॥

नमस्कार ऐसिया गणेशा । ज्याच्या कृपेनें अंधकार पावे नाशा ।
स्मरणमात्रें ज्ञानप्रकाशा । पावे देखा ॥ २॥

प्रसंगी त्यासीं प्रार्थुनी । वक्ता विनवी जोडून पाणी ।
तुळसीमाहात्म्य वदवीं वदनीं । श्रीगणेशा तूं ॥ ३॥

आतां नमू ते शारदा । जीपासुनी पाविजे कवित्वपदा ।
क्षणमात्रे गर्भांधा । ज्ञानदृष्टी देत जे ॥ ४॥

वक्ता म्हणे माझी विज्ञापना ऐसी । वदावें तुळसीमाहात्म्यासीं ।
तरी कृपा करून दीनासीं । सिद्धीतें पाववीं ॥ ५॥

आतां नमन श्रीगुरु ज्ञानदेवा । माझा संसार सुफळ करावा ।
जेणें पावेन परतीर ठेवा । ऐसें करीं स्वामिया ॥ ६॥

हा भवसिंधु तरावयासीं । भगवत्कथा वदवीं अहर्निशी ।
हेच मति द्यावी मज दीनासीं । कृपाळुवा ॥ ७॥

माझिये मनींची कल्पना ऐसी । कीं वदावें तुळसीमाहात्म्यासीं ।
हेचि विज्ञप्ती चरणासीं । देवाधिदेवा ॥ ८॥

श्रवण करितां श्रोते तृप्त होती । समाधान पाविजे संत महंतीं ।

ऐसें करीं कृपामूर्ती । देवराया ॥ ९॥

भातां श्रोतयांसीं हेच विनवणी । उदासता न धरावी मनीं ।
तुळसीमाहात्म्य ऐकतां श्रवणीं । महापातकें जातील ॥ १०॥

हा भवसिंधु तरावयासीं । श्रवण करावें तुळसीमाहात्म्यासीं ।
पवित्र होय महादोषी । श्रवणमात्रें ॥ ११॥

तुम्ही तरी जाणते श्रोते सज्जन । तुम्हां प्रार्थूं शके कोण ।
परी प्रसंगोचित आपण । तुम्हासी विनंति करीतसें ॥ १२॥

आतां मज द्यावे कृपादान । कथा ऐकावी सावधान ।
तुळसीमाहात्म्य करा श्रवण । महादोष जातील ॥ १३॥

स्कंदपुराणींची कथा । सावधान परिसावी आतां ।
दुश्चित्त न व्हावें श्रोता । म्हणोनी वक्ता विनवीतसे ॥ १४॥

नैमिषारण्यीं अठ्यायशी सहस्र । बैसले असती ऋषीश्वर ।
त्यांसी सूत सांगे सविस्तर । तुळसीमाहात्म्य हें ॥ १५॥

कोणे एके दिवशीं । इंद्र बैसला सभेसी ।
देवगुरु तयापासीं । बैसलासे ॥ १६॥

इंद्र म्हणे गुरु अवधारीं । बहुत पाप झालें पृथ्वीवरी ।
तरी लोकांसी तरणोपाय करीं । स्वामिराजा ॥ १७॥

ऐसी सांगावी कथा । जेणें तरणोपाय होय समस्तां ।
हरे भवरोगव्यथा । प्राणियांची ॥ १८॥

म्हणोनी बहुतप्रकारें । गुरूसी स्तविलें आदरें ।
मग सांगताझाला त्वरें । बृहस्पती इंद्रासीं ॥ १९॥

म्हणे ऐक गा वज्रधरा । जुनाटकथा श्रवण करा ।
श्रवणें पाविजे परत्रा । सर्वलोकीं ॥ २०॥

श्रीतुळसीचें महिमान । मज तों न वदवे जाण ।
ब्रह्मा कांहीं वढेल आपण । ऐसें कळों येतसे ॥ २१॥

मज तंव वदावया थोडी मती । किंचित सांगतों तुजप्रती ।
ऐसें इंद्रासीं बृहस्पती । बोलता झाला ॥ २२॥

आतां ऐक सावधान । सांगतों तुळसीचें महिमान ।
श्रवण करितां दोष दारुण । क्षणमात्रें दग्ध होती ॥ २३॥

प्रह्लाद इंद्रापासीं । बैसलासे त्या समयासीं ।
तेणेंही बृहस्पतीसीं । विनवणी केली ॥ २४॥

प्रह्लाद म्हणे देवगुरु । आम्हासीं तुमचा आधारू ।
तू बुद्धिवंत कृपासागरु । स्वामिनाथा ॥ २५॥

तरी कृपा करा आम्हावरी । तुळसीमाहात्म्य सांगा झडकरी ।
श्रवण करितां ये संसारीं । तरोनियां जाइजे ॥ २६॥

इंद्र प्रह्लाद त्या समयासीं । विनविते झाले बृहस्पतीसी ।
गुरु सांगता झाला तयांसीं । तें आईका जी ॥ २७॥

गुरु म्हणे इंद्रासीं । तुवां अनुष्ठान केलें तुळसीपासीं ।
म्हणोनी वधिलें राक्षसांसीं । सत्य जाणपां ॥ २८॥

दैत्य मारून पावलासी जय । ऐसें अनुष्ठानाचें महिमान आहे ।
आणीक सांगतों तें हें । ऐक चित्त देऊनी ॥ २९॥

प्रह्लादे तुळसीचें अनुष्ठान । यथासांग केलें आपण ।
म्हणोनी पावला संपूर्ण । राज्य दैत्यांचें ॥ ३०॥

मंगळे केलें तुळसीचें अनुष्ठान । म्हणोनी पावला भूमीचें अधिष्ठान ।
भूमिपुत्र म्हणती संपूर्ण । लोकत्रयीं ॥ ३१॥

तुळसीकाष्टाचे गंध श्रीपती । भावें करूनि भाळीं लाविती ।
त्याचे ठाई परम प्रीती । भगवंताची ॥ ३२॥

कंठी तुळसीमाळा घाली । यज्ञसूत्री असे बांधिली ।
कर्णी शिरीं असे धरिली । माळा देखा ॥ ३३॥

ऐशा माळा घालूनि ठाई ठाई । नित्य जप करितां पाहीं ।
अनंतफळ भोगी तोही । अश्वमेधांचें ॥ ३४॥

आणीक तो पावे परंधाम । पुन्हा त्यासीं नाहीं जन्म ।
तुटे त्याचा भवभ्रम । संसारींचा ॥ ३५॥

पत्र पुष्प फळ तोय । जेणें तुळसीची पूजा करिताहे ।
तो परम पावन होय । लक्ष्मीवंत ॥ ३६॥

द्वारीं तुळसीचें झाड असे । त्यासी पत्र पुष्प कांहींच नसे ।
तरी पूजावें उल्हासें । संशय मानसीं न धरावा ॥ ३७॥

प्राणी जालिया गतप्राण । तुळसीकाष्ठे जरी होय दहन ।
तरी तो निःपाप आपण । सर्वपाप दहन झाले ॥ ३८॥

प्रेतासीं घालोनि तुळसीमाळा । कीर्तन करीत नेला दहनस्थळा ।
त्याच्या पातकाचा मेळा । पळे देखा ॥ ३९॥

हस्ती देखोनि सिंहासीं । पलायन करी दूरदेशीं ।
तैसा प्राणियाच्या पातकासीं । पळ सुटताहे ॥ ४०॥

संपूर्ण दहन करावयासीं । इतुकी काठे मिळतील कैसीं ।
ऐसी आशंका धराल मानसीं । तरी तेंही ऐकावें ॥ ४१॥

एक तुळसीकाष्ठ घाली । तेणें अवधींच तुळसीकाष्ठें झालीं ।
ऐसें कल्पोनि तये वेळीं । एकतरी काष्ठ घालिजे ॥ ४२॥

त्या दहनांतून अग्नी घेऊन जाय । आणि होम करिता होय ।
तरी एका होमें आठांचें पाहे । श्रेय येईल ॥ ४३॥

तुळसीकाष्ठाचे चूर्ण । अग्नीवरी घाली आपण ।
धूप म्हणोनीयां जाण । श्रीहरीसी समर्पी ॥ ४४॥

त्यासी शतयागांचें पुण्य । सहस्त्र घडलीं गोदानें ।
हा संशय न धरावा मनें । पुराणीं पाहा ॥ ४५॥

तुळसीकाष्ठ उजळोनी । तो दीप लावी श्रीहरीलागुनी ।
तरी सहस्त्रदीप उजळिले ऐसें मनीं । श्रीहरी मानिता होय ॥ ४६॥

नैवेद्यावरी प्रोक्षिजे तुळसीतीर्थ । तुळसीपत्र घालिजे नैवेद्यांत ।
तरी त्याच्या पुण्यासी नाहीं मित । तो नैवेद्य देवासीं बहुप्रिय ॥ ४७॥

ऐसा नैवेद्य समर्पी भगवंता । त्याच्या पुण्यास नाहीं साम्यता ।
ऐसें जाण तत्वतां । निश्चयेंसीं ॥ ४८॥

तुळसीतळींची मृत्तिका घेऊन । सप्त वर्षे करी अंगासीं लेपन ।
त्या पुण्याचें फळ न सांगवे जाण । तें अगाध पैं ॥ ४९॥

तुळसी काष्ठ उगाळून । त्याणें करीतसे तर्पण ।

तरी पितृगण संपूर्ण । संतुष्ट होती ॥ ५०॥

गरुडावरी बैसोन । वैकुंठासी जाती आपण ।
ऐसें घ्राणाचें महिमान । असे देखा ॥ ५१॥

तुळसीकाष्ठ उगाळून । पितृगणासीं लावी आपण ।
तरी अष्टश्राद्धे केलीं जाण । येके श्राद्धें ॥ ५२॥

श्राद्धकाळी तुळसीकाष्ठाचा होम करी । तरी पितृगण तृप्त स्वर्गीतरीं ।
ऐसी काष्ठगंधाची थोरी । असे जाण ॥ ५३॥

तुळसीकाष्ठ उगाळून । शाळिग्रामासीं चर्चून ।
त्याच गंधे आमंत्रण । ब्राह्मणांसी करावें ॥ ५४॥

ऐसे अवघे ब्राह्मण । श्राद्धी सांगे आपण ।
तरीच त्याचे पितृगण । तृप्त होती ॥ ५५॥

त्यासीं घडे अश्वमेधाचें पुण्य । याविषयीं संशय न धरावा जाण ।
हें तुळसीचें महिमान । अगाध असे ॥ ५६॥

जयाच्या द्वारीं तुळसीवृंदावन । तयासीं लक्ष्मीचें काय उणें ।
स्वयें नारायण आपण । वसे तेथे ॥ ५७॥

तुळसीविरहित नारायण नसे । ऐसें पुराणीं बोलिलें असे ।
म्हणोनी धन्य धन्य ते पुरुष । जे नित्य तुळसी पूजिती ॥ ५८॥

भाव धरोनियां मनी । हा ग्रंथ पडे जैं श्रवणीं ।
तैं पापा होय धुणी । मद्मपुराणी हे ख्याती ॥ ५९॥

दुःस्वप्न देखिलिया वरी । कारागृहीं पडे त्या अवसरी ।
व्याधी प्राप्त झालिया शरीरीं । या अध्यायाचा जप करावा ॥ ६०॥

ऐसें नित्यनेमी चैव । ग्रहण पंचपर्व ।
जप करावा धरोनि भाव । निश्चयेंसीं ॥ ६१॥

अपस्मारादि प्राणसंकट । प्राण होतां जप करावा एकनिष्ठ ।
अवघें वारील संकट । ऐसें महिमान तुळसीचें ॥ ६२॥

हा अध्याय श्रवण करील अंतकाळीं । त्यासी नाहीं जन्मावळी ।
जन्म मृत्युसी टाळी । तुळसादेवी ॥ ६३॥

ऐसा धरून विश्वास । श्रवण करावें तुळसी माहात्म्यास ।
तरी हरती महादोष । विठ्ठलदास रुद्र म्हणे ॥ ६४॥

इति श्रीस्कन्दपुराणे तुळसीमाहात्म्ये प्रथमोऽध्यायः ॥ १॥

## २. द्वितीयोऽध्यायः

श्रीगणेशाय नमः ।
कित्येकांचा भाव ऐसा मनीं । कीं महाराष्ट्र नायकावें कानीं ।
एका संस्कृतावांचूनी । ऐकूनये ॥ १॥

तरी बीजावीण वृक्ष वाढेल कैसा । पायावीण भिंती चढेना सहसा ।
ग्राम नसतां सिंवेस कैसा । ठाव असे जी ॥ २॥

संस्कृताची टीका महाराष्ट्र । ऐसा असे हा विचार ।
स्पष्ट विकल्प टाकोनि दूर । नष्ट श्रवण कीजे ॥ ३॥

मत मतांतरें उदंड असती । परी एकात्मता धरावी चित्तीं ।
भावें तुळसीमाहात्म्य श्रवण करिती । तरी इच्छिलें पावती नरनारी ॥ ४॥

आतां असो हे आडकथा । कथेचे अनुसंधान चालवीं आतां ।
म्हणोनी झाला बोलता । श्रोता वक्तयासी ॥ ५॥

होजी म्हणोनी वक्ता म्हणे । आतां कथेसीं अवधान देणें ।
एकचित्तें श्रवण करणें । हें तुळसीमाहात्म्य ॥ ६॥

प्रह्लाद आणि इंद्रासीं । बृहस्पती सांगे उभयतांसी ।
कथा ऐकावी ऐसी । सांगतों तुम्हाप्रती ॥ ७॥

इंद्रासीं देवगुरु म्हणे । हरिहर एकचि प्रतिमा जाण ।
भिन्नता धरावी आपण । हृदयामाजी ॥ ८॥

जो हरी तोचि हर । ऐसा मानावा निर्धार ।
शंकराची ही पूजा निरंतर । करीतजावी ॥ ९॥

आषाढीपासून कार्तिकीद्वादशी । सहस्त्र बेलपत्रे वाहावीं शिवासीं ।
तरी त्याची फळश्रुती ऐसी । ऐका तुम्ही ॥ १०॥

दरिद्राचा तात्काळ नाश । ज्ञानाचा होय प्रकाश ।
विद्या प्राप्त होय अनायासें । सत्य जाणा ॥ ११॥

भाद्रपदशुक्लचतुर्दशीस । ऐसें आचरण करावें पुरुषे ।
तें सांगतों तुम्हांस । सावधान ऐकावें ॥ १२॥

सहस्त्र बेलपत्रे सहस्त्र दूर्वा । त्यादिवसीं वाहाव्या केशवा ।
समर्पाव्या देवाधिदेवा । विष्णुनामें ॥ १३॥

त्यासीं आत्मप्राप्ती होय । उत्तम नक्षत्र होऊनि राहे ।
पुण्य सरलिया जन्मास ये । भाग्यवंताचे पोटीं ॥ १४॥

रामनवमी विजयादशमी । पौर्णिमा वैशाखी ज्येष्ठशुद्ध पंचमी ।
आश्विनशुद्ध नवमी । ऐसिया तिथी जाण पां ॥ १५॥

कार्तिकीपौर्णिमा मार्गशीषीं । मकरसंक्रांत रविवारासीं ।
पूजन करावें तें परियेसीं । सांगतों तुम्हा ॥ १६॥

शतदूर्वा संपूर्ण । तोडून घ्याव्या आपण ।
सहस्त्र तुळसी मंजिऱ्या निवडून । घ्याव्या देखा ॥ १७॥

मंजिऱ्या घ्यावयाची युक्ती । ते सांगतों तुम्हाप्रती ।
तें सावधान चित्तीं । ऐका तुम्हीं ॥ १८॥

दोन पानें खालीं वरी मंजिरी । ऐशा तोडाव्या ते अवसरीं ।
मग दूर्वा आणि मंजिरी । विष्णूस समर्पाव्या ॥ १९॥

तरी सदा सर्वकाळ । यश पावे प्रबळ ।
तयासी संतुष्ट गोपाळ । सर्वकाळ होतसे ॥ २०॥

एकादशीस करावें जागरण । तुळसीवृंदावनीं हरिकीर्तन ।
तरी कोड जाय जाण । कर्त्या पुरुषाचें ॥ २१॥

तुळसीचें भावें पूजन । पार्वतीनें केलें आपण ।
मग शंकरप्राप्ती झाली जाण । तुळसीकृपेनें ॥ २२॥

सावित्रीने केलें तुळसी पूजन । ब्रह्मदेवा पावली आपण ।
ऐसें तुळसादेवीचें महिमान । आहे देखा ॥ २३॥

अरुंधती स्त्री वसिष्ठाची । सेवा करिती झाली तुळसीची ।
प्राप्ती झाली वसिष्ठाची । तये लागीं ॥ २४॥

रुक्मिणीसी पाहिजे कृष्णप्राप्ती । म्हणोनी तुळसी सेवा झाली करिती ।

तिचे कृपेनें झाली प्राप्ती । श्रीकृष्णाची ॥ २५॥

तुळसीचें अनुष्ठान । देव गुरूने केलें आपण ।
संजीवनी विद्या संपूर्ण । प्राप्तझाली ॥ २६॥

समुद्र उल्लंघावयातें । वायुपुत्रे केलें अनुष्ठानातें ।
मग चळ पावला पूर्णतें । पैलतीरा जावया ॥ २७॥

शेषानें तुळसीचें अनुष्ठान । बहुत केलें आपण ।
मग उर्वी मस्तकीं धरून । उचलिली ॥ २८॥

राज्य पावला नागलोकींचें । ऐसें महिमान तुळसीचें ।
गुरु सांगे आपुले वाचे । इंद्रादिप्रह्लादांसीं ॥ २९॥

श्रीरामें केलें अनुष्ठान । तुळसीप्रसन्न झाली आपण ।
वर दिला संपूर्ण । श्रीरामासीं ॥ ३०॥

रावण कुंभकर्णांचें निर्दाळण । रामा तूं करिसील जाण ।
जय पावसील संपूर्ण । युद्धसमयीं ॥ ३१॥

गणेशाने केली सेवा । प्राप्त झाला चतुर्दशविद्येचा ठेवा ।
गजा सुराचा प्राण घ्यावा । ऐसा वर दीधला ॥ ३२॥

कार्तिकस्वामी आपण । करिता झाला तुळसीचें आराधन ।
वर पावोनियां तेणें । तारकासुर वधियेला ॥ ३३॥

नंदिकेश्वर आपण । करिता झाला आराधन ।
तात्काळ झाला वहन । श्रीशंकराचें ॥ ३४॥

तुळसीचे कृपेंकरून । क्षीरसागर केला प्राशन ।
शुभ्रवर्ण झाला तेणें । वरदें देखा ॥ ३५॥

वीरभद्रे तुळसीचें अनुष्ठान । करून केली सुप्रसन्न ।
वर मागोनियां आपण । दक्षाचे शिर तोडिलें ॥ ३६॥

तुळसीचें आराधन । शंकरें केलें आपण ।
मग वर पावोन जाण । त्रिपुर मारिला ॥ ३७॥

गरुडें केलें अनुष्ठान । वर पावला परिपूर्ण ।
मग उल्लंघिता झाला जाण । सप्तसमुद्र ॥ ३८॥

वरदानें नागकुळ मारिता झाला । अमृतासी घेऊनि आला ।
स्वयें विष्णूचा होऊनि ठेला । वहन देखा ॥ ३९॥

अष्टलोकपाळ निर्मळ । अनुष्ठान करिते झाले तात्काळ ।
मग अष्टदिशाधिपती सकळ । होऊनि ठेले ॥ ४०॥

सरस्वती आपण । करिती झाली आराधन ।
वर पावोनियां जाण । त्रिभुवन व्यापिलें ॥ ४१॥

तुळसीचें अनुष्ठान । दुर्गादेवीने केलें आपण ।
वर पावोनि वधिले कोण । ऐका नामें तयांचीं ॥ ४२॥

चंड मुंड महिषासुर । मारिती झाली सत्वर ।
निर्दाळूनियां असुर । विजयी झाली ॥ ४३॥

मार्कंडेय ऋषीनें केलें अनुष्ठान । चतुर्दश कल्पें आयुष्य पावला जाण ।
ऐसें महिमान । तुळसादेवीचें ॥ ४४॥

रंभेनें केलें पूजन । देवांगना झाली वरें करून ।
देवसभेसीं असे जाण । अद्यापि वरी ॥ ४५॥

ऐसें जेणें केलें अनुष्ठान । त्याचे मनोरथ झाले पूर्ण ।
आतां पत्रे न तोडावीं जाण । ते तिथिवार ऐकावे ॥ ४६॥

संक्रांति द्वादशी शुक्रवार । रवि भौम व्यतिपात साचार ।
या दिवसीं तुळसीपत्र । सहसाही तोडूंनये ॥ ४७॥

जे पत्रे तोडिती तये दिवसीं । ब्रह्महत्या घडे त्यांसी ।
संशय न धरावा मानसीं । पुराणीं पाहा ॥ ४८॥

माघद्वादशीस पूजा घडे । तरीं अश्वमेधाचें पुण्य जोडे ।
चुके संसारसांकडें । ऐसें पुराण बोलतसे ॥ ४९॥

अर्धोदयीं रविवारीं । माघमासीं स्नानकरी ।
तुळसी मृत्तिका लाऊन जरी । सर्वांगासीं ॥ ५०॥

तरी त्याचीं तीन कुळें उद्धरती । हें यथार्थ जाणावें समर्थी ।
विकल्प न धरावा चित्तीं । हें पुराणीं बोलिलें ॥ ५१॥

फाल्गुनीपौर्णिमा दशमी अमा । द्वादशीस घेतलें नेमा ।
पूजा करोनी पुरुषोत्तमा । संतुष्ट कीजे ॥ ५२॥

दीप लाऊनि रात्रीसीं । नैवेद्य समर्पावा तुळसीसीं ।
ऐसें केलिया नेमेसीं । जन्म मृत्यु तया नाहीं ॥ ५३॥

चैत्रमासीं पूर्णिमेसीं । पायसान्न भोजन ब्राह्मणासीं ।
संतुष्ट करावें वृंदावनापासीं । तरी सिद्धि प्राप्त होती ॥ ५४॥

अक्षय्य तृतीयेचें दिवसीं । तुळसीवृंदावनीं बाह्मणांसीं ।
दध्यन्नभोजन घालावे त्यांसीं । तरी तो वासव लोकासीं जाय ॥ ५५॥

ज्येष्ठदशमी पासून द्वादशी पर्यंत । ब्राह्मणभोजन जे घालित ।
तेणें परमेश्वर तृप्त । होय देखा ॥ ५६॥

आषाढीपासोनि कार्तिकीपर्यंत । पूजा करावी नेमस्त ।
चळों न द्यावें व्रत । निश्चयेंसीं ॥ ५७॥

धनधान्य पावती नर नारी । स्वपुरुषेसीं राज्य करी ।
अंतकाळीं मोक्ष पावती निर्धारी । नारी नर ॥ ५८॥

जयंतीस अर्धरात्रीं । पूजा करिती नर नारी ।
पुत्र होती आणि संसारीं । तरोनि जाती ॥ ५९॥

गजछाया पडेल जे दिवसीं । ब्राह्मणभोजन घाली वृंदावनापासीं ।
नैवेद्य समर्पूनि तुळसीसीं । पूजा करी ॥ ६०॥

तुळसी वृंदावना सेजारीं । हिरण्यश्राद्ध करी तेच अवसरी ।
पितृगण तृप्त होती तरी । सहस्त्र संवत्सर ॥ ६१॥

माघनवमीचे दिवसीं । भोजन घालावें अष्ट सुवासिनीसी ।
तुळसी वृंदावनीं त्यांसी । तृप्त करावें ॥ ६२॥

तरी वंध्या होय पुत्रवंती । ये विषयीं संशय न धरावाचित्तीं ।
प्रह्लादाप्रति बृहस्पती । सांगताहे ॥ ६३॥

चातुर्मासी संध्याकाळीं । दीप लावी तुळसी जवळी ।
नेम टळों नेदी कदाकाळीं । तरी याची फळश्रुती ऐकावी ॥ ६४॥

दीप लाऊन समर्पावा नैवेद्य । तेणें तृप्त होयपरमानंद ।
नैवेद्य दीपाचें फळ प्रसिद्ध । ऐसें असे ॥ ६५॥

अष्ट महासिद्धी प्राप्त होती । चिंता जाईल दिगंतीं ।

संशय न धरावा चित्तीं । हें बोलती पुराणें ॥ ६६॥

मकरसंक्रांति पौषमासी । गाईची पूजा करील ते दिवसीं ।
तो जाय स्वर्गलोकासी । सत्य जाणा ॥ ६७॥

हरिवासरी जागरण । तुळसीजवळी करावें आपण ।
धूप दीप नैवेद्य समर्पण । पूजा करावी ॥ ६८॥

तेणें पावे सायुज्यता मुक्ती । होईल केल्या शीघ्र प्राप्ती ।
ऐसें बोलिला ग्रंथीं । देवगुरु ॥ ६९॥

सूत सांगती ऋषीश्वरांस । गुरु सांगती इंद्रप्रह्लादांस ।
तेचि कथा सांगीतली तुम्हांस । विठ्ठलदास रुद्र म्हणे ॥ ७०॥

इति श्रीस्कन्दपुराणे तुळसीमाहात्म्ये द्वितीयोऽध्यायः ॥ २॥

## ३. तृतीयोऽध्यायः

श्रीगणेशाय नमः ।
हा अध्याय करितां श्रवण । तरी आयुष्य होय संपूर्ण ।
सर्वरोग हरे जाण । निश्चयेंसी ॥ १॥

ऐश्वर्य पावे आपण । अंतकाळीं विष्णुपद प्राप्त जाण ।
ऐसें बोलिलें आपण । वगुरु ॥ २॥

इंद्र प्रह्लाद अमरावती । उभयतां बैसले असती ।
देवगुरु तयांप्रती । तुळसीहामात्म्य सांगताहे ॥ ३॥

सूर्यवंशी राजा दशरथ जाण । तो निपुत्रिक असे बहुत दिन ।
बहुत कष्टी होतसे जाण । पुत्राकारणें उभयतां ॥ ४॥

जळो जळो हें सुख । निपुत्रिकाचें पाहों नये मुख ।
पुत्राविण मज होतसे दुःख । तें काय सांगूं कौसल्ये ॥ ५॥

निपुत्रिकाचें अन्न । नवेती भले सज्जन ।
निपुत्रिकाचें वदन । अवलोकन करूं नये ॥ ६॥

म्हणोनीयां मज निंदिती जगीं । यालागी हळहळ होतसे आंगीं ।
ऐसें बोलोनि ते प्रसंगीं । दुःखित जाहला ॥ ७॥

बहुत शोक केला रायें । तयासी कौसल्या बोलत आहे ।
म्हणे कांहीं करावा उपाय । पुत्रप्राप्तीचा ॥ ८॥

शोक केलियानें सार्थक काय । ऐसा कहीं करावा उपाय ।
जेणें कार्यसिद्धि होय । तो विचार करावा ॥ ९॥

तुम्ही तो राया सर्वज्ञ । मी काय बोलूं अज्ञान ।
ऐसें ऐकोनियां वचन । राव बोलता जाहला ॥ १०॥

म्हणे मी पुत्र न देखें निभ्रांत । तुज कांहीं उपाय असेल सुचत ।
तरी मज करावा श्रुत । येसमयीं ॥ ११॥

परिसोन रायाचें वचन । कौसल्या बोले जाण ।
म्हणे राया चित्त देऊन । परिसा तुझी ॥ १२॥

श्रीभगवंतासी जावें शरण । सेवा करावी आपण ।
तो झालिया सुप्रसन्न । सर्वमनोरथ पुरतील ॥ १३॥

जगदीशा वेगळा कोण दाता । हें सत्य निज तत्वतां ।
म्हणोनीयां आतां । हरिसेवा करावी ॥ १४॥

परिसोनि कौसल्येचें वचन । रायास मानलें प्रमाण ।
म्हणे धन्य धन्य तुझें ज्ञान । उत्तम उपाय सांगीतला ॥ १५॥

मग रायें एकनिष्ठा धरूनी । बैसता झाला एकासनीं ।
हरिस्मरण करी मनी । राजा दशरथ ॥ १६॥

तंव अकस्मात भगवंत । देखिला से मूर्तिमंत ।
शंखचक्र गदापद्मसंयुक्त । देखिलें श्रीहरीसी ॥ १७॥

पीतांबर परिधान केला । कर्णी कुंडलांचा झळाळा ।
चतुर्भुज घनसांवळा । भेटता झाला वेगेंसीं ॥ १८॥

हरि म्हणे दशरथासी । इच्छा काय आहे मानसीं ।
राजा म्हणे पुत्र माझा होसी । तरी माझी इच्छा पुरेल ॥ १९॥

बहुत बरवें हरि म्हणे । तुझा पुत्र मी स्वयें होईन ।
परी सांगतों तें करणें । राया दशरथा ॥ २०॥

म्हणे दशरथा परियेसीं । अनुष्ठान करीं तुळसीपासीं ।
एक संवत्सर अनुष्ठानासीं । करीं राया ॥ २१॥

संतुष्ट होऊन तुळस । पुत्र देईल तुम्हांस ।
ऐसें सांगून हृषीकेश । मागुती गुप्त जाहले ॥ २२॥

राये सांगीतलें कौसल्येसीं । दोघे अनुष्ठान करती तुळसीपाशी ।
राहिले नित्यनेमेंसीं । एक संवत्सर ॥ २३॥

मग तुळसादेवी होऊन सुप्रसन्न । रायासीं दिधलें वरदान ।
चारपुत्र होतील जाण । राया दशरथा ॥ २४॥

ऐकोनि तुळसीचें वरदान । रायाचें संतोषलें मन ।
सांग करूनी पूजार्चन । व्रत समाप्त केलें तें ॥ २५॥

पुढें दशरथासी झाले चारपुत्र । राजाधिराज श्रीरामचंद्र ।
जो नरांमध्यें नरेन्द्र । देवाधिदेव ॥ २६॥

लक्ष्मण भरत शत्रुघ्न । ऐसे चवघे झाले निर्माण ।
देखोनी हरला शीण । राया दशरथाचा ॥ २७॥

ऐसें अनुष्ठान करितां । प्रचीत आली दशरथा ।
सद्भावें तुम्ही आचरतां । अनुभव त्वरित येईल ॥ २८॥

ऐसें तुळसीचें महिमान । गुरु सांगे आपण ।
इंद्रप्रल्हाद परिसती जाण । आनंदें करूनी ॥ २९॥

स्कंदपुराणींचें बोलणें । तुळसीमाहात्म्य परिसणें ।
हा अध्याय करितां श्रवण पठण । आरोग्य करी सर्वदा ॥ ३०॥

क्षत्रिय युद्धी पावे जय पूर्ण । वैश्य पठण करितां जाण ।
तुळसीमाहात्म्येंकरून । धनधान्य प्राप्त होय ॥ ३१॥

ब्राह्मणासीं प्रसन्न जालिया होय ज्ञान । शूद्रासी मुक्तिमुक्ति पावन ।
स्त्रियांसीं सौभाग्यवर्द्धन । श्रवणमात्रें होय देखा ॥ ३२॥

आयुरारोग्य होय अवधियांस । आयुष्यवर्धमान तयांस ।
ऐसें फळ असे विशेष । तृतीयाध्यायाचें ॥ ३३॥

लक्ष्मी होय परिपूर्ण । अंतीं विष्णुपद प्राप्त जाण ।
म्हणोनी हा अध्याय पठण । सर्वत्रांहीं करावा ॥ ३४॥

देवगुरूनें सांगितलें ऐसें । तेंचि श्रोतियांसीं सांगतसें ।

उदास न करावी मानसें । विठ्ठलदासरुद्र म्हणे ॥ ३५॥

इति श्रीस्कन्दपुराणे तुळसीमाहात्म्ये तृतीयोऽध्यायः ॥ ३॥

## ४. चतुर्थोऽध्यायः

श्रीगणेशाय नमः ।
सूत सांगे ऋषीश्वरांप्रती । इंद्र प्रह्लादां सांगे बृहस्पती ।
तेंचि कथा सकळश्रोतीं । प्रीतिकरूनी ऐकावी ॥ १॥

जयाचे द्वारीं नाहीं तुळसी वृंदावन । त्याचें गृह स्मशान जाण ।
त्यागृहीं न जावें आपण । बैसावयासीं ॥ २॥

द्वारीं असावें तुळसीवृंदावन । प्रातःकाळीं नमस्कार करावा आपण ।
सव्य घालोनियां जाण । कार्यासी जावें ॥ ३॥

जपमाळा घेऊन करीं । सोळा नावें निरंतरी ।
अनुष्ठान निर्धारी । जो करील कोणी ॥ ४॥

त्यासीं होय वैकुंठप्राप्ती । चिरकाळ राहे वैकुंठाप्रती ।
ऐसी ऐकून गुरूची वदंती । प्रह्लाद बोलता जाहला ॥ ५॥

प्रह्लाद म्हणे गुरुप्रती । सोळानावें कोणकोण असती ।
तीं सांगावीं मजप्रती । कृपामूर्ती कृपाळुवा ॥ ६॥

ऐकोनि प्रह्लादाचा प्रश्न । देवगुरु बोलता झाला आपण ।
सोळानामें संपूर्ण । ऐक आतां ॥ ७॥

तुळसीनाम एक । श्रीनाम दुसरें देख ।
तिसरें बोलिलें अवश्यक । म्हणा ऐसें ॥ ८॥

लक्ष्मीनाम चवथें । विद्या पांचवें नेमस्तें ।
यशश्री साहावें गणितें । केलें आहे ॥ ९॥

धर्माधर्मा माना । सातवें नाम जाणा ।
देवी आठवें म्हणा । नामें देवीचीं ॥ १०॥

देवदेवि ममप्रिये । नववें नाम जाणती स्वयें ।
लक्ष्मी नाम दशम होय । निश्चयेंसी ॥ ११॥

सखीनाम एकादश । शुभनामद्वादश ।
भूमिनाम त्रयोदश । जाणावें पै ॥ १२॥

अचळनाम चतुर्दश । अमिला नाम पंचदश ।
अमळानाम षोडश । ऐसीं नामें सांगीतलीं ॥ १३॥

याउपरी प्रह्लाद म्हणे स्वामी । हीं नामें सांगीतलीं तुम्ही ।
तीं परिसोनियां आम्ही । समाधान पावलों ॥ १४॥

आतां कृपा करून गोसावी । पुढें कथा चालवावी ।
हे विज्ञप्ति ऐकावी । गुरुवर्या ॥ १५॥

परिसोन प्रह्लादाचें विज्ञापन । गुरु सांगताझाला आपण ।
म्हणे चित्त देऊनि यां श्रवण । करावें पुढील कथेसीं ॥ १६॥

रुद्राक्षतुळसीचे मणी । माळा कीजे एकत्र मेळौनी ।
एके माळेंत मणी ओउनी । अष्टाक्षरी जप कीजे ॥ १७॥

सर्वपाप निरसन होय । ऐसा महिमा तयाचा आहे ।
जप केलिया पाहे । मनोरथ पूर्ण होती ॥ १८॥

तुळसीचा वारा प्रेतावरुनी जाय । तरी तो मुक्त होऊनि राहे ।
अंतीं फळ पावताहे । विष्णुलोक सायुज्यता ॥ १९॥

ऐसें सांगतां गुरूसीं । प्रह्लाद पुसताझाला तयासी ।
स्वामीनें कथा सांगीतली ऐसी । तरी उद्धार कोणाचा जाहला ॥ २०॥

तेंचि सांगावें मज रंका । श्रवण केलिया पुरे आशंका ।
ऐसें म्हणूनियां देखा । गुरुविनविला ॥ २१॥

गुरु म्हणे प्रह्लादासीं । तुवां प्रश्न केला ऐसियासीं ।
तेंचि कथा सांगतों तुम्हांसी । सावध ऐका ॥ २२॥

पौंड्रक नामा लुब्धक देखा । तो महापापी ऐका ।
संख्या नाहीं पातका । तयाचिया ॥ २३॥

उपजल्या दिवसापासूनी । पोट भरी नानाहिंसा करूनी ।
अखंड हिंडे जाय वनीं । श्वापदें मारावयासीं ॥ २४॥

प्रत्यहीं शतमृग मारी । परी त्याची नव्हे पोटभरी ।
मग दुसरा उपाय करी । तोही ऐकावा ॥ २५॥

वाटपाडी मार्गस्थांचा शिरच्छेद करी । त्यांची मात्रा घेऊन जाय घरीं ।
तयानें उदरपूर्ति करी । पौंड्रक कोळी तो ॥ २६॥

ऐसें करितां कोणे एके दिवसीं । कांहींच न मिळेसें झालें तयासीं ।
उपवास पडले त्यासीं । पांच देखा ॥ २७॥

अरण्याप्रती जंव जाय । तंव वनीं न मिळे तोय ।
यास्तव श्वापदें गेलीं पाहे । त्या अरण्यांतूनी ॥ २८॥

पक्षी मात्र गेले तेथूनी । मग कोळी आला परतोनी ।
पिता वधूनि त्याचें मांस वदनीं । घालिता झाला ॥ २९॥

पिता क्रमलिया ऐशापरी । मग माता वधूनि पोट भरी ।
तेहि क्रमलियावरी । स्त्री भक्षिली ॥ ३०॥

मग पुत्र भक्षिला तेणें । तीं समग्र भक्षून आपण ।
हिंडता झाला वनोवन । पूर्वस्थळें ॥ ३१॥

तंव तेथें व्याघ्र होता दरींत । निर्माण झाला अकस्मात ।
तेणें कंठी धरिला निमिषांत । तयासीं देखा ॥ ३२॥

मग प्राण गेला ते ठाई । तुळसीवरून वायु आला लवलाहीं ।
तो स्पर्शला पाहीं । महापापियासीं ॥ ३३॥

तुळसीचें पक्वपर्ण । वायुवेगें उडा लें जाण ।
त्या प्रेताच्या हृदयावरी जाऊन । पडिलें देखा ॥ ३४॥

मग यमदूत आले ते अवसरीं । त्यासीं नेलें यमपुरीं ।
उभा केला पुढारीं । यमधर्मापासीं ॥ ३५॥

यमें पाहूनि त्यासीं । मग पुसिलें चित्रगुप्तासीं ।
याची वर्तणूक आहे कैसी । किती पुण्य पाप ॥ ३६॥

चित्रगुप्त म्हणे स्वामी । हा जन्मापासून अधर्मी ।
पुण्याचे क्रियाकर्मी । प्रवर्त्तलाचि नाहीं ॥ ३७॥

याचें पाप बहुतचि असे । पुण्य तिळभरी नसे ।
सांगतां यम धर्मास ऐसें । क्रोध बहुतचि आला ॥ ३८॥

मग म्हणे दूतांसीं । आपला पराक्रम दाखवावयासीं ।

ताडण करा महापापियासीं । यमदूतहो ॥ ३९॥

ताडण करूनि यासीं । कुंभपाकी टाका त्वरेंसीं ।
तेथें कित्येक दिवस कासाविसी । होऊंदेणें ॥ ४०॥

मग सूकरयोनीसीं । जन्म घालावा यासीं ।
तो भोगिल्यावरी यासीं । पक्षियोनींत घालारे ॥ ४१॥

पक्षियांत कुश्चळ असती । तेथें घालावा याजप्रती ।
ऐसी आज्ञा करिती । यमरावो ॥ ४२॥

ऐसी आज्ञा होत पुरे । तों दूत विक्राळ झाले त्वरें ।
महाभयानक धरून शरीरें । ताडण करिते जाहले ॥ ४३॥

पाश अंकुश मुसळें । एकत्र करूनि मारिती बळें ।
ताडण करून तयेवेळे । कुंभपाकाजवळी नेला ॥ ४४॥

जो टाकावा कुंभपाकाभीतरीं । तंव ऐसी झाली नवलपरी ।
ते प्रह्लादा अवधारीं । चित्त देऊनी ॥ ४५॥

अंतरव्यापक श्रीहरी । त्यासीं कळलें अंतरीं ।
पौंड्रीक कुंभपाकाभी-तरीं । टाकावया पैं नेला ॥ ४६॥

मग महाराज होऊन कृपावंत । स्वयें दूतांसी आज्ञा करित ।
तुम्ही धांवा धांवा त्वरित । पौंड्रीक येथे आणावा ॥ ४७॥

यमदूतांपासुनी । बळेच घ्यावा आसडनी ।
युद्धासी आले तरी युद्ध करूनी । आणावा येथें ॥ ४८॥

ऐसी आज्ञा दूतांसीं । सांगता झाला हृषीकेशी ।
आज्ञा वंदूनि मस्तकासीं । दूत तेव्हां निघाले ॥ ४९॥

दूत येऊनी यमपुरीसीं । बोलते झाले यमदूतांसीं ।
आज्ञा आहे ऐसी । आमुचे स्वामीची ॥ ५०॥

हा पौंड्रीक आमुच्या हातीं द्यावा । आम्ही नेऊन भेटऊं देवा ।
तुम्ही अनमान न करावा । यमदूत हो ॥ ५१॥

यमदूत म्हणती त्यांसीं । जाऊनि पुसा यमापासीं ।
त्याची आज्ञा होईल आम्हासीं । तरी हा तुमच्या हातीं देऊं ॥ ५२॥

विष्णुदास म्हणती आम्हासीं । काय कारण पुसावयासीं ।
आम्ही बळेच नेऊं यासीं । हें सत्य जाणा ॥ ५३॥

यासीं आमुच्या हातीं देणें । तुम्ही आपुलें महत्त्व राखणें ।
नाहीं तरी युद्धकरणें । आम्हासीं तुम्ही ॥ ५४॥

ऐसें बोलोनि निकरीं । शस्त्र धरिते झाले करीं ।
मग यमदूत तये अवसरीं । युद्धासी प्रवर्त्तले ॥ ५५॥

परस्परें युद्ध झालें घोरांदर । भूमि कापिन्नली थोर ।
मग यमदूतांसी करोनिजर्जर । पौंड्रीक नेला तेवेळीं ॥ ५६॥

नेऊनियां वैकुंठासीं । भेटविला श्रीहरीसीं ।
आलिंगूनियां तयासीं । हरीनें सन्निध बैसविला ॥ ५७॥

तों यमदूत जाऊनि यमापासीं । दंड समर्पिले त्यासीं ।
म्हणती स्वामी आम्हासीं । परम पीडा जाहली ॥ ५८॥

विष्णुदूत येऊनि आपण । आम्हासीं युद्ध केलें दारुण ।
पौंड्रीक पापी नेला तेणें । वैकुंठासी ॥ ५९॥

परिसोन दूतांचें वचन । क्रोधायमान शाला सूर्यनंदन ।
मग चित्रगुप्ताकडे अवलोकून । क्रूरदृष्टीने पाहिलें ॥ ६०॥

म्हणे पुण्यावांचून वैकुंठासीं । नेणार नाहीं हृषीकेसीं ।
म्यां तुज पुसिलें ऐसियासी । त्वां सांगीतलें पुण्य नाहीं ॥ ६१॥

तरी सूक्ष्मदृष्टीने पाहणें । आणि याचा वृत्तांत मज सांगणे ।
सांगावया उशीर न करणें । अर्धपळ ॥ ६२॥

यमाची आज्ञा प्रमाण । चित्रगुप्त पाहे शोधून ।
तंव तिळाचा शतां शभाग जाण । पुण्यनिघालें ॥ ६३॥

चित्रगुप्त म्हणे यमासीं । तिळाचा शतांशभाग आहे यासीं ।
ऐसें ऐकतां चित्रगुप्तासीं । यम बोलता जाहला ॥ ६४॥

पहिलें कां नाहीं बोलिलासीं । आतां ऐसें सांगसीं ।
तरी पुण्य कोणते प्रकारचें तें आम्हासीं । सविस्तर श्रुत करीं ॥ ६५॥

चित्रगुप्त म्हणे यमासीं । तुळसबन होतें अरण्यासीं ।
ते स्थळीं देहत्याग घडला यासीं । सत्य जाणा ॥ ६६॥

वायु गेला तुळसीवरूनी । त्याचा स्पर्श झाला यालागुनी ।
गलित पत्र एक उडोनी । याचे हृदयीं पडियेलें ॥ ६७॥

इतुके पुण्य यासीं घडलें । म्हणोनी विष्णुदूतीं नेलें ।
ऐसें परिसतांच भरलें । कोषाचें भरतें मानसीं ॥ ६८॥

म्हणे याचें पुण्य तें किती । यासी वैकुंठीं जावया कैंची शक्ती ।
आतां जाऊनि विष्णुप्रती । त्याचा अधिकार नीरऊं ॥ ६९॥

मग होऊनी क्रोधायमान । यम चालिला आपण ।
विष्णुभुवनीं सूर्यनंदन । येता जाहला ॥ ७०॥

जंव आला विष्णूचे दारी । तंव वर्जिती वेत्रधारी ।
आज्ञे विरहित भीतरीं । नव जावें तुम्ही ॥ ७१॥

प्रविष्ट करूं समाचार । आज्ञेप्रमाणें जावें भीतर ।
ऐसें म्हणोनीयां स्थिर । यमासीं केलें ॥ ७२॥

यम बाहेर बैसविला । द्वारपाळीं समाचार श्रुत केला ।
मग दूतांसी आज्ञा करिता झाला । देवाधिदेव ॥ ७३॥

म्हणे यमासीं येऊ देणें । म्हणोनी आज्ञा केली नारायणें ।
मग द्वारपाळ सांगती येऊन । यमरायासी ॥ ७४॥

आज्ञा झाली तुम्हासीं । भीतरी जावें भेटीसीं ।
आलेति ज्या कार्यासीं । तें करोनि घेणे ॥ ७५॥

मग यम गेला भीतरीं । साष्टांग नमस्कार करी ।
तंव देखता झाला सामोरी । पौंड्रिकासी ॥ ७६॥

हरिसन्निध बैसलासे । यम दृष्टीनें देखतसे ।
मग कोषें बोलतसे । यम हरीसीं ॥ ७७॥

म्हणे हा परमचांडाळ पातकी । पासीं तुम्हीं आणिलें विष्णुलोकीं ।
आणुनियां सेखीं । आपुले सन्निध बैसविला ॥ ७८॥

हा तो परम चांडाळ । यासी आम्ही दंड करावा केवळ ।
तें नसतां येवेळें । यासीं पाठीसी घातलें ॥ ७९॥

पुरे तुमच्या अधिकारासीं । हा कार्यभाग सांगा आणिकासीं ।

ऐसें बोलोनि हातींच्या दंडासीं । पुढें ठेविलें ॥ ८० ॥

म्हणे देवाधिदेवा पुरुषोत्तमा । ब्रह्मादिकां न कळे महिमा ।
सर्वसाक्ष आत्मारामा । पूर्णकामा सर्वेशा ॥ ८१ ॥

हें त्रिभुवन तुझ्या उदरीं । तूं खेळविसी सूत्रधारी ।
ऐसा तूं परमात्मा श्रीहरी । अनंत व्यापक ॥ ८२ ॥

तूं देवांचाही देव । या ब्रह्मांडाचा जीव ।
परी तुझे करणीचा नवलाव । अपूर्व देखा ॥ ८३ ॥

या चांडाळाचें पुण्य । तिळाचा शतांश भाग जाण ।
यासी तुवां वैकुंठासी आणून । आपुले सन्निध बैसविलें ॥ ८४ ॥

तुळसीवरून आला वारा । तो लागला याच्या शरीरा ।
तेणें याच्या पातकाचा मोडला थारा । हें मज अपूर्व वाटतें ॥ ८५ ॥

आतां तुळसोवरून वारा । येऊन लागेल पामरा ।
मग सर्व आणाल वैकुंठपुरा । मग दंड करावा कोणासी ॥ ८६ ॥

तुमची आज्ञा ऐसी । कीं दंड करावा पापियासीं ।
तरी या चांडाळासी । पाठीसी कैसें घातलें ॥ ८७ ॥

ऐसा बोलिला यम । त्यासीं उत्तर दे पुरुषोत्तम ।
म्हणे हा परम उत्तम । परमपुण्यात्मा ॥ ८८ ॥

जैं तुळसीवरून आला वारा । स्पर्श केला पाचिया शरीरा ।
तैं पवित्र झाला सारा । देह याचा ॥ ८९ ॥

हा परम झाला पुनीत । याच्या पुण्यासी नाहीं मित ।
हें तुम्ही जाणा नेमस्त । यमराया ॥ ९० ॥

आणिक सांगतों एक । याचे पूर्वपुण्य असे देख ।
यास्तव पावला विष्णुलोक । पौंड्रिक हा ॥ ९१ ॥

हा मज परमप्रिय । मदनाहून अधिक होय ।
त्या पुत्रापरीस यावरी स्नेह । माझा याचे ठाई ॥ ९२ ॥

ऐसें देवाचें बोलणें । परिसोन चकित झाला मनें ।
मागुती त्यासी नारायण । काय बोलता जाहला ॥ ९३ ॥

आतां तुझीं आपुल्या स्थळासीं जावें । आपुलें कार्य करून सुखी रहावें ।
तुळसीची सेवा करिती तिकडे न जावें । यमदूतीं ॥ ९४॥

ऐसें बोलोनि ते अवसरीं । यमासीं हृदयीं आलिंगी श्रीहरी ।
मग विडा देऊनियां करीं । परम समाधान केलें ॥ ९५॥

आज्ञा दिधली तयासीं । यम जाता झाला निजस्थळासीं ।
गुरु सांगे इंद्रप्रह्लादांसीं । कथा पौंड्रिकाची ॥ ९६॥

ऐसें तुळसीचें महिमान । वायूने महापापी उद्धरिला जाण ।
इंद्रप्रह्लाद ऐकती आपण । देवगुरु बोलतसे ॥ ९७॥

हें तुळसी माहात्म्य । ऐकती पढती धरूनि नेम ।
तयांसीं श्रीपुरुषोत्तम । आपणाजवळी रक्षित ॥ ९८॥

क्षत्रिय हा अध्याय करितां पठण । तरी युद्धीं जय पावती आपण ।
वैश्य पठण करितां जाण । धनप्राप्ती होय त्या ॥ ९९॥

ब्राह्मणा प्राप्त होय ज्ञान । शूद्रासी भुक्ति मुक्ति जाण ।
स्त्रियांसी सौभाग्य संपूर्ण । होय देखा ॥ १००॥

आरोग्य होय सकळांस । आयुष्य होय बहुवस ।
ऐसें फळ हें असे । या अध्यायाचें ॥ १॥

लक्ष्मी होय संपूर्ण । अंतीं विष्णुपद प्राप्त जाण ।
म्हणोनी हा अध्याय पठण । करावा देखा ॥ २॥

सूत सांगे ऋषीश्वरां प्रती । त्याचीं उच्छीष्टैतरें तुम्हाप्रती ।
सांगितलीं अल्पमती । श्रवण भावें करावीं ॥ ३॥

जो श्रवण करी तुळसीमाहात्म्यास । तरी गणना नाहीं त्याचे पुण्यास ।
विश्वास धरावा मानस । विठ्ठलदास रुद्र म्हणे ॥ ४॥

इति श्रीस्कन्दपुराणे तुळसीमाहात्म्ये चतुर्थोऽध्यायः ॥ ४॥

## ५. पञ्चमोऽध्यायः

श्रीगणेशाय नमः ।
मुख प्रक्षाळूनि प्रातःकाळीं । तुळसीवृंदावनीं ।
जावें तयेवेळीं । जोडूनियां बद्धांजुळी ॥ १॥

ऐसें म्हणावें श्लोक ।
यन्मूले सर्वतीर्थानि यन्मध्ये सर्वदेवताः ।
यदग्रे सर्ववेदाश्च तुलसि त्वां नमाम्यहं ॥ २॥

या मंत्रेकरूनियां जाण । प्रार्थावें तुळसीस आपण ।
अनन्य होऊनि शरण । पाणी घालावें ॥ ३॥

यावरी प्रह्लाद म्हणे गुरुनाथा । तुझीं सांगीतली पौंड्रिकाची कथा ।
ते परिसोनियां चित्ता । परमसमाधान जाहलें ॥ ४॥

तुळसी रोप लाऊनियां द्वारीं । भावें त्याची पूजा करी ।
ऐसें करितां कोणीतरी । उचरला आहे ॥ ५॥

ऐसें पुसता झाला गुरूसी । गुरु म्हणती तयासीं ।
येच विषयीं ऐका कथेसीं । सांगतो तुज ॥ ६॥

कैलासभुवन परम सुंदर । अतिलावण्य मनोहर ।
जेथें वास्तव्य करी श्रीशंकर । सदाशिव जो ॥ ७॥

तेथें नाना वनस्पती । सर्वांस फळें पुष्पें येती ।
पक्षी क्रीडा करिती । आपुले आनंदानें ॥ ८॥

कल्प तरु असती तेठाई । वसंत तेथें वसे पाहीं ।
नाना श्वापदें तींही । निरंतर राहती ॥ ९॥

बहुत तटाक सरोवर । उदकीं परिपूर्ण निरंतर ।
भीतरीं पद्मकमळें सुंदर । विकासली असती ॥ १०॥

ऐसें तें कैलास । तेथे श्रीशंभु करी वास ।
आसन वाळूनि बैसलासे । देवाधिदेव ॥ ११॥

परमहर्षयुक्ते । सदाशिव बैसला तेथें ।
तव अकस्माते । पार्वती तेव्हां पातली ॥ १२॥

नमस्कार करूनी शिवासीं । पुसती झाली वामांगासीं ।
वामहस्तें कवळूनि नीळकंठासी । विनोद करिती जाहली ॥ १३॥

म्हणे सदाशिवा समर्था । धर्माचा लोप झाला तत्वतां ।
सत्कर्मै बुडाली आतां । अधर्मे फार प्रवर्तला ॥ १४॥

आपला स्वधर्म टाकूनि । लोक अधर्मकर्मैं करिती देख ।
यांचा संहार अवश्यक । करावा स्वामी ॥ १५॥

तरी तुझीं उघडोनि तृतीयनयन । भस्म करावे अवघे जन ।
ऐसें ऐकतां पंचानन । सदाशिव कोपला ॥ १६॥

म्हणे या सकळ जनाचा घात । तुवां केला कीं नेमस्त ।
पाप घडलें बहुत । तुजलागीं ॥ १७॥

वाचेंतून जें निघालें । तें कर्म त्यासी तत्काळ घडलें ।
म्हणोनी न पाहिजे बोलिलें । विरुद्ध बोलासीं ॥ १८॥

माझा उघडतांच तृतीयनयन । त्रैलोक्य भस्म करीन ।
त्यासीं तूं उघडोन । भस्म करा म्हणतेसी ॥ १९॥

या शब्दे तुज घडलें महापातक । प्रायश्चित्तषेणें लागे देख ।
आतांचि तूं अवश्यक । प्रायश्चित्त घेई ॥ २०॥

जोवरी त्वां प्रायश्चित घेतलें नाहीं । तोंवरी तूं अशुद्ध आहेस पाहीं ।
ऐसें बोलतां ते समयीं । परम भयभीत जाहली ॥ २१॥

परम होऊनिम्लान मुख । अति चिंतातुर झाली देख ।
बहुतां रीतीं करी शोक । मनामाजी ॥ २२॥

म्हणे व्यर्थ या अवसरीं । विनोद केला त्रिपुरारी ।
नसते पातक पदरीं । बांधोनियां घेतलें ॥ २३॥

आतां प्रायश्चित्तावांचुनी । मज शुद्धता कैंची याजनीं ।
ऐसें अंतर्यामीं कल्पुनी । नमन साष्टांग पैं केलें ॥ २४॥

म्हणे कृपाळुवा सदाशिवा । मज तरणोपाय सांगावा ।
ऐसें विनवोनि देवाधिदेवा । मस्तक चरणीं ठेविला ॥ २५॥

मग शिव कृपा करून । सांगता झाला आपण ।
तुळसीची सेवा करी जाण । येणें प्रकारें ॥ २६॥

तुळसी रोपें लावोनि अपार । सेवा करावी निरंतर ।
तेणें पाप जाईल समग्र । सत्य जाण पार्वती ॥ २७॥

ऐसें शिवें सांगतां जाण । मग पार्वती पुसे आपण ।
तुळसीची सेवा करून । कोण निष्पाप जाहले ॥ २८॥

हें सांगावें तत्वतां । कृपा करोनी कृपावंता ।
म्हणोनी चरणीं ठेविला माथा । पार्वतीनें ॥ २९॥

शिव म्हणे भली भली । बरवी प्रश्नोक्ती ।
हे केली । वहिली श्रवण करीं कां ॥ ३०॥

उज्जनी नाम नगरी । तेथें कौंतीय तेंचि कथा ब्राह्मण राज्य करी ।
तो पुण्यवंत झाला कवणिये परी । तें आईकें ॥ ३१॥

ग्रामापासोनि समीप अरण्य । तेथें राहे ब्राह्मण ।
तेणें तुळसी रोप परिपूर्ण । लाविलें देखा ॥ ३२॥

त्या तुळसी वनामध्यें देख । अच्युतवृक्ष असे एक ।
सदा फळ देखोनि लोक । समाधान पावती ॥ ३३॥

त्या वृक्षाचे तळीं । वाळूचें लिंग असे ते स्थळीं ।
अपूज्य लिंग ते वेळीं । तो पूजिता होय ॥ ३४॥

आधीं करूनि तुळसीचें पूजन । धूप दीप नैवेद्य समपन ।
मग प्रार्थना करून । पत्र मंजुरी तोडित ॥ ३५॥

मग लिंगासी करूनि अभिषेक । तुळसीपत्र मंजुरी समर्पी देख ।
नैवेद्य समर्पितां सुख । मुख वस्त्रे झांकी ॥ ३६॥

ऐसी पूजा ते वेळीं । एकसंवत्सर तेणें केली ।
संतोष पावोनि चंद्रमौळी । प्रसन्न जाहला ॥ ३७॥

मी जावोनि विप्रापासीं । बोलता झालों तयासीं ।
धन्य धन्य तू होसी । पुण्यवंता ॥ ३८॥

तूं झालासी निःपाप । तिळभरी नसे तुज पाप ।
आतां तुझा सर्व संकल्प । सिद्धी पावेल ॥ ३९॥

आतां तुज मी झालों प्रसन्न । आपणासारिखा पुत्र दीधला जाण ।
तूं सुख भोगी संपूर्ण । याचदेहीं ॥ ४०॥

ऐसियासि तूं या अवसरीं । जावोनि त्या स्थळाभीतरी ।
त्याचिये समसरीं । सेवा कीजे तुळसीची ॥ ४१॥

तेथें तुझें जाईल पाप । तूं होसील निःपाप ।

पूजावें तुळसी रोप । सद्भावेंकरूनी ॥ ४२॥

ऐसें ऐकोनि ते अवसरीं । उमा उठली झडकरी ।
मस्तक ठेऊनि शिवचरणावरी । नभन केलें ॥ ४३॥

मग येऊनि उज्जनीसीं । पाहिलें क्षिप्रा नदीतीरासीं ।
वास्तव्य केलें तया स्थळासी । नदीतीरीं जाणपां ॥ ४४॥

तुळसी रोप लावोनि सांग । मग एक केलें वाळूचें लिंग ।
पूजाकरीतसे प्रसंगें । तुळसी आणि लिंगाची ॥ ४५॥

आधीं करी तुळसीपूजन । प्रदक्षिणा करूनि आपण ।
मग प्रार्थना करूनि जाण । तुळसी आणि मंजुरी तोडी ॥ ४६॥

तीं तुळसीपत्रे समर्पुनी । मग पूजा करी भवानी ।
श्रीशिवासी नैवेद्य दाखवोनी । नमस्कार घालीतसे ॥ ४७॥

पायसान्नाचा नैवेद्य नित्यानीं । शिवासी समप भवानी ।
तेणें शिव संतुष्ट होउनी । नांव ठेविलें अन्नपूर्णा ॥ ४८॥

त्या दिवसापासुनी देख । अन्नपूर्णा म्हणती लोक ।
आणीक ही आइक । प्रह्लादा तूं ॥ ४९॥

सहस्त्रपत्रे तुळसीचीं । मोजून पूजा करी शिवाची ।
सहस्त्रनामें करूनी पत्रीची । पूजा समर्पी ॥ ५०॥

शिवसस्त्रहनामें समर्पिलें पर्णा । म्हणोनी नांव ठेविलें अपर्णा ।
ऐसें एक संवत्सर जाणा । अनुष्ठान केलें तुळसीचें ॥ ५१॥

तुळसी होऊनि प्रसन्न । पार्वतीस दिलें आलिंगन ।
शिवासारिखा पुत्र होईल जाण । उमादेवी ॥ ५२॥

तूं पुत्रफळ पावसी । आणीक वचन परियेसीं ।
तूं निःपाप झालीस निश्चयेंसीं । सत्य जाण ॥ ५३॥

तूं शिवाची वल्लभा होसी । मी प्रिय होय विष्णूसीं ।
तुज मज भिन्नता कोणेविशीं । नाहीं देखा ॥ ५४॥

तै सेंचि शिवविष्णूस तत्वता । भिन्नता नसे सर्वथा ।
भिन्नता धरिती ते कोणे पंथा । जातील तें आइका ॥ ५५॥

भिन्नता धरिती मानसीं । तेजाती कुंभपाकासीं ।
रखरख भोगणें लागे त्यांसी । यावत् चंद्र सूर्य ॥ ५६॥

शिवस्य हृदयं विष्णुर्विष्णोश्च हृदयं शिवः । ऐसा ज्याचा पूर्णभाव ।
एकचि मानी उभय देव । त्यासीं मुक्तीचा उपाव । करणेंच नलगे ॥ ५७॥

तो सहजचि जीवन्मुक्त । एक विध परम भक्त ।
आनंदरूप सदोदित । असे सर्वकाळ ॥ ५८॥

ऐसें सांगूनि पार्वतीसी । अदृश्य झाली श्रीतुळसी ।
उमा परम उल्हासेसीं । गमन करिती जाहली ॥ ५९॥

उमेनें केलिया गमन । कैलासासीं गेली जाण ।
ऐकोनि पावेतीचें आगमन । श्रीशिव संतोषला ॥ ६०॥

म्हणे निःपाप झाली पार्वती । सामोरें जावें तियेप्रती ।
ऐसें बोडूनि उमापती । वृषभारूढ पैं झाले ॥ ६१॥

सवें घेऊनि गणांचा मेळा । कार्तिकस्वामी गणेश वीरभद्र सकळां ।
बोलाऊनि तये वेळां । सामोरे चालिले ॥ ६२॥

सन्मुख देखतांचि उमेसीं । संतोष झाला सदाशिवासीं ।
मग उमेनें त्यासमयासीं । मस्तक चरणीं ठेविला ॥ ६३॥

शिवें उचलोनि ते अवसरीं । अर्धांगीं बैसविली सुंदरी ।
संतोष पावले त्रिपुरारी । तये समयीं ॥ ६४॥

ऐसें तुळसीचें महिमान । इंद्रप्रह्लादासी गुरु सांगे आपण ।
तेंच केलें निरोपण । श्रोतयांलागीं ॥ ६५॥

श्रवण करितां तुळसी माहात्म्यास । तुटती भवरोगपाश ।
आणि प्राप्त होती चतुर्दश प्रकाश । विठ्ठलदास रुद्र म्हणे ॥ ६६॥

इति श्रीस्कन्दपुराणे तुळसीमाहात्म्ये पञ्चमोऽध्यायः ॥ ५॥

## ६. षष्ठोऽध्यायः

श्रीगणेशाय नमः ।
बृहस्पति इंद्रप्रह्लादासीं । सांगतां कथा ऐसी ।
श्रवण केलें पार्वतीच्या कथेसीं । स्वामीचेंनि मुखे ॥ १॥

तुळसीची सेवा करूनी । निःपाप झाली भवानी ।
पुढें आणीक कोणी । अनुष्ठान पैं केलें ॥ २॥

हें आतां आम्हांप्रती । सांगावें गा कृपामूर्ती ।
ऐसी केली विज्ञप्ती । गुरुवर्यां ॥ ३॥

परिसोनि उभयतांची प्रभोक्ती । बोलता झाला बृहस्पती ।
पुढील कथा तुम्हांप्रती । सांगतों ती ऐका ॥ ४॥

भूमिदेवीचें अनुष्ठान । दुर्वासदेव करी आपण ।
करूनि पूजा अर्चन । पुष्पांजुळी समप ॥ ५॥

ऐसी सेवा करितां ऋषी । तंव समस्त ऋषि आले त्यास्थळासीं ।
मग विनंती करिते झाले । ऐसी आइका ॥ ६॥

आम्हासीं गमन नाहीं सत्यलोकासीं । आपण जावें ब्रह्मभुवनासी ।
बह्मदेवाची स्थिति आहे कैसी । ते दृष्टीसी पहावी ॥ ७॥

आमुची हेचि विज्ञप्ती । पुरवावी जी कृपामूर्ती ।
ऐसें बोलोनियां पुढतीं । नमस्कार केला ॥ ८॥

जाणोनि ऋषीश्वरांचा भावो । तात्काळ उठिला दुर्वासदेवो ।
क्षणांत पातला ठावो । सत्यलोकींचा ॥ ९॥

तंव ब्रह्मा ते अवसरीं । सावित्रीसमवेत क्रीडा करी ।
सारीपाट मांडूनि करीं । ढाळीत फांसे ॥ १०॥

जों हातीं घरी फांसा । तों फांसाच पडे अपैसा ।
ब्रह्मदेव ऐसा । देहावरी नाहीं ॥ ११॥

संमुख उभे असती ऋषी । ब्रह्मा न पाहे त्यांसी ।
मन शाला द्यूतकर्मासीं । तये अवसरीं ॥ १२॥

ऐसें देखोनि त्यासमयासीं । कोपायमान झाले ऋषी ।
कमंडलूंतून उदकासीं । टाकिते झाले ॥ १३॥

उदक शिंपिलें ब्रह्मयावरी । आपण चालिले झडकरी ।
मग चतुरानन धांवोन द्वारीं । येता जाहला ॥ १४॥

दृष्टीं देखिलें ब्रह्मयासीं । प्रगट शाप बोलिले ऋषी ।

त्वां गर्व धरिला मानसीं । सृष्टि कर्ता म्हणोनी ॥ १५॥

तरी तुझें समूळ जाईल ज्ञान । तूं होसील परम अज्ञान ।
सत्य मानीं आमुचें वचन । मिथ्या नव्हे सर्वथा ॥ १६॥

मग भयभीत होऊनि ब्रह्मा । म्हणे मज दीनावरी करीं क्षमा ।
तरणोपाय सांगावा आम्हां । कृपावंता ॥ १७॥

नानाप्रकारी भाकी कींव । मग बोलिले दुर्वासदेव ।
सेवा करूनियां केशव । संतुष्ट करावा ॥ १८॥

तो तुज होईल सुप्रसन्न । जें जें मागसील वरदान ।
तेंतें पावोनि अज्ञान । निरसेल तुझें ॥ १९॥

आतां तूं जाई नैमिषारण्यांत । अनुष्ठान करावें शीघ्रगत ।
ऐसें सांगोनियां त्वरित । ऋषि गेला पूर्वस्थळा ॥ २०॥

मग ब्रह्मा जावोनि नैमिषारण्यांत । अनुष्ठान करी विष्णुप्रीत्यर्थ ।
ऐसें करितां दिवस बहुत । क्रमिले देखा ॥ २१॥

देखोनि चतुराननाचे कष्ट । श्रीभगवंत झाले प्रगट ।
रूप दाखविलें स्पष्ट । तयेवेळीं ॥ २२॥

चतुर्भुज पीतांबरधारी । रत्नजडित मुगुट शिरीं ।
शंखचक्रगदापद्म शोभे करी । नारायणाच्या ॥ २३॥

संमुख देखिला श्रीहरी । आनंद झाला हृदयांतरीं ।
स्तुति करिता झाला ते अवसरीं । नारायणाची ॥ २४॥

जयजयाजी परम पुरुषा । अव्यक्ता परम परेशा ।
सर्वव्यापक जगदीशा । तुज नमस्कार माझा ॥ २५॥

तूंचि ज्ञानद चिन्मय चिद्घन । तूं या ब्रह्मांडाचें जीवन ।
तूं परमात्मा परिपूर्ण । तुज नमस्कार माझा ॥ २६॥

तूं स्थूळ नासूक्ष्म । तूं परमात्मा परब्रह्म ।
सकळ सुखाचा विश्राम । तुज नमस्कार माझा ॥ २७॥

तूं सदा आनंदभरित । तूं सर्वांठाई सदोदित ।
भूतमात्री प्रकाशवंत । तुज नमस्कार माझा ॥ २८॥

तूं सगुण निर्गुण निराकार । ब्रह्मादिकांसीं नकळे तुझा पार ।
तूं परमात्मा सर्वेश्वर । तुज नमस्कार माझा ॥ २९॥

तूं परमेश्वर पद्मनाभ । तूं सगुणरूपें रमावल्लभ ।
तूं भक्तांलागीं सुलभ । तुज नमस्कार माझा ॥ ३०॥

मी जन्मलों तुझे नाभिकमळीं । परी तुझा पार नकळे वनमाळी ।
ऐसें बोलोनि बद्धांजुळी । जोडूनि उभा राहिला ॥ ३१॥

मग श्रीहरी झाला प्रसन्न । म्हणे माग माग रे वरदान ।
जें अपेक्षित असेल मन । तें देईन येकाळी ॥ ३२॥

ब्रह्मा म्हणे नारायणा । दुर्वासदेवें शापिलें जाणा ।
त्यापासोनि मज दीना । ये रक्षिले पाहिजे ॥ ३३॥

ऐकोनि ब्रह्मयाचे उत्तर । बोलता झाला शार्ङ्गधर ।
चतुराननां ऐक सादर । चित्त देऊनियां ॥ ३४॥

मी समर्थ या चराचरीं । मीं सकळसृष्टी करी ।
ऐसी गर्वता मनांतरीं । धरली तुवां ॥ ३५॥

उत्पत्ति करिता मी एक । निर्माणकरिता मी सकळिक ।
माझें कर्त्तव्य त्रैलोक्य । निर्माण झालें ॥ ३६॥

धन्य धन्य मी समर्थ थोर । माझिया भाग्यासि नाहीं पार ।
ऐसा अभिमान परमदुर्धर । त्वां हृदयीं धरियेला ॥ ३७॥

यास्तव हैं रचिलें निमित्त । तुज शाप झाला प्राप्त ।
तेणें कष्टी झालासि बहुत । ब्रह्मदेवा ॥ ३८॥

जेथें अभिमान वसे । तेथें ज्ञान सर्वथा नसे ।
ज्ञात्यास लाविलें पिसें । ज्ञानाचे अभिमानें ॥ ३९॥

अभिमान ज्ञानाचा करि क्षय । अभिमानें देव दुरी होय ।
अभिमानें न जोडती पाय । भगवंताचे ॥ ४०॥

मुख्य अहंकार ऐसा वैरी । बैसला असतां उरावरी ।
तो ज्ञानाचा नाश करी । क्षण मात्र न लागतां ॥ ४१॥

जोवरी निरसला नाहीं अभिमान । तोंवरी सर्व कर्मैं निर्फळ जाण ।
अभिमानें घर बुडवण । तात्काळ होय ॥ ४२॥

अभिमान असतां अंतरी । उदंड ज्ञानचर्चा करी ।
तें पोकळ ज्ञान निर्धारी । ब्रह्मदेवा ॥ ४३॥

तुझा निरसला नाहीं अभिमान । म्हणोनी प्राप्त जालें जाण ।
आतां सोडून अभिमान । निरभिमान तूं होय ॥ ४४॥

अरे माझी वैष्णवी माया जाण । तिचा पार नेणें शंकरादि आपण ।
तेथे तूं जाणावया कवण । अभिमान सांडी आतां ॥ ४५॥

या अभिमानें करून । ठकला विश्वामित्र आपण ।
मदन अंग जाळून । भस्म झाला ॥ ४६॥

रावण निमाला सहकुळें । दुर्योधन गेला बंधुसबळें ।
इंद्र चंद्र भ्रमबळें । भुलोनि गेले ॥ ४७॥

तुवां माझें केलें अनुष्ठान । म्हणूनी मी झालों सुप्रसन्न ।
तुज सांगतों मी प्रमाण । तें करीं आतां ॥ ४८॥

तुळसी रोप लाऊन । सुंदर बांधीं वृंदावन ।
त्याचें करूनि पूजन । प्रदक्षिणा करीं कां ॥ ४९॥

धूप दीप समर्पूनी नैवेद्य । वृंदावनीं करावा ब्रह्मानंद ।
तेणें करोनि गोविंद । संतुष्ट होईल ॥ ५०॥

तुळसी होऊनि सुप्रसन्न । करील तुझें शापमोचन ।
ऐसें ब्रह्मदेवासीं नारायण । स्वयें सांगे ॥ ५१॥

मज वैष्णवी माया व्हावया प्राप्त । तुळसीचें अनुष्ठान केलें दिवस बहुत ।
मग मी पावलों त्वरित । वरदान ॥ ५२॥

म्हणोनी सांगितल्या प्रमाणें । तुळसीचें अर्चन करणें ।
ऐसें सांगोनि नारायणें । अदृश्य जाहला ॥ ५३॥

आज्ञेप्रमाणें विधाता । अनुष्ठान झाला करिता ।
तुळसी प्रसन्न होऊनि तत्वतां । शापविमोचन केलें ॥ ५४॥

बहुत दिवस पर्यंत । स्वाहा स्वधाकार राहिले होते ।
यज्ञकर्मैं समस्तें । मागुती चालों लागलीं ॥ ५५॥

ऐसी कथा इंद्रप्रह्लादांसी । गुरूनें सांगीतली रायासीं ।

आणीक सांगतों तुम्हापासीं । तें आईका ॥ ५६॥

वामदेवाची कन्या सुमालिनी । तिची ऐका करणी ।
निरंतर हृदयीं चक्रपाणी । हरिस्मरण करीतसे ॥ ५७॥

श्रीकृष्णावांचूनि आणीक देव । तेथे कधींच नधरी भाव ।
निरंतर केशव । हेंचि स्मरणजियेचें ॥ ५८॥

पूजार्चन ध्यान धारणा । धरुनी हृदयीं नारायणा ।
तेणें करोनि पुण्यपरायणा । परम जाहली ॥ ५९॥

ऐसें असतां एके दिवशीं । पुसती झाली पितयासीं ।
माझी गती होईल कैसी । तें सांगिजे मज आतां ॥ ६०॥

परिसोनि बोले वामदेव । याचा तुज सांगतों उपाव ।
त्यासीं धरूनी एकभाव । सांगीतलें तूं करीं ॥ ६१॥

तुळसीरोप लाऊन । त्यासीं बांधी वृंदावन ।
नित्य करूनियां पूजार्चन । प्रदक्षिणा कराव्या ॥ ६२॥

द्वादश करितां प्रदक्षिणा । तेणें पुरती मनकामना ।
चतुर्विंशती जाणा । शत्रुपराजय ॥ ६३॥

करितां अष्टोत्तरशत । धनधान्य प्राप्त होत ।
सहस्त्र करितां अगणित । पुत्र कन्या प्राप्त होती ॥ ६४॥

लक्षाचें करितां प्रमाण । मुक्तिमुक्ति सदा कल्याण ।
द्वितीयल जाण । यश कीर्ति होय तेणें ॥ ६५॥

पंचलक्ष प्रदक्षिणा करितां । त्रिभुवनींचें ज्ञान होय त्वरिता ।
दशलक्ष प्रदक्षिणें तत्वतां । सर्व सिद्धी पावेतो ॥ ६६॥

द्वादशें होय शापमोचन । त्रयोदशें मोक्ष प्राप्त जाण ।
चतुर्दशें कळाप्रवीण । होय देखा ॥ ६७॥

प्रत्यहीं धूप दीप नैवेद्य । समपनि करीं ब्रह्मानंद ।
तेणें संतुष्ट होईल गोविंद । तुळसीद्वारें ॥ ६८॥

येणें तुळसी होईल प्रसन्न । तुझी गती सांगेल आपण ।
ऐसें सांगीतलें तेचक्षणी जाण । पित्यानें कन्येसी ॥ ६९॥

पित्याच्या आज्ञेप्रमाणें । सुमालिनी करी आचरण ।
बहुत दिवस पूजार्चन । करिती झाली ॥ ७० ॥

करितां अनुष्ठानासीं । सोळा पुत्र झाले तियेसीं ।
परंतु तुळसीच्या पुजेसीं । सोडिलेंचि नाहीं ॥ ७१ ॥

तंव सोळाहि पुत्र अरण्यासीं । गेले समिधा आणावयासी ।
तंव देखिलें आश्रमासीं । ऋषी गौतमाच्या ॥ ७२ ॥

उत्तम देखिलें सरोवर । भीतरी कमळें मनोहर ।
त्यांत प्रवेशले कुमर । सुमालिनीचे ॥ ७३ ॥

स्नानें करोनि डहुळिलें उदक । कमळिणी दुखविल्या निष्टंक ।
तों तेथें गौतम आले देख । स्नानालागीं ॥ ७४ ॥

विच्छिन्नदेखिलें जलासीं । शाप देता झाला ऋषी ।
अंध व्हाल रे निश्चयेंसीं । येचक्षणीं ॥ ७५ ॥

शाप होतांचि तात्काळ । अंध जाहले सकळ ।
मार्ग नदिसे केवळ । चालतां ठोकर लागती ॥ ७६ ॥

माता पुत्रांची वाट पाहे । तंव त्यांसीं वेळ लागला आहे ।
मग हळू हळू लवलाहें । आश्रमासीं पातले ॥ ७७ ॥

पुत्राची दशा ते अवसरीं । देखोनि आक्रंदों लागली भारी ।
ताता धांवधांव ये झडकरी । म्हणोनी बोभाइली ॥ ७८ ॥

वामदेव बैसले होते ध्यानीं । तंव शब्द ऐकिला श्रवणीं ।
मग उठोनियां तेचक्षणीं । कन्ये जवळीं पातला ॥ ७९ ॥

म्हणे नवल झालें जी ताता । पुत्र अंध झाले करूं काय आतां ।
तंव ज्ञानी झाला पाहता । वामदेव ॥ ८० ॥

शाप घडला गौतमाचा । यासीं उपाव न चले कोणाचा ।
मग बोलता झाला वाचा । कन्येप्रती ॥ ८१ ॥

मी परतोनि येतों तोंवरी । तुवां धीर धरावा मनांतरी ।
तुळसीची सेवा करीं । दुश्चित्त न व्हावें ॥ ८२ ॥

तुळसीची सेवा करितां जाण । अवघेंचि होईल कल्याण ।
भाव असों द्यावा संपूर्ण । तुळसीचे ठायीं ॥ ८३ ॥

ऐसें सांगोन कन्येसीं । वामदेव चालिले गौतमाश्रमासीं ।
तंव ध्यानस्थ होते गौतमऋषी । त्यांस अंतरी जाणवलें ॥ ८४॥

कष्टी न करावें वामदेवासीं । श्रम पावोन येती आश्रमासीं ।
तरी आपण त्यांचिये भेटीसीं । जावें बरें ॥ ८५॥

ऐसें कल्पूनियां मनीं । वामदेवाजवळी आले तेचक्षणीं ।
मग वामदेवें मस्तक चरणीं । गौतमाच्या ठेविला ॥ ८६॥

पुढती उठोनि सत्वर । साष्टांग केला नमस्कार ।
धन्य आजिचा दिवस थोर । तुमचे चरण देखिले ॥ ८७॥

पुण्याचा प्रवाह जोडे । तरी तुमचें दर्शन घडे ।
तुटे संसारसांकडें । ऋषिवर्या ॥ ८८॥

ऐसें बोलोनि ते अवसरीं । गौतमाचे पाय अर्ची करीं ।
चरणोदक वंदोनि मस्तकावरी । षोडशोपचार पूजा केली ॥ ८९॥

परम संतोषला ऋषी । म्हणे वामदेवा परियेसीं ।
तूं ईश्वरी पुरुष होसी । परम ज्ञानी ॥ ९०॥

तुज देखोनि झालें समाधान । धन्य धन्य तुझें ज्ञान ।
भूत भविष्य वर्तमान । सर्व जाणसी ॥ ९१॥

वामदेव म्हणती स्वामी । तुमचे आज्ञाधारक आम्ही ।
जे आज्ञा कराल स्वामी । ते आम्हास वंद्य असे ॥ ९२॥

तेव्हां गौतमऋषी झुणती । वामदेवा काय इच्छिलें चित्तीं ।
तें सांगावें मजप्रती । प्रीतिपूर्वक ॥ ९३॥

परिसोनि ऋषीची प्रश्नोक्ती । वामदेव प्रत्युत्तर देती ।
एक मागणें तुम्हाप्रती । आहे तितुकें द्यावें जी ॥ ९४॥

आमचे नातू स्वामीचे विद्यार्थी । त्यांसीं तुम्ही शापिलें कृपामूर्ती ।
यास्तव ते अंध असती । सोळाहि जण ॥ ९५॥

दया करूनि त्यांवरी । अंधकार दवडावा दिगंतरीं ।
ऐसी अनाथासीं कृपा करीं । कृपावंता ॥ ९६॥

ऐकोनि वामदेवाचें बोलणें । गौतम म्हणती मी बोललों याचकारणें ।

सुमालिनीचा भाव पाहणें । सेवा करिते कीं नाहीं ॥ ९७॥

आपुले आराध्य दैवत । विपत्तिकाळीं सोडोन देत ।
तैसा नव्हे पूर्ण भावार्थ । सत्य जाणा ॥ ९८॥

देह जावो अथवा राहो । परंतु एकनिष्ठा एकभावो ।
तरीं तयासी देवाधिदेवो । सर्वथाही नुपेक्षी ॥ ९९॥

तरी धन्य सुमालिनीची भक्ती । पुत्रांचें अंधत्व नाठवे चित्तीं ।
तुळसीची सेवा सर्वार्थी । सोडिलीच नाहीं ॥ १००॥

येणें मी झालों हर्षायमाण । त्यांचे शापमोचन झालें जाण ।
पूर्वी नेत्र होते तैसेचि पूर्ण । तात्काळ झाले ॥ १॥

ऐसें ऋषि बोलिला आपण । तंव पाहते झाले सोळाजण ।
पूर्वी नेत्र होते तैसेचि पूर्ण । तात्काळ झाले ॥ २॥

ऐसें ऋषीचें सामर्थ्य । क्षणें अंघ क्षणें देखत ।
ऐसें झालें त्वरित । तेंचि समयीं ॥ ३॥

मग गौतमदेव गेले निजस्थाना । पुत्रासहित सुमालिनी वृंदावना ।
सेवा करूनियां जाणा । निष्ठा धरोनी राहिली ॥ ४॥

तुळसीची सेवा पुनरावृत्ती । सद्भावें करोनि परम प्रीती ।
हे कथा सांगती बृहस्पती । इंद्रप्रह्लादासीं ॥ ५॥

तींच उच्छिष्टे श्रोतयांसीं । वक्तयानें सांगीतली परियेसीं ।
दुजा भाव मानसीं । न धरावा ॥ ६॥

भावें तुळसीमाहात्म्यास । श्रवण करितां हरती क्लेश ।
संतोष पावे जगदीश । विठ्ठलदास रुद्र म्हणे ॥ ७॥

इति श्रीस्कन्दपुराणे तुळसीमाहात्मये षष्ठोऽध्यायः ॥ ६॥

## ७. सप्तमोऽध्यायः

श्रीगणेशाय नमः ।

प्रह्लाद आणि इंद्र । गुरूसीं करिती नमस्कार ।
जोडोनियां दोन्ही कर । विनविते झाले ॥ १॥

सुमालिनीची कथा श्रवण । झाली जी गुरुनाथा ।
पुढें कोणें चालविलें व्रता । तें समर्थ सांगणे ॥ २॥

गुरु म्हणती सावधान । स्वस्थचित्तें करा श्रवण ।
जेणें हरेल भवरोग दारुण । तें सांगतों तुम्हांसी ॥ ३॥

उरगाक्षी नाम नगरीं । सुशीळराजा राज्य करी ।
पवित्र आणि परोपकारी । पुण्यवंत ॥ ४॥

सुशीला नायें त्याची स्त्री । परमपवित्रता सुंदरी ।
एक कन्या उभयतां उदरीं । असे देखा ॥ ५॥

तिचें नाम देवसेना । हरिभक्तीसीं तत्पर जाणा ।
तुळसीची सेवा करूनि प्रदक्षिणा । नित्यानित्य करीतसे ॥ ६॥

तिच्या सौंदर्याची स्थिती । इंद्र प्रह्लादाप्रती ।
सांगता झाला बृहस्पती । तें ऐका आतां ॥ ७॥

जितुकें सुलक्षण । तितुकें देहीं असे जाण ।
मुख चंद्राकार पूर्ण । नेत्र कमळा सारिखे ॥ ८॥

तेज सूर्याच्या तेजासारिखें । नखें आरक्त सुरेख ।
अधर कुंकुमासारिखे । दंत दाडिमीबीजोपम ॥ ९॥

माज सिंहाचे माजासारिखा । जानु कर्दळीचा गाभा देखा ।
अंगोळिया समान सारिख्या । हस्तपादादिकांच्या ॥ १०॥

ऐसी सुंदर ते सकुमारी । द्वादश वर्षांची झाली ते अवसरीं ।
पिता वरविच्यार करी । कोणासीं द्यावी ॥ ११॥

इच्या योग्य कैसा मिळेल वर । म्हणोनी पिता चिंतातुर ।
मग करिता झाला स्वयंवर । राजा सुशीळ तो ॥ १२॥

पृथ्वीचे समग्र भूपती । ते आणिले स्वयंवराप्रती ।
ऋषीश्वरांसहित भूपती । येते झाले ॥ १३॥

राजे आणि ऋषेश्वर । स्वयंवरास मिळाले समग्र ।
मग बोलता झाला नृपवर । कन्येप्रती ॥ १४॥

यांजमध्यें तुज मानेल जो वर । त्याचा करीं तूं अंगीकार ।
ऐसी आज्ञा सत्वर । करिता जाहला ॥ १५॥

परिसोन पित्याचें वचन । देवसेना बोले आपण ।
श्वेतदीप देखिलें असेल जेणें । तेणें मज वरावें ॥ १६॥

परिसोन तिचें वचन । तटस्थ झाले अवघेजण ।
मग धरोनियां मौन । अधोमुख राहिले ॥ १७॥

एक गेले आपुलिया देशा । एक धरोनि राहिले आशा ।
कित्येक पहावया तमाशा । विचार करोनी राहिले ॥ १८॥

एकासीं आला शीतज्वर । एक झाले चिंतातुर ।
एक म्हणे इची प्राप्ति होणें दुर्धर । कोणा सही दिसेना ॥ १९॥

ऐसें होतां ते समयीं । तंव जमदग्नि आले पाहीं ।
यांसी देखोनि लवलाहीं । देवसेना बोलत ॥ २०॥

तुम्ही श्वेतद्वीप देखिलें आहे । ऋषी म्हणे होय ।
मग खुणा पुसताहे । तये स्थानींच्या ॥ २१॥

तये स्थानीं वस्ती कोणासी । तेथील रचना आहे कैसी ।
ते सांगा मजपासीं । ऋषिवर्या ॥ २२॥

ऋषि म्हणे आम्हासीं तेथें नसे गमन । आम्ही येऊन पाहिलें तुझें मन ।
तुज कैसें आहे ज्ञान । तेंच आह्मीं पाहिलें ॥ २३॥

आम्ही वसतों बद्रिकावना । आतां जातों तया स्थाना ।
ऐसें बोलोनि त्याच क्षणा । ऋषि गेले ॥ २४॥

तंव देवदत्तनामें ब्राह्मण । तो तेथे आला तेच क्षण ।
देवसेना म्हणे तयालागुन । कोठोन येणें जाहलें ॥ २५॥

तो म्हणे श्वेतद्वीपाहून । येथें झालें आगमन ।
मग हाकस्यवदन करून । पुसती जाहली ॥ २६॥

झुणे कैसी तेथील रचना । तेथें वास्तव्य कोण कोणा ।
हें मज सांगावें ब्राह्मणा । कृपा करोनी ॥ २७॥

ऐकोनि प्रयोक्तीचा आदर । सांगता झाला द्विजवर ।
म्हणे चित्त देऊनियां सादर । परिसें आतां ॥ २८॥

तेथें वास्तव्य श्रीनारायणा । रहावयाचें मंदिर शतयोजन जाणा ।

गोमेदरत्नें पाचु खणोखणा । रत्नकलश शोभती ॥ २९॥

मध्ये अष्टकोणी मंडप थोर । त्यासीं अष्ट द्वारे रत्नखचित परिकर ।
अष्टदिग्पाळ तिष्ठती निरंतर । अष्टदिशा धरोनि उभे ॥ ३०॥

प्रवाळस्तंभाची मांडणी । भूमी काचवंद आंगणीं ।
देवांगना चौघीजणी । नृत्य करिती नित्यानी ॥ ३१॥

गंधर्व करिती गायन । नारद वीणा वाजवी आपण ।
सरस्वती आलाप करी जाण । समयासारिखी ॥ ३२॥

विष्णुभक्त वैष्णव समस्त । जयजयकारें कीर्तन करित ।
गरुड दारी उभा तिष्ठत । सन्मुख असे ॥ ३३॥

शयन करावया नारायणासीं । शेष राहिला तया स्थळासीं ।
तुळसीची सेवा अहर्निशीं । नरनारी करिती तेथें ॥ ३४॥

क्षीरसमुद्राचे पैलतीरा समीप । उत्तरभागी असे श्वेतदीप ।
ऐसें ऐकतां विकल्प । सांडिला चित्तें ॥ ३५॥

म्हणे सत्य बोलिला बाम्हण । यथार्थ सांगितली खूण ।
ऐसें असतां तेत्चिक्षण । चित्रमुनी तेथें आला ॥ ३६॥

तो म्हणे तुझा भाव धन्यधन्य । तुळसीची सेवा करिसी नित्याने ।
तुज तुळसी आहे सुप्रसन्न । सदा सर्वकाळ ॥ ३७॥

जेजे तुझे मनोरथ । ते तुळसी पुरवील यथार्थ ।
परी मी सांगतों त्यास चित्त । देऊनियां ऐकावें ॥ ३८॥

दैवत असे मंत्राधीन । शास्त्र बोले प्रमाण ।
तरी तूं मंत्र जपोन । पूजा करणें ॥ ३९॥

ऐकोन देवसेना बोले ऋषिदेवा । मंत्र कोणाजवळीं पुसावा ।
येरु म्हणे प्रश्न केलासी बरवा । त्याचें प्रत्युतर ऐकावें ॥ ४०॥

आम्ही होऊन कृपावंत । तुजला मंत्र सांगतों नेमस्त ।
जप करावा एकचित्तें । सप्तकोटी ॥ ४१॥

ऐसें बोलोनि तियेसीं । मंत्र सांगता झाला ऋषी ।
जप करी अहर्निशीं । बत्तीस अक्षरांचा ॥ ४२॥

मंत्र । तुलसि श्रीसखिशुभे पापहारिणि पुण्यदे ।
नमस्ते नारदनुते नारायणमनः प्रिये ॥

हा मंत्र जप करीं अहर्निशीं । तुज प्रसन्न होईल तुळसी ।
मनोरथ सिद्धी पावसी । अंतीं जासील विष्णुपदा ॥ ४३॥

ऐसें सांगूनि तियेसीं । आपण सर्प झाला त्याक्षणासीं ।
देखोनि भयभीत झाले राजे ऋषी । चळचळां कांपों लागले ॥ ४४॥

जिव्हा लवथवीत विक्राळ । भासे गिळील हा भूमंडळ ।
धाकें पळाले सकळ । राजे आणि ऋषि ॥ ४५॥

राजे ऋषी समस्त । स्वयंवरासी आले होते ।
धाकें पळोनियां त्वरित । समस्त गेले ॥ ४६॥

ऐसें झालियावरी । सर्प अवलोकन करी ।
संमुख वृक्ष देखिला ते अवसरीं । महाप्रचंड ॥ ४७॥

त्याचे ढोलीत आपण । निघोन फुंपारला जाण ।
तंव गरुडाचें आगमन । अकस्मात जाहलें ॥ ४८॥

गरुड विचारी अंतःकरणें । म्हणे हा भक्ष दीघला नारायणें ।
आतां याचक्षणें । भक्षूं यासीं ॥ ४९॥

ऐसें म्हणोनी सरसावला । तंव सर्प सहस्त्रफणी झाला ।
धुंदकारूनि युद्धासी निघाला । मग लोटला बाहेरी ॥ ५०॥

गरुडासीं तत्काळ दंश केला । मागुती ढोलीत निघाला ।
मग गरुडासीं कोष आला । ते समयीं ॥ ५१॥

क्रोधें धरिला चंचुपुटी । अगदीच सामावला पोटीं ।
उपजा नव्हता सृष्टीं । ऐसें केलें ॥ ५२॥

ऐसा तो सर्प भक्षिला । मग गरुड बोलता झाला ।
येणें त्रास फार दीधला । होता लोकांसीं ॥ ५३॥

हा पापी भ्यां मारिला जाण । आतां तुझी असा क्षेम कल्याण ।
ऐसें बोलोनियां आपण । जाता जाहला ॥ ५४॥

गरुडें केलिया गमन । देवदत्त निघता झाला आपण ।
मग देवसेनेप्रति वचन । बोलता जाहला ॥ ५५॥

देवदत्त म्हणे देवसेनेसीं । तूं जरी माझे समागमें येसी ।
तरी तुज नेईन श्वेतद्वीपासीं । सत्य जाण ॥ ५६ ॥

ऐकोनि देवदत्ताचें वचन । देवसेना निघाली जाण ।
तीस समागमें घेऊन । श्वेतद्वीपासीं गेला ॥ ५७॥

उभयतां श्वेतद्वीपा पावली आपण । देवसेनेनें देखिला नारायण ।
चतुर्भुज पीतांबरधारी सांवळा वर्ण । देवाधिदेव ॥ ५८॥

विस्तीर्ण द्वारीं तुळसी वृंदावन । तेथें बैसला लक्ष्मीनारायण ।
सन्निध रखुमा देवी आपण । विडिया देव ॥ ५९॥

सत्यभामा चवरें ढाळी । नारद वीणा वाजवी जवळी ।
ब्रह्मानंदाचे कल्होळीं । हरिदास गर्जती ॥ ६०॥

रंभा उर्वशी मेनका । चौथी तिलोत्तमा देखा ।
नृत्य करिती अनेका । प्रकार प्रकारींचें ॥ ६१॥

सरस्वती आलाप करी । गरुड सन्मुख उभा द्वारीं ।
ब्रह्मानंदाचे कडोळ गजरीं । भक्त वैष्णव गर्जती ॥ ६२॥

रत्नजडित मुगुट शिरीं । शंखचक्रगदा शोभे करी ।
वैजयंती हृदयावरी । शोभतसे ॥ ६३॥

कर्णीं कुंडलांचा झळाळ । समे विराजमान गोपाळ ।
ज्याचें ध्यान करिती सकळ । सुरवर स्वर्गींचे ॥ ६४॥

ऐसा देखिला शारंगधर । देवसेनेने केला नमस्कार ।
सद्गदीत होऊन परमपूर । प्रेमाचा लोटला ॥ ६५॥

देखोनि तन्मय झाली आपण । मग प्राणें केलें प्रयाण ।
धन्य धन्य तुळसीचें महिमान । याचदेहीं नारायण दाखविला ॥ ६६॥

देवदत्ते देखिला हरी । मग साष्टांग नमस्कार करी ।
त्याच क्षणामाझारी । त्याचिया प्राणें प्रयाण केलें ॥ ६७॥

तोहि झाला दिव्यदेही । हे भगवंताची कृपा पाहीं ।
धन्य धन्य पुरुष तेही । जे तत्पदीं ! मिळाले ॥ ६८॥

श्वेतदोपकथा झाली ऐसी । नारद वदे बद्रिकाश्रमासीं ।

जमदग्नीनें देखोनि त्यासी । नमस्कार केला ॥ ६९॥

बहुत तारतम्य केलें त्याचें । पूजार्चन केलें मुनीचें ।
म्हणे धन्य धन्य भाग्य आमुचें । तुमचे चरण देखिले ॥ ७०॥

कोठोनि आलेत स्वामी । तुमचे शब्दाचे आतंभूत आम्ही ।
सांगितलें पाहिजे तुम्ही । कृपा करूनियां ॥ ७१॥

देखोनि जमदग्नीचा आदर । सांगताझाला मुनीश्वर ।
श्वेतद्वीपा होनि सत्वर । आलों आतां ॥ ७२॥

उभयतांचें होतां ऐसें भाषण । तंव देवसेना आली आपण ।
नारदासीं नमस्कार करून । मस्तक चरणीं ठेविला ॥ ७३॥

नारद उठवी जंव तियेसीं । तव देवदत्त आले त्यासमयासीं ।
नमस्कार करूनि नारदासीं । सन्निध बैसला ॥ ७४॥

उभयतांसीं देखोनि नयनीं । बोलता झाला नारदमुनी ।
म्हणे ऐका हो जमदग्नी । उभयतांचे लग्न लावावें ॥ ७५॥

जमदग्नी म्हणे मुनि समर्था । जें मानलें तुमचिया चिता ।
तेंचि करणे आतां । उशीर न करावा ॥ ७६॥

मग देवदत्त आणि देवसेनेचें । मंत्रोक्त लग्न लाविलें दोघांचें ।
मनोरथ पूर्ण केले त्यांचे । नारदमुनीनें ॥ ७७॥

देवसेनेचें मनोगत । भ्रतार व्हावा देवदत्त ।
तिचाही पुरविला हेत । तुळसी देवीनें ॥ ७८॥

आतां भावपूर्वक नारी । एकनिष्ठ सेवा करी जरी ।
तरी मनकामना होईल पुरी । सत्य जाणा ॥ ७९॥

तुळसीनारायणासीं कांहीं । भिन्नता नसे पाहीं ।
भाव धरूनियां हृदयीं । सेवा करावी ॥ ८०॥

जे वस्तु भगवंतासीं प्रिय । तेथें भगवंत सर्वदा राहे ।
त्यावस्तूची सेवा केलिया पाहें । अवश्य मनोरथ पुरती ॥ ८१॥

नित्यानित्य तुळसीचें भजन । करिती पूजन अर्चन ।
नारी अथवा पुरुष जाण । त्याची ऐका फळश्रुती ॥ ८२॥

नारी सद्भावें पूजन करितां । सौभाग्य वर्धन होय तत्वतां ।
पुरुष जरी आचरतां । आयुष्य वर्द्धमान पावे ॥ ८३॥

ऐसें बद्रिकावनीं जालियावरी । नारद आला उरगाक्षी नगरीं ।
सुशील रायासीं ते अवसरीं । भेटता जाहला ॥ ८४॥

नारदासी देखोनि ते क्षणीं । राजा सुशील लागला चरणीं ।
मग पाद प्रक्षाळुनी । चरणतीर्थ घेतलें ॥ ८५॥

म्हणे धन्य धन्य भाग्य माझें । आजि चरण देखिले तुझे ।
निरसले संसारओझें । मुनिराया ॥ ८६॥

मग षोडशोपचारें केली पूजा । नारदासीं पुसताझाला राजा ।
कोठोनियां ब्रह्मात्मजा । येणें जाहलें ॥ ८७॥

बद्रिकावनींहून । प्रस्तुत आलों तेथून ।
तेथील काय वर्तमान । तें सांगें स्वामी ॥ ८८॥

परिसोन रायाचा आदर । बोलता झाला मुनेश्वर ।
म्हणे होऊनि सादर । ऐके राया ॥ ८९॥

देवदत्तासीं समर्पिली तुमची कन्या । उभयतांचें लग्न लाविलें जाणा ।
ऐसें करूनियां बद्रिकावना । आम्ही येथें पावलों ॥ ९०॥

ऐसें सांगत नारदऋषी । तंव देवदत्त आला तया समयासीं ।
समागमें घेवोनि देवसेनेसीं । भयतां आलीं ॥ ९१॥

देवसेना भेटली मातापितयांसीं । समागमें देखोनि उभयतांसीं ।
परम हर्ष झाला रायासीं । मग बोलता जाहला ॥ ९२॥

म्हणे धन्य धन्य नारदमुनी । काय सांगावी तुमची करणी ।
देवसेना येचक्षणीं । आम्हालागोनी भेटविली ॥ ९३॥

जामात आणि कन्या । आम्हासीं तुम्ही दिली जाणा ।
ऐसें म्हणोनिया चरणा । लागला नारदाच्या ॥ ९४॥

नारद म्हणे तुझे कन्येचें बहुत पुण्य । यास्तव तुमचा उद्धार झाला जाण ।
आतां वास्तव्य वैकुंठभुवन । तुझा लागी होईल ॥ ९५॥

आपुलिया वंशाभीतरीं । पुत्र अथवा पुत्री ।
तुळसीची सेवा करी जरी । तरी माता पिता उद्धरती ॥ ९६॥

तुळसीची सेवा संपूर्ण । तुझे कन्येनें केली जाण ।
अगाधपुण्याचे आचरण । घडलें तियेसीं ॥ ९७॥

ऐसें सांगूनियां नारदमुनी । गमन करिताझाला तेक्षणीं ।
प्रवेशला स्वर्गभुवनीं । निमिषामध्यें ॥ ९८॥

नारद गेलियावरी । देवदत्त रायासी विज्ञप्ती करी ।
म्हणे वैकुंठभुवनाभीतरीं । जाऊं चला ॥ ९९॥

राजा राणी देवसेना । चवथा देवदत्त जाणा ।
चवर्षे गेलीं विष्णुभुवना । दवेसेनेचे प्रसादें ॥ १००॥

संताची संगती घडे । तरी महा पातकियासीं पुण्य जोडे ।
देवसेनेचे पुण्यास्तव रोकडें । रायासीं प्राप्त झालें वैकुंठ ॥ १०१॥

ऐसी कथा इंद्रप्रह्लादासीं । देवगुरूनें सांगितली ऐसी ।
तेचि कथा तुम्हांसीं । वक्तयानें सांगितली ॥ १०२॥

येथें नाहीं जोडाजोडी शब्दाची । शुद्ध टीका संस्कृताची ।
कृपा झाली ज्ञानेश्वराची । त्यांहीं मज हें बोलिलें ॥ १०३॥

जरी धराल मानसीं । सद्भावें श्रवण कराल ग्रंथासीं ।
तरी चुकाल भवरोगासीं । विठ्ठलदास रुद्र म्हणे ॥ १०४॥

इति श्रीस्कन्दपुराणे गुरुइन्द्रप्रह्लादसंवादे तुळसीमाहात्म्ये सप्तमोऽध्यायः ॥ ७॥

## ८. अष्टमोऽध्यायः

श्रीगणेशाय नमः ।
प्रह्लाद इंद्र म्हणती । गुरुदेवा ऐक विज्ञप्ती ।
देवसेनेची कथा आम्हांप्रती । सांगीतली तुम्ही ॥ १॥

ऐकोनि पावलों समाधान । परी पुढें कैसें कथानुसंधान ।
आणखी कोण उद्धरला करितां अनुष्ठान । तुळसीदेवीचें ॥ २॥

तें सांगावें स्वामी । श्रवणें पुनीत होऊं आम्ही ।
कृपा करावी तुम्ही । उभयतांवरी ॥ ३॥

ऐकोनि त्यांची प्रभोक्ती । बोलता झाला बृहस्पती ।

म्हणे सावधान असा चितीं । पुढिले अनुसंधानासीं ॥ ४॥

उदयन राजा उज्जनींत । राज्य करी परम पुण्यवंत ।
प्रजा पाळण यथायुक्त । धर्मन्यायें करीतसे ॥ ५॥

हरिभक्तीस तत्पर । विष्णूची सेवा करी निरंतर ।
ब्राह्मणाची शुश्रूषा अग्निहोत्र । चालवी सर्वकाळ ॥ ६॥

संपत्तीसीं नाहीं मिती । दया असे सर्वां भूतीं ।
आनंदमय प्रजा नांदती । दुःख कोणाप्रती असेना ॥ ७॥

त्याची भार्या सुशीळा । धर्मासीं नटळे कोणेवेळा ।
समदृष्टी नें सकळां । सर्वदां पाहे ॥ ८॥

ऐसें असतां कित्येकदिवस । वार्धक्य प्राप्त झालें उभयतांस ।
परी वाढला नाहीं वंश । निपुत्रिक असे देखा ॥ ९॥

राजा निघाला पारधीमिसे । समागमें मंत्रीसमुदाय असे ।
लोकपालासमवेत जातसे । व्यहाळी खेळावयासीं ॥ १०॥

आपण बैसला रथावरी । ध्वजपताका हारोहारी ।
सप्त तुरंगम रथास तरी । जुंपले असती ॥ ११॥

ऐसा खेळ खेळत वनासी । रवि आला भरमध्यान्हासीं ।
तव उद्वेग उठिला मानसीं । तो ऐका ॥ १२॥

हाणे जळो जळो हे संपत्ती । मजला नाहीं पुत्रप्राती ।
ऐसा उद्वेग करितां चित्तीं । यमुनातीरासी पावला ॥ १३॥

तंव तेथें अठ्यायशीं सहस्त्र ऋषेश्वर । अनुष्ठान करिती समग्र ।
मध्यें वसिष्ठमुनेश्वर । बैसला असे ॥ १४॥

दैदीप्य तेजोमय । जयाचे तेजें अंधकार जाय ।
ज्याचे स्मरणें लोकत्रय । पुण्यवंत होती ॥ १५॥

जवळीं बैसली अरुंधती कांता । जे परमपावन पतिव्रता ।
दृष्टीसीं देखोनि उभयतां । राजा रथाखाली उतरला ॥ १६॥

साष्टांग घातलें दंडवत । हात जोडोनि उभा तिष्ठत ।
तव वसिष्ठमुनी अकस्मात । वचन काय बोलिले ॥ १७॥

म्हणे तुझी काय इच्छा आहे मानसीं । ते सांग आम्हापासीं ।
ते सिद्धी पावसी निश्चयेंसीं । चिंता न करावी ॥ १८॥

परिसोन ऋषीचें वचन । राजा बोलता झाला आपण ।
मी आहें पुत्रकृपण । अनाथ दीन तुमचा ॥ १९॥

तुमच्या आशीर्वादाची प्राप्ती । मज आहे सर्व संपती ।
परी पुत्रावीण चित्तीं । दुःखित आहें ॥ २०॥

जेणें होय पुत्रप्राप्ती । तें करीं कृपामूर्ती ।
ऐसें बोलोनि ऋषी प्रती । पुन्हा साष्टांग नमस्कार केला ॥ २१॥

जाणोनि रायाचा अभिप्रावो । बोलता झाला ऋषिरावो ।
तुज सांगतों उपावो । तो तूं करीं राया ॥ २२॥

उत्तम करीं तुळसीवृंदावन । दशशत रोपें लावीं संपूर्ण ।
तेथें शत शाळिग्रामाचें पूजन । एकसंवत्सर करावें ॥ २३॥

तुळसीचें पूजन करावयाची युक्ती । जे सांगतों ती धरावी चित्तीं ।
सद्भावें तूं निश्चिती । जप करीं ॥ २४॥

मंत्र । तुळसि श्रीसखिशुभे पापहारिणि पुण्यदे ।
नमस्ते नारदनुते । नारायणमनःप्रिये ॥

हा मंत्र बत्तीसाक्षरो । एकनिष्ठ जप करीं ।
कामना होय पुरी । सत्य जाणा ॥ २५॥

शाळिग्रामासीं करीं तुळसी अभिषेक । ऐसें करूनी घालीं उदक ।
विष्णुसहस्रनामें देख । पक्कपानें समर्पीं ॥ २६॥

ज्याज्या ऋतूचे ठायीं पुष्पें येती । तींच पुष्पें शाळिग्रामाप्रती ।
समर्पीं यथा निगुती । सांगीतल्या प्रमाणें ॥ २७॥

धूपदीप दाखवूनि नैवेद्य । समर्पोनि दक्षिणा भावशुद्ध ।
ऐसें करी एकविध । भाव धरोनी ॥ २८॥

स्त्रीसहवर्त्तमान । तुळसीचें करीं पूजन ।
प्रदक्षिणा करोनि नित्यान । एकसंवत्सर ॥ २९॥

नित्यानित्य जाण । ब्राह्मणासीं उत्तम भोजन ।
तुळसीवृंदावनीं तृप्त करीं पूर्ण । द्विजवरांसीं ॥ ३०॥

येणें मनोरथ होती पूर्ण । पुत्रफळ पावसी जाण ।
एकपुत्र होईल सुलक्षण । तुजलागीं ॥ ३१॥

पुत्र होईल त्याचें नाव ठेवीं भरत । तो परमपुरुषार्थी होईल विख्यात ।
त्याचेंनि तूं सुख पावसी बहुत । चिंता न करीं ॥ ३२॥

तुम्ही दोघें स्त्री पुरुष । तुम्हांस वार्धक्यदशा प्राप्त जालीसे ।
तुळसी सेवेनें होईल ऐसें । तें आइका ॥ ३३॥

तारुण्य येईल उभयतांसीं । वार्धक्य जाई निश्चयेसीं ।
ऐसें बोले ऋषी । रायाप्रती ॥ ३४॥

राजा म्हणे स्वामी प्रमाण । मी करीन आचरण ।
मग वंदोन ऋषीचरण । नमन साष्टांग पैं केलें ॥ ३५॥

तेथेंचि राहिला यमुनेतीरीं । स्त्री पाचारोनि आणिली झडकरी ।
सुमुहूर्त पाहूनि ते अवसरीं । आरंभ केला ॥ ३६॥

उत्तम बांधलें वृंदावन । तुळसीरोपें सहस्र लाविलीं जाण ।
मग शतशाळिग्राम आणून । पूजार्चन करिता झाला ॥ ३७॥

ऋषीनें जैसी आज्ञा केली होती । त्याप्रमाणें करी नृपती ।
राजा राणी सेवा करिती । सांगीतल्या प्रमाणें ॥ ३८॥

उभयतांचें गेलें वार्धक्य । दोघे तरुण झालीं देख ।
नवल करिती सकळ लोक । मंत्री आणि महाजन ॥ ३९॥

उभयतां झालीं द्वादश वर्षींचीं । चिंता हारली मनाची ।
सेवा करितां तुळसीची । ऐसें जाहलें ॥ ४०॥

राजा पावला तारुण्य । हर्षायमाण झाले प्रधान ।
नगरींचे सर्वही जन । आनंदमय जाहले ॥ ४१॥

तंव गर्भ राहिला राणीस । प्रसूत झाली नववे मासीं ।
पुत्र झाला तियेसीं । महा सुलक्षण ॥ ४२॥

राजा पुत्रावण करी । दान धर्म केला ते अवसरी ।
ढोल दमामे त्रहाटिल्या भेरी । निशाणीं घाव दीवला ॥ ४३॥

धन्य धन्य ऋषिदत्त । निपुत्रिक झाला पुत्रवंत ।

वार्धक्य जाऊन तारुण्य प्राप्त । ऋषिवाक्यें जाहलें ॥ ४४॥

ऐसी संतांची संगती । आशीर्वादें मनोरथ पूर्ण होती ।
म्हणोनी ईश्वराप्रती । संतसमागम मागावा ॥ ४५॥

पुत्राचें नामकरण करी नृपनाथ । नाम ठेविलें राजा भरत ।
जातक वर्णिलें नेमस्त । तथैवेळीं ॥ ४६॥

मग तेथूनि आला नगरासीं । उत्साह झाला सकळजनासी ।
उदंड द्रव्य दिधलें पाचकांसीं । रायें उदारपणें ॥ ४७॥

जरी पावला पुत्रप्रातीसीं । सोडिलें नाहीं हरिभक्तीसीं ।
नित्य पूजी शाळिग्रामासीं । पूर्वस्थितीसी टळेना ॥ ४८॥

ऐसें तुळसीचें महिमान । गुरु सांगे आपण ।
परिसतां इंद्रप्रह्लाद दोघेजण । परम सुख पावले ॥ ४९॥

तें मी सांगितले श्रोतेजनां । तुळसीमाहात्म्य परम सुरस ।
श्रवण करितां हरतील केश । विठ्ठलदास रुद्र म्हणे ॥ ५०॥

इति श्रीस्कन्दपुराणे तुळसीमाहात्म्ये अष्टमोऽध्यायः ॥ ८॥

## ९. नवमोऽध्यायः

श्रीगणेशाय नमः ।
कृतयुगीं नैमिषारण्याप्रती । अठ्यायशीसहस्र ऋषि बैसले असती ।
त्यांप्रती सूत सांगती । तुळसीमाहात्म्य ॥ १॥

स्वर्गी इंद्रप्रह्लादांप्रती । सांगताहे बृहस्पती ।
तेचि कथा श्रोतयांप्रती । वक्ता सांगताहे ॥ २॥

प्रह्लाद म्हणे गुरुनाथा । उदयनरायाची श्रवण केली कथा ।
तुळसीकवच आतां । सांगणें स्वामी ॥ ३॥

तुळसी कवच श्रवण करावयासीं । इच्छा आहे आमुचे मानसीं ।
तरी सांगावें आम्हापासीं । कृपा करोनियां ॥ ४॥

ऐसें प्रह्लाद बोलला । गुरु म्हणे भला भला ।
बरवा प्रश्न तुवां केला । तरी तुळसीकवच सांगतों ॥ ५॥

तारकासुर पापमूर्ती । पीडा करी ब्राह्मणांप्रती ।
उपद्रव देत नानारीती । ब्राह्मणांसीं देखा ॥ ६॥

ब्राह्मण परम झाले कष्टी । कैलासीं गेलें उठाउठी ।
जाऊनि घेते झाले भेटी । श्रीशंकराची ॥ ७॥

स्कंदासीं विनविलें ते अवसरीं । म्हणे स्वामी विनंती अवधारीं ।
आम्हांसीं पीडिलें भारी । तारकासुरानें ॥ ८॥

म्हणोनी आलों कैलासासीं । परंतु आमुचेनि न बोलवे शंकरासीं ।
तुम्ही कृपाळु होऊनि आम्हासीं । श्रीशिवासीं श्रुत करावें ॥ ९॥

तयांची ऐकोनि दीनवाणी । स्कंद कळवळिला मनीं ।
मग शिवाप्रती तेच क्षणीं । सांगता झाला ॥ १०॥

म्हणे ताता अवधारीं । ब्राह्मणासी पीडा झाली भारी ।
तारकासुरें ये अवसरीं । परम त्रास दीघला ॥ ११॥

ब्राह्मण होऊनि भयभीत । तुम्हांसी आले शरणागत ।
सांगावयासीं वृतांत । येथे आले ॥ १२॥

तुम्हासन्मुख न बोलवे त्यांसीं । हावृतांत सांगितला मजपासीं ।
म्यां निवेदन केला तुम्हांसीं । स्वामीनाथा ॥ १३॥

तरी हा मरे तारकासुर ब्राह्मण । सुखी राहती निरंतर ।
तोचि मज विचार । सांगा स्वामी ॥ १४॥

माझेनि तंव न मरे तारकासुर । तो तपोनिधी अपार ।
शस्त्रविद्या जाणे फार । नानाप्रकारच्या संपूर्ण ॥ १५॥

माइकविद्या समस्ता । तो जाणेजी तत्वतां ।
त्यासीं युद्ध करितां । पुरा कोणी न पडेचि ॥ १६॥

सर्व जिणोनि भूमंडळ । भाग्यें करूनि अतिप्रबळ ।
त्रासें पळाले सकळ । देव आणि राजे पृथ्वीचे ॥ १७॥

त्याच्या तपाच्या सामर्थ्ये । कोणी पराभवूं न शके त्यातें ।
माझें तों सामर्थ्य न चले तेथें । ऐसियासीं काय युक्ती करावी ॥ १८॥

परिसोन स्कंदाचें वचन । श्रीशिव बोलता झाला आपण ।
तुझा अपराध तेणें । काय केलासे ॥ १९॥

तो माझा परम भक्त । माझी विद्या त्यासीं दत्त ।
त्यावरी माझी कृपा बहुत । त्याचा द्वेष तूं कां करतोसी ॥ २०॥

हें ऐकोनि शिवाचें वचन । स्कंदें धरिले दोनी चरण ।
म्हणे परमपीडा दारुण । गोब्राह्मणासीं केली पैं ॥ २१॥

तूं तंव गोब्राह्मणपाळक । दुष्टांचा संहार करिसी देख ।
भूपाल अलोकिक तूं एक । ऐसें श्रुति बोलती ॥ २२॥

तरी हे विज्ञप्ती करावी मान्य । त्याच्या वधाचा सांगावा यत्न ।
ऐसें बोलोनियां आपण । साष्टांग नमस्कार केला ॥ २३॥

परिसोनि स्कंदाचें वचन । कृपाळू झाला त्रिनयन ।
म्हणे ऐक सावधान । ममात्मजा ॥ २४॥

माझें परमगुह्य गुज । तें मी सांगतों तुज ।
तेणें सिद्धि पावेल काज । सर्व तुझें ॥ २५॥

पूर्वी त्रिपुर मारावया कारणें । हेंच म्यां केलें अनुष्ठान ।
तोचि गुह्यार्थ तुजकारणें । सांगतसे ॥ २६॥

तुज मंत्र सांगतों आपण । त्या मंत्रे करीं अनुष्ठान ।
सर्व मनोरथ होईल पूर्ण । सत्य जाण पुत्रोत्तमा ॥ २७॥

ऐसें बोलतां स्कंदासीं । मंत्र उपदेशिला ।
श्रीशिवें स्वमुखेसीं । हा मंत्र सांगितला ॥ २८॥

मंत्र । तुळसि श्रीसखिशुभे पापहारिणि पुण्यदे ।
नमस्ते नारदनुते नारायणमनःप्रिये ॥

ऐसें बत्तीसाक्षरी मंत्रासीं । शिवें सांगितलें स्कंदासीं ।
याची फळश्रुती आहे ऐसी । ते ऐका ॥ २९॥

कोणकोणा कार्यांसीं । उपावें या मंत्रासीं ।
तेंहि सांगतों तुजपासीं । सावधान ऐकावें ॥ ३०॥

परम प्रताप होईल संकट । तेव्हां हा जप करावा एकनिष्ठ ।
तेणें हरेल अवघे दुर्घट । हा जप केलियानें ॥ ३१॥

विषमकाळ जैं येई । तेव्हां हा जप करावा पाहीं ।

विषमकाळ तो शुभ होई । ऐसें पुण्य लाहें जपें करूनी ॥ ३२॥

दुर्गम प्राप्त होय जेव्हां । हा जप करावा तेव्हां ।
येणें हरेल अवघा । दुर्गमप्रकार ॥ ३३॥

भय प्राप्त जालियावरी । हा जप करावा निर्द्धारीं ।
भय निवारेल तेंचि अवसरीं । हें सामर्थ्य मंत्राचें ॥ ३४॥

वाद प्राप्त होय जेव्हां । या मंत्र जप करावा तेव्हां ।
वाद तुटेल जाणावा । निश्चयेसीं ॥ ३५॥

महाहव्य व्हावें मानसीं । तरी जप करावा अहर्निशीं ।
हव्य होईल निश्चयेसीं । जप करितां ॥ ३६॥

मोक्ष पाहिजे जयासी । तरी पठण करावे या मंत्रासीं ।
सत्वर मोक्ष होईल तयासी । संशय नाहीं ॥ ३७॥

लक्ष्मी प्राप्त व्हावया लागुनी । जो इच्छित असेल मनीं ।
तेणें जप करावा नित्यानी । लक्ष्मी प्राप्त होईल ॥ ३८॥

जयासीं उत्तम प्रिया पाहिजे । तेणें हा जप कीजे ।
उत्तम प्रिया पाविजे । हें सामर्थ्य मंत्राचें ॥ ३९॥

यशस्वी सदा व्हावें । ऐसी इच्छा असेल भावें ।
तेणें अहर्निशीं जपावें । सिद्धि होय ॥ ४०॥

शत्रु पराभवोनि विजय । सर्वदा व्हावा जय ।
ज्याची ऐसी वासना होय । तेणें हा जप करावा ॥ ४१॥

व्याधि नसावी आपणासीं । ऐसी मनकामना ज्यासीं ।
तेणें या मंत्रासीं । जपावें जाणा ॥ ४२॥

शिरोरोग असेल ज्यासीं । त्यानें जप करावा निश्चयेसीं ।
रोग हरेल क्षणमात्रेंसीं । मुक्त होईल जाणपां ॥ ४३॥

वशीकरण जरी करणें । तरी हा मंत्र जपावा नित्यानें ।
सिद्धी पावेल जाण । मनकामना ॥ ४४॥

विद्या पाहिजे मजलागुनी । ऐसें असेल जयाचे मनीं ।
तेणें जप करावा सद्भाव धरूनी । मूर्खासीं विद्या प्राप्त होय ॥ ४५॥

दरिद्र नसावें जन्मवरी । ऐसें असेल जयाचे अंतरीं ।
तेणें हा जप करावा निर्धारीं । दरिद्र विच्छिन्न होय ॥ ४६॥

माझें पाप जावें सकळ । म्यां पुनीत व्हावें तात्काळ ।
ऐसा ज्याचा भाव असेल सबळ । त्यासीं जपाचेनि सिद्धि होय ॥ ४७॥

याच देहीं म्यां जावें स्वर्गासीं । ऐसी कल्पना असेल मानसीं ।
तेणें जपावें या मंत्रासीं । जाय स्वर्गासी संशय नाहीं ॥ ४८॥

मज पशूंची व्हावी प्राप्ती । ऐसें असेल ज्याचे चित्तीं ।
तेणें जप करावा एकाग्रचित्तीं । पशु अपार प्राप्त होती ॥ ४९॥

पुत्रप्राप्तीकारणें । जप करावा एकाग्रमनें ।
पुत्रप्राप्ती होय जाण । जपकर्त्यांसीं ॥ ५०॥

राज्यभ्रष्ट झाला नर । तेणें जप करावा धरूनी निर्धार ।
राज्य पावेल सत्वर । पुनरावृत्ति नाहीं अंतीं ॥ ५१॥

अशक्त असेल शरीरीं । तो जरी निष्ठा धरूनि जप करी ।
बलाढ्य होईल ते अवसरीं । शक्तिवंत ॥ ५२॥

विष्णुभक्तीचे ठायीं भाव असावा । हेंच देई मज देवाधिदेवा ।
ऐसी कल्पना धरूनी जपावा । हाचि मंत्र ॥ ५३॥

ज्याचा भाव बैसे भक्तीचे ठायीं । श्रीहरी कृपा करील पाहीं ।
तो विष्णूस प्रिय होईल याच देहीं । या मंत्राच्या जपानें ॥ ५४॥

ज्यांची जैसी वासना । त्यांच्या पुरतील मनकामना ।
सद्भाव धरोनियां जाणा । प्रचीत याची पाहावी ॥ ५५॥

तुळसीवन असेल अपार । तेथें उभा राहोनि जप करी नर ।
त्यासी वैकुंठ प्राप्त होईल सत्वर । कर्त्या पुरुषासीं ॥ ५६॥

जे स्त्रीचीं बाळकें मरती । तिनें जप करावा एक चित्तीं ।
तिचीं बाळकें वांचती । निश्चयेंसीं ॥ ५७॥

जे वंध्या असेल नारी । ब्राह्मणें दर्भ घेऊनि करीं ।
या मंत्रे तिच्या मस्तकावरी । उदक टाकावें ॥ ५८॥

तेणें वंध्या होय पुत्रवंती । भ्रांति न धरावी चित्तीं ।
ऐसें स्कंदाप्रती । शिवें सांगितलें ॥ ५९॥

पालाशमूळावरी । बैसोनियां जप करी ।
तरी कोड जाय निर्धारी । नर आणि नारीचें ॥ ६०॥

एकसंवत्सर आदितवारीं । पिंपळासन्निध जप करी ।
तरी पूर्ण विद्यावंत होय सत्वरीं । कर्ता देखा ॥ ६१॥

कन्येची इच्छा असेल मानसीं । तेणें हा जप करावा निश्चयेसीं ।
सुलक्षण कन्या होईल तिसीं । येणें मंत्रे ॥ ६२॥

स्त्रोसीं भ्रतार असेल वश्य करणें । तरी या मंत्राचा जप करावा तिणें ।
तरीं निश्चयें करून । भ्रतार वश्य होईल ॥ ६३॥

जारण मारण आणि स्तंभन । उच्चाटण आणि संहारण ।
याच मंत्रे होतसे जाण । जप करणें म्हणोनी हा ॥ ६४॥

रायाची कृपा व्हावी आपणावरी । म्हणोनी या मंत्राचा जप करी ।
तरी रायाची कृपा निरंतरी । कर्त्यावरी होतसे ॥ ६५॥

ऐसें श्रीशिवें स्वमुखेंसीं । सांगितलें कार्ति कस्वामीसीं ।
यामंत्रे तूं जयासीं । पावसी जाणा ॥ ६६॥

श्रीशिवें स्कंदासीं । निज गुज सांगितलें परियेसीं ।
हें करावें निश्चयेसीं । तारकाचे वधालागीं ॥ ६७॥

आतां तूं करीं अनुष्ठान । यामंत्र जप करीं पूर्ण ।
ऐसें शिवे आपण । सांगीतलें ॥ ६८॥

तंव स्कंदानें दुरात्म्यास । अनुष्ठान करूनि रात्रंदिवस ।
संहारिलें तारकासुरास । गोब्राह्मणासीं रक्षिलें ॥ ६९॥

सूत सांगती ऋषीश्वराप्रती । इंद्रप्रह्लादांप्रती सांगे बृहस्पती ।
गुरु म्हणे कवचसमाप्ती । सांगीतली तुज ॥ ७०॥

पुराणींचा इतिहास । वक्त्यानें सांगितला श्रोतियांस ।
तुळसीमाहात्म्य अगाध विशेष । विठ्ठलदास रुद्र म्हणे ॥ ७१॥

इति श्रीस्कन्दपुराणे तुळसीमाहात्म्ये नवमोऽध्यायः ॥ ९॥

# १०. दशमोऽध्यायः

श्रीगणेशाय नमः ।
महाराष्ट्र म्हणोनी न करावा अव्हेर । अवघ्यांस संस्कृताचा आधार ।
बीजावीण विस्तार । मीकाय बोलूं जाणें ॥ १॥

तुझी तो जाणते श्रोतेजन । मो तव बोलू न जाणें तुमचा दीन ।
मजवरी कृपा करोनि आपण । श्रवण केलें पाहिजे ॥ २॥

इंद्रप्रह्लाद पृच्छा करिती । गुरु सांगे तयांप्रती ।
तेंचि बोलिलों या ग्रंथीं । तुळसीमाहात्म्य ॥ ३॥

पद्मपुराणींची कथा । सावधान परिसावी श्रोतां ।
दुश्चित न व्हावें सर्वथा । ऐसी विज्ञप्ती तुम्हासीं ॥ ४॥

सद्भावें कराल पठण । तरी अगाध घडेल पुण्य ।
महादोष होती दहन । तुळसीमाहात्म्य ऐकिल्या ॥ ५॥

नैमिषारण्यीं ऋषीश्वर । बैसले असती समग्र ।
तयांसीं सूत सांगे सविस्तर । तुळसीमाहात्म्य हें ॥ ६॥

गुरु सांगे इंद्रप्रह्लादांसीं । तुळसीकवचाची कथा झाली ऐसी ।
पुढिले अनुसंधानासीं । चित्त देणें ॥ ७॥

कृष्णा नामें ब्राह्मण । ब्राह्मणयोनीत जन्मला आपण ।
परी महामूर्ख अज्ञान । लेश नाहीं ज्ञानाचा ॥ ८॥

नाहीं वेदाध्ययन । नव्हे शास्त्रपठण ।
निरर्थक जन्म गेला म्हणून । जनतयासीं हांसती ॥ ९॥

ब्राह्मण कुळीं जरीं जन्मला । ज्ञान नसतां वायां गेला ।
जैसा अजागळींचा गलोला । निरर्थक ॥ १०॥

ऐसा तो ब्राह्मण । महामूर्ख ज्ञानहीन ।
कित्येक काळ व्यर्थ गेला जाण । आयुष्याची हानि झाली ॥ ११॥

ऐसें असतां एकेदिवसीं । काष्ठे आणावया गेला वनासीं ।
भ्रमण करितां तयासीं । क्षुधेनें फार पीडिलें ॥ १२॥

तंव दृष्टीं देखिलें तुळसीवन । सहस्त्रावधी रोपें जाण ।
मग तयां मध्ये आपण । प्रवेशता जाहला ॥ १३॥

आतां भक्षीन ही तुळसीपणें । तेणें माझी क्षुधा हरेल जाण ।
ऐसें बोलूनियां आपण । पर्णे तोडिता जाहला ॥ १४॥

जंव पर्णांस घाली हात । तंव कृष्णसर्प निघाला अकस्मात ।
तेणें दंश केला त्वरित । तयालागीं ॥ १५॥

विषं प्राण झाला व्याकुळ । भूमीवरी पडिला तात्काळ ।
मूर्च्छना आली सबळ । तयालागीं ॥ १६॥

तंव त्यामार्गी अकस्मात । जात होते यमदूत ।
ते एकमेकासीं बोलत । तेसमयीं ॥ १७॥

हा परम पातकी असे मेला । यासीं घेऊनि जाऊं चला ।
सांडूनियां आपुले कुळा । जाऊं नये ॥ १८॥

ऐसें बोलून आले तयाजवळी । तो कृष्णसर्प धुःकारला तये वेळीं ।
बोलता जाहला मुखकमळीं । तयांप्रती ॥ १९॥

अरे हा तुळसी वनांत पडिला । तुळसीचा वायू यासीं स्पर्शला ।
हा परमपुण्यवंत झाला । तुम्हासीं संबंध नाहीं ॥ २०॥

म्यां यासीं केला देश । तैंच हा जाला पुण्य पुरुष ।
ऐसें बोलूनियां अदृश्य । सर्प जाहला ॥ २१॥

तंव तेच वेळीं अकस्मात । विष्णुचक्र आलें त्वरित ।
तें ब्राह्मणाचे हातांत । सांपडलें देखा ॥ २२॥

चक्र हातीं सांपडलें पाहीं । यमदूतांचें नचले कांहीं ।
मग एकमेकासीं तेसमयीं । बोलते जाहले ॥ २३॥

आतां याचा पाहों प्रांत । हा मरेल कीं पुन्हा होईल जिवंत ।
याचा पुरऊं अंत । मग आम्ही जाऊं ॥ २४॥

तुळसीच्या कृपेकरून । तात्काळ उठिला ब्राह्मण ।
हातीं चक्र असे दारुण । स्पर्श न करवे दूतांसीं ॥ २५॥

ब्राह्मण उठतां लवलाही । परमज्ञाता जाला ते समयीं ।
तुळसी महिमा न वर्णवे पाही । मूर्ख तो ज्ञाता जाहला ॥ २६॥

तुळसीवनाचा वायु स्पर्शतां । पातक संहारूनि झाला ज्ञाता ।

तुळसीप्रसादें तत्वतां । यमदूतांची वार्चा चालेना ॥ २७॥

म्हणोनी धन्य तो संसारी । जो तुळसीची सेवा करी ।
त्यापुरुषासीं श्रीहरी । कोणे काळीं नुपेक्षी ॥ २८॥

जो प्रातःकाळी उठोन । आधीं करी तुळसीचें दर्शनं ।
तरी फलश्रुती ऐसी जाण । सांगतों तुम्हासीं ॥ २९॥

त्यासीं जालें नर्मदेचं स्नान । गंगा गौतमीचें जालें दर्शन ।
आणि अगाध घडे पुण्य । प्रातःकाळच्या दर्शनें ॥ ३०॥

सायं प्रातर्मध्यान्ह । पूजा करी तो धन्यधन्य ।
त्यासी लक्ष्मीचें नाहीं न्यून । ऐसें पुराणीं बोलिलें ॥ ३१॥

पूर्वीचिया अनुसंधानीं । चित्त द्यावे श्रोतेजनी ।
स्वस्थ चित्त करूनी । करावें श्रवण ॥ ३२॥

ब्राह्मणासीं झाली ज्ञानप्राप्ती । उठोनि चालिला गृहाप्रती ।
यमदूत परस्परें ह्मणती । समागमें जाऊं याच्या ॥ ३३॥

चक्र असे ब्राह्मणाचे हातांत । म्हणोनी यमदूत अंतरें चालत ।
त्रिवर्ग पावले त्वरित । गृहा ब्राह्मणाच्या ॥ ३४॥

दारी बैसला ब्राह्मण । मग त्यासीं यमदूत करिती प्रश्न ।
आम्ही यमदूत तुज न्यावयालागुन । आलों होतीं ॥ ३५॥

परी भगवंत कृपाळु जाला । चक्र पाठविलें तुजला ।
जामुचा यत्न खुंटला । नचले कांहीं ॥ ३६॥

तरी तुज पुसतों एक । तें सांगावें प्रीतिपूर्वक ।
पूर्वील पुण्य कितीक । आहे तुझें ॥ ३७॥

त्वां पूर्वी काय केलें आचरण । तुज प्रसन्न झाला नारायण ।
हें कृपा करून । आम्हासीं सांग ॥ ३८॥

ऐकोनि प्रश्नाचा आदर । बोलता झाला द्विजवर ।
हा सकळ समाचार । तुम्हांस श्रुत आहे ॥ ३९॥

तुझांसी असे पूर्ण ज्ञान । भूत भविष्य वर्त्तमान ।
मी काय सांगों अज्ञान । तुम्ही सज्ञान जाणतसां ॥ ४०॥

ऐकोनि त्याचें प्रतिवचन । यमदूत जाले हर्षायमाण ।
मग मागतेजाले वचन । तयाप्रती ॥ ४१ ॥

तुझ्या पुण्याचा लक्षांश । आम्हास देणे यासमयास ।
ऐसें बोलोनि ब्राह्मणास । नमस्कार केला ॥ ४२ ॥

ऐसें बोलतां तयांस । कृपा उपजली ब्राह्मणास ।
लक्षांशपुण्य दिधलें त्यांस । तेसमयीं ॥ ४३ ॥

मग आज्ञा मागोनी ब्राह्मणासीं । यमदूत गेले आपुले स्थळासीं ।
ब्राह्मण करिताजाला सेवेसीं । पुनरपि तुळसीच्या ॥ ४४ ॥

उत्तम केलें वृंदावन । सहस्त्ररोप लाविलें जाण ।
कर्दळी स्तंभ लाऊन । मंडप केला ॥ ४५ ॥

भोंवत्या लाविल्या पुष्पयाती । ज्या मनोहर सुगंध असती ।
रम्यस्थल करोनि मध्यें मूर्ती । शाळिग्रामाच्या स्थापिल्या ॥ ४६ ॥

तुळसीशाळिग्रामाचें पूजन । विष्णुसहस्त्रनामें करून ।
तुळसीपत्रे वाहून । नमस्कार करी ॥ ४७ ॥

येणें करून परमजाला ज्ञाता । लक्ष्मीवंत जाला तत्वता ।
हरली संसारचिंता । भगवत्कृपा जाहली ॥ ४८ ॥

कृष्णंभट्ट ब्राम्हण । जाला वेदशास्त्री प्रवीण ।
अठरापुराणें मुखोद्गत जाण । जालीं तुळसी प्रसादें ॥ ४९ ॥

ब्राह्मणासीं जाली हे फलश्रुती । ऋषीश्वरांप्रती सूत सांगती ।
नैमिषारण्यीं बैसले असती । एकांतस्थानीं ॥ ५० ॥

हेचि कथा स्वर्गी बृहस्पती । सांगतसे इंद्रप्रह्लादांप्रती ।
ऐकोनियां चित्तीं । इंद्रप्रह्लाद संतोषले ॥ ५१ ॥

त्याच संस्कृताची टीका । श्रोतयांसी सांगीतली देखा ।
ऐकतांची परमसुखा । पात्र जाहले ॥ ५२ ॥

तुळसी माहात्म्य परमदुर्लभ असे । श्रवण करितां दिवसों दिवसें ।
लक्ष्मीवृद्धी होतसे । विठ्ठलदास रुद्र म्हणे ॥ ५३ ॥

इति श्रीस्कन्दपुराणे ऋषिसुतसंवादे तुळसीमाहात्म्ये दशमोऽध्यायः ॥ १० ॥

## ११. एकादशोऽध्यायः

श्रीगणेशाय नमः ।
ब्राह्मण जाला पुण्यपावन । करिताजाला तुळसी अनुष्ठान ।
तंव तेथें नारदाचें आगमन । अकस्मात जाहलें ॥ १॥

पुनीत देखोनियां त्यासीं । आश्रयवाटलें नारदासीं ।
म्हणे हा होता महादोषी । तुळसी सेवेनें पावन जाला ॥ २॥

तरीं धन्यधन्य तुळसीचें महिमान । ऐसें म्हणोनी केलें गमन ।
मग विष्णुलोकास जाऊन । विष्णूस भेटता जाहला ॥ ३॥

ब्राह्मणाचा सांगीतला वृतांत । महामूर्ख जाला पंडित ।
ऐसें तुळसीचें दत्त । तयासी जाहलें ॥ ४॥

परिसोनि बोले नारायण । तुळसीचें ऐसेंचि महिमान ।
मज आणि तुळसींत भिन्नपण । नाहीं जाण सर्वथा ॥ ५॥

तुळसीवेगळा मी नाहीं । मज वेगळी तुळस नराहे कदाही ।
द्वेष तुळसीचा करिती पाहीं । त्यांसीं निर्दाळीं मी स्वयें ॥ ६॥

ऐसें बोलिला भगवान । नारद विनवी आपण ।
मज सांगावें तुळसीचें अनुष्ठान । आज्ञेप्रमाणें करीन मी ॥ ७॥

तुळसीचे ठायीं नारदाची प्रीती । जडली देखोनि सांगे श्रीपती ।
पूजन सांगतों येणें रीती । तें तूं करीं आतां ॥ ८॥

उभयपक्षीं शुभवारीं । शुभौदय शुभ नक्षत्रीं ।
क्लेश निवारणार्थ ऐसें करी । तें सांगतों तुज ॥ ९॥

गृहाचे द्वारी अथवा एकांतवनीं । उभयभूमिका पाहोनी ।
उत्तम वृंदावन करूनी । सहस्रावधी रोपे लावीं ॥ १०॥

आपुली स्नान संध्या करी । नित्य नेम सारी ।
गायत्रीचा जप करी । मग आरंभ करी पूजना ॥ ११॥

सायं प्रातर्मध्याह्न । तुळसीचें ध्यान करून ।
पूजा करी एकाग्र मन । निश्चयेंसीं ॥ १२॥

आधीं करी तुळसीची प्रार्थना । करद्वय जोडोनियां जाणा ।

उभा राहोनि वृंदावना । प्रार्थना ऐसी करावी ॥ १३॥

प्रार्थना ।

नमो नमो जगद्धात्रि जगद्देवि नमोस्तुते ।
नमो नमो जगद्भूते नमस्ते परमेश्वरि ॥ १॥

ऐसी प्रार्थना करी । मग तुळसीचें ध्यान धरी ।
ध्यान सांगतों मनांतरीं । बरवें धरीं कां ॥ १४॥

ध्यानम् ।

ध्यायेच्च तुलसीं देवीं श्यामां कमललोचनाम् ।
प्रसन्नपद्मकल्हारवरदां सुचतुर्भुजाम् ॥ २॥

किरीटहारकेयूरकुंडलादिविभूषिताम् ।
धवलां सुखसंयुक्तां पद्मासनविराजिताम् ॥ ३॥

ऐसें करूनियां ध्यान । मग करी आवाहन ।
आवाहन तुज लागोन । सांगतों ऐक ॥ १५॥

आवाहनम् ।

देवि त्रैलोक्यजननि सर्वलोकैकपावनि ।
आगच्छ भगवद्देविप्रसीद तुलसि प्रिये ॥ ४॥

या मंत्र करून आवाहन । आतां तुज सांगतों आसन ।
एकाग्रचितें करून । सावधान ऐक ॥ १६॥

आसनम् ।

सर्वदेवमये देवि सवेदाविष्णुवल्लभे ।
देवि स्वर्णमयं दिव्यं गृहाणासनमव्ययम् ॥ ५॥

ऐसें जालिया आसन । मग करी पादार्चन ।
पादार्चन करावयाचा मंत्र जाण । सांगतों तुज ॥ १७॥

पाद्यम् ।

सर्वदेवमयाकारे सर्वदेवि मनोस्तुते ।
दत्तं पाद्यं गृहाण त्वं तुलसि त्वं प्रसीद मे ॥ ६॥

यामंत्र जालिया पादार्चन । मग अर्घ्य समर्पावें जाण ।
आतां अर्घ्याचा मंत्र आपण । सांगतों तुज ॥ १८॥

अर्घ्यम् ।

सर्वतीर्थमये देवि सर्वागमनिषेविते ।
इदमर्घ्यं गृहाण त्वं देवि दैत्यांतकप्रिये ॥ ७॥

ऐसें अर्घ्य जालियावरी । आचमन सांगतों तें अवधारीं ।
नारदाप्रती स्वयें श्रीहरी । सांगताहे ॥ १९॥

आचमनम् ।

सर्वलोकस्य रक्षार्थं सदा सन्निधिकारिणी ।
गृहाणाचमनं देवि प्रीत्यर्थं परमेश्वरि ॥ ८॥

ऐसें आचमन जालियावरी । स्नानाचा मंत्र अवधावरीं ।
सांगतों तो मनांतरी । दृढ घरीं ॥ २०॥

स्नानम् ।

गंगादिभ्यो नदीभ्यश्च समानीतमिदं जलम् ।
स्नानार्थं तुलसि स्वच्छं प्रीत्यर्थं प्रतिगृह्यताम् ॥ ९॥

मंदाकिनी गौतमी च यमुना च सरस्वती ।
गोमती नर्मदा तापी ताभ्यः स्नानार्थमाहृतम् ॥ १०॥

नदीनदसमुद्भूतं पवित्रं निर्मलं जलम् ।
स्नानार्थं तुलसी मातः प्रीत्यर्थं प्रतिगृह्यताम् ॥ ११॥

स्नानाचा मंत्र सांगीतला । वस्त्रे वाहावया सांगतों तुला ।
या मंत्रे वस्त्रे समर्प वहिला । तुळसी देवीसीं ॥ २१॥

वस्त्रम् ।

क्षीरोदमथनोत चंद्रलक्ष्मीसहोदरम् ।
गृह्यतां परिधानार्थमिदं क्षौमांबरं शुभम् ॥ १२॥

ऐसें वाहिल्यावरी वस्त्र । आतां गंधाचा ऐक मंत्र ।
सांगतों तुज सविस्तर । तो अवधारीं ॥ २२॥

गंध ।

श्रीखंड कुंकुमं दिव्यं कर्पूरागरुसंयुतम् ।
कल्पितं च महादेवि प्रीत्यर्थे प्रतिगृह्यताम् ॥ १३॥

ऐसें गंध समर्पिल्यावरी । अक्षतेचा मंत्र अवधारी ।

सांगतों तुज निर्धारीं । तो ऐकपां ॥ २३॥

अक्षताः ।

अक्षताश्च सुरश्रेष्ठाः कुंकुमाक्ताः सुशोभिताः ।
मया निवेदिता भक्त्या गृहाण परमेश्वरी ॥ १४॥

अक्षतेचा मंत्र सांगीतला । सौभाग्य द्रव्य अर्पील्यावरी ।
त्याचा मंत्र तुजला । सांगतों ऐक ॥ २४॥

सोभाग्यद्रव्यम् ।

हरिद्रा कुंकुमं चैव कज्जलं सिंदुरं तथा ।
सौभाग्यद्रव्यं प्रीत्यर्थं गृहाण परमेश्वरि ॥ १५॥

कंठसूत्रं ताडपत्रं तथैव पादभूषणम् ।
नासामोक्तं चांजनं च अर्पितं ते सुरेश्वरि ॥ १६॥

सौभाग्यद्रव्य अर्पिल्यावरी । पुष्पें समर्पा ते अवसरीं ।
त्याचा मंत्र निर्धारीं । सांगतों तुज ॥ २५॥

पुष्पम् ।

नीलोतल सुकल्हारमालत्यादीनि शोभने ।
गधवंति च पद्मानि पुष्पाणि प्रतिगृह्यताम् ॥ १७॥

आतां धूपाचा मंत्र तुजप्रती । सांगतों तो धरून चित्तीं ।
धूप समर्पी ऐसिया रीती । तुळसी देवीसीं ॥ २६॥

धूपम् ।

देवि गृहाण देवेशि मनोहारि सुगुग्गुलम् ।
आज्यमिश्रं तु तुलसि प्रीत्याऽभीष्टप्रदायिनि ॥ १८॥

ऐसा धूप समर्पिल्यावरी । दीप दाखवीं ते अवसरीं ।
तो मंत्र अवधारीं । एकचित्तें ॥ २७॥

दीपम् ।

अज्ञानतिमिरांधस्य ज्ञानदीपप्रदायिनि ।
तथैव तुलसि प्रीत्या दीपोयं प्रतिगृह्यताम् ॥ १९॥

दीप समर्पिल्यावरी । नैवेद्याचा मंत्र अवचारीं ।
सांगतों या अवसरी । तुजकारणें ॥ २८॥

नैवेद्यम् ।

नमस्ते जगतां नाथे प्राणिनां प्रियदर्शने ।
यथाशक्ति मया दत्तं नैवेद्यं प्रतिभृत्यताम् ॥ २०॥

ऐसा नैवेद्य समर्पण करीं । मग उदक सोडावें भूमी वरी ।
तयाचा मंत्र याप्रकारीं । म्हणावा ॥ २९॥

उदकम् ।

नमो भगवति श्रेष्ठे नारायणि जगन्मये ।
शीतल विमलं नीरं तुलसि प्रतिगृह्यताम् ॥ २१॥

यापरी उदक समर्पोनि । तांबूल समर्प तुळसीलागुनी ।
त्याचा मंत्र श्रवणीं । ऐक आतां ॥ ३०॥

तांबूलम् ।

अमृता मृतसंभूतं तुलस्यमृतरूपिणि ।
कर्पूरादिसमायुक्तं तांबूलं प्रतिगृह्यताम् ॥ २२॥

या नंतरें समर्पी दक्षिणा । याचा मंत्र सांगतों जाणा ।
सावधान करोनि अंतःकरणा । ऐक आतां ॥ ३१॥

दक्षिणा ।

दक्षिणां दक्षिणकरे भक्तानां प्रियकारिणि ।
ददामिते सदा भक्तया तुलसि प्रतिगृह्यताम् ॥ २३॥

ऐसी दक्षिणा समर्पिल्यावरी । उत्तरनीराजन करीं ।
त्याचा मंत्र अवधारीं । सांगतों तुज ॥ ३२॥

नीराजनम् ।

करोद्वर्ति सदीपं च तिमिरस्य निवारणम् ।
सौवर्णं च मया दत्तमार्तिक्यं प्रतिगृह्यताम् ॥ २४॥

ऐसें नीराजन समर्पी । मग पुष्पांजली अर्पी ।
तो मंत्र साक्षेपीं । ऐक आतां ॥ ३३॥

मन्त्रपुष्पम् ।

नानाविधानि पुष्पाणि सुगंधीनि सुरेश्वरि ।
भतस्त्वां पूजयिष्यामि गृत्यतां सुमनोंजलिः ॥ २५॥

मंत्रपुष्पांजली जाहल्यावरी । मग प्रदक्षिणा करीं ।
त्याचा मंत्र अवधारीं । सांगतों तुज ॥ ३४॥

प्रदक्षिणा ।
नमो नमो जगद्धात्रि जगद्देवि नमो नमः ।
नमो नमो जगद्भूतिर्नमस्ते परमेश्वरि ॥ २६॥

प्रदक्षिणा जाहलियावरी । मग साष्टांग नमस्कारकरी ।
नम स्काराचा मंत्र ये अवसरीं । सागतों तुज ॥ ३५॥

नमस्कारः ।
प्रसीद मम देवि त्वं कृपया परया सदा ।
अभीष्टफलसिद्धिं च कुरुमे माधवप्रिये ॥ २७॥

ऐसा नमस्कार केलियावरी । प्रार्थना करी जोडल्या करीं ।
मग प्रसन्न होईल सत्वरी । तुळसी तुजकारणें ॥ ३६॥

प्रार्थनेचा मंत्र श्रीपती । सांगता झाला नारदात्रती ।
म्हणे एकाग्रचित्तीं । ऐक आतां ॥ ३७॥

प्रार्थना ।
भद्रे त्वामर्चयेन्नित्यं प्रातरेव शुचिर्नरः ।
मध्यान्हे त्वां च सायान्हे मुक्तिमुक्तिप्रदां सदा ॥ २८॥

सर्वोपचारैरथवा चातुर्मास्ये विशेषतः ।
पूजयेत्तुलसीं देवीं मद्रूपफल सिद्धये ॥ २९॥

ऐसें नारदमुनीसीं । स्वमुखें सांगीतले हृषीकेशीं ।
तेंचि कथा ऋषीश्वरांसीं । सूत सांगताहे ॥ ३८॥

स्वर्गी इंद्रप्रह्लादासीं । गुरु सांगे आदरेसीं ।
परिसतां उभयतां मानसीं । परमसंतोष जाहला ॥ ३९॥

त्याचपरी श्रोतयांस । विज्ञप्ती करूनि सांगतसे सुरस ।
उदास न धरावें मानस । विठ्ठलदास रुद्र म्हणे ॥ ४०॥

इति श्रीस्कन्दपुराणे तुलसीमाहात्म्ये एकादशोऽध्यायः ॥ ११॥

तुलसी पूजा
प्रार्थना ।

नमो नमो जगद्धात्रि जगद्देवि नमोस्तुते ।
नमो नमो जगद्भूते नमस्ते परमेश्वरि ॥ १॥

ध्यानम् ।

ध्यायेच्च तुलसीं देवीं श्यामां कमललोचनाम् ।
प्रसन्नपद्मकल्हारवरदां सुचतुर्भुजाम् ॥ २॥

किरीटहारकेयूरकुंडलादिविभूषिताम् ।
धवलां सुखसंयुक्तां पद्मासनविराजिताम् ॥ ३॥

आवाहनम् ।

देवि त्रैलोक्यजननि सर्वलोकैकपावनि ।
आगच्छ भगवद्देविप्रसीद तुलसि प्रिये ॥ ४॥

आसनम् ।

सर्वदेवमये देवि सवेदाविष्णुवल्लभे ।
देवि स्वर्णमयं दिव्यं गृहाणासनमव्ययम् ॥ ५॥

पाद्यम् ।

सर्वदेवमयाकारे सर्वदेवि मनोस्तुते ।
दत्तं पाद्यं गृहाण त्वं तुलसि त्वं प्रसीद मे ॥ ६॥

अर्घ्यम् ।

सर्वतीर्थमये देवि सर्वागमनिषेविते ।
इदमर्घ्यं गृहाण त्वं देवि दैत्यांतकप्रिये ॥ ७॥

आचमनम् ।

सर्वलोकस्य रक्षार्थं सदा सन्निधिकारिणी ।
गृहाणाचमनं देवि प्रीत्यर्थं परमेश्वरि ॥ ८॥

स्नानम् ।

गंगादिभ्यो नदीम्पश्च समानीतमिदं जलम् ।
स्नानार्थं तुलसि स्वच्छं प्रीत्यर्थं प्रतिगृह्यताम् ॥ ९॥

मंदाकिनी गौतमी च यमुना च सरस्वती ।
गोमती नर्मदा तापी ताभ्यः स्नानार्थमाहृतम् ॥ १०॥

नदीनदसमुद्भूतं पवित्रं निर्मलं जलम् ।
स्नानार्थं तुलसी मातः प्रीत्यर्थं प्रतिगृह्यताम् ॥ ११॥

वस्त्रम् ।

क्षीरोदमथनोत चंद्रलक्ष्मीसहोदरम् ।
गृह्यतां परिधानार्थमिदं क्षौमांबरं शुभम् ॥ १२॥

गंध ।

श्रीखंड कुंकुमं दिव्यं कर्पूरागरुसंयुतम् ।
कल्पितं च महादेवि प्रीत्यर्थे प्रतिगृह्यताम् ॥ १३॥

अक्षताः ।

अक्षताश्च सुरश्रेष्ठाः कुंकुमाक्ताः सुशोभिताः ।
मया निवेदिता भक्त्या गृहाण परमेश्वरी ॥ १४॥

सोभाग्यद्रव्यम् ।

हरिद्रा कुंकुमं चैव कज्जलं सिंदुरं तथा ।
सौभाग्यद्रव्यं प्रीत्यर्थं गृहाण परमेश्वरि ॥ १५॥

कंठसूत्रं ताडपत्रं तथैव पादभूषणम् ।
नासामोक्तं चांजनं च अर्पितं ते सुरेश्वरि ॥ १६॥

पुष्पम् ।

नीलोतल सुकल्हारमालत्यादीनि शोभने ।
गधवंति च पद्मानि पुष्पाणि प्रतिगृह्यताम् ॥ १७॥

धूपम् ।

देवि गृहाण देवेशि मनोहारि सुगुग्गुलम् ।
आज्यमिश्रं तु तुलसि प्रीत्याऽभीष्टप्रदायिनि ॥ १८॥

दीपम् ।

अज्ञानतिमिरांधस्य ज्ञानदीपप्रदायिनि ।
तथैव तुलसि प्रीत्या दीपोयं प्रतिगृह्यताम् ॥ १९॥

नैवेद्यम् ।

नमस्ते जगतां नाथे प्राणिनां प्रियदर्शने ।
यथाशक्ति मया दत्तं नैवेद्यं प्रतिभृत्यताम् ॥ २०॥

उदकम् ।

नमो भगवति श्रेष्ठे नारायणि जगन्मये ।

शीतल विमलं नीरं तुलसि प्रतिगृह्यताम् ॥ २१॥

तांबूलम् ।

अमृता मृतसंभूतं तुलस्यमृतरूपिणि ।
कर्पूरादिसमायुक्तं तांबूलं प्रतिगृह्यताम् ॥ २२॥

दक्षिणा ।

दक्षिणां दक्षिणकरे भक्तानां प्रियकारिणि ।
ददामिते सदा भक्तया तुलसि प्रतिगृह्यताम् ॥ २३॥

नीराजनम् ।

करोद्वर्ति सदीपं च तिमिरस्य निवारणम् ।
सौवर्णं च मया दत्तमार्तिक्यं प्रतिगृह्यताम् ॥ २४॥

मन्त्रपुष्पम् ।

नानाविधानि पुष्पाणि सुगंधीनि सुरेश्वरि ।
भतस्त्वां पूजयिष्यामि गृत्यतां सुमनोंजलिः ॥ २५॥

प्रदक्षिणा ।

नमो नमो जगद्धात्रि जगद्देवि नमो नमः ।
नमो नमो जगद्भूतिर्नमस्ते परमेश्वरि ॥ २६॥

नमस्कारः ।

प्रसीद मम देवि त्वं कृपया परया सदा ।
अभीष्टफलसिद्धिं च कुरुमे माधवप्रिये ॥ २७॥

प्रार्थना ।

भद्रे त्वामर्चयेन्नित्यं प्रातरेव शुचिर्नरः ।
मध्यान्हे त्वां च सायान्हे मुक्तिमुक्तिप्रदां सदा ॥ २८॥

सर्वोपचारैरथवा चातुर्मास्ये विशेषतः ।
पूजयेत्तुलसीं देवीं मद्रूपफल सिद्धये ॥ २९॥

## १२. द्वादशोऽध्यायः

श्रीगणेशाय नमः ।
नैमिषारण्यीं ऋषीश्वर । बैसले असती समग्र ।

ते पुमते झाले सर्वत्र । सूतालागीं ॥ १॥

स्वामी तुळसी उत्पन्न । जाहली कोठून याचे कैसें आहे आख्यान ।
तें सांगावें निरोपण । कृपानिधि ॥ २॥

आणिक इचें महिमान । तेंही सांगावें आपण ।
श्रवणें तृप्त आमुचे कर्ण । करा ऐसें बोलिले ॥ ३॥

तेसमयीं सन्निध होता शतानंद । सूताचा शिष्य वेदविद ।
बोलता झाला गुणानुवाद । तुळसीदेवीचे ॥ ४॥

प्रातःकाळी घडे तुळसीचे दर्शन । तरी सहस्त्र गोदानाचें पुण्य ।
लक्ष्मी राहे संपूर्ण । तया पुरुषाचे घरीं ॥ ५॥

जो प्रातःकाळीं नित्य करी दर्शन । त्यासीं आणीक हो प्राप्ती आहे जाण ।
स्वामी ऐका चित्त देऊन । बोलणें माझें ॥ ६॥

अशक्त होय बळिवंत । देहींचे रोग नासती समस्त ।
परम होय पुण्यवंत । निश्चयेसीं ॥ ७॥

शतानंदाचे इतके झालें बोलणें । मग सूत सांगते झाले आपण ।
म्हणती स्वस्थ करू नियां मन । तुळसी आख्यान ऐकावें ॥ ८॥

क्षीरसमुद्रीं होतीं चतुर्दश रत्नें । ती काढावयासी केला यत्न ।
तें सांगतों जाण । तुम्हांप्रती ॥ ९॥

बिरडी केली वासुकीचीं । रवी केली मेरूची ।
युक्ती केली घुसळणाची । ऐशा प्रकारें ॥ १०॥

एकीकडे धरिती सुरवर । एकीकडे लागले असुर ।
घुसळण करूनियां सत्वर । रत्नें चतुर्दश काढिलीं ॥ ११॥

लक्ष्मी कौस्तुभ पारिजातक । सुरा धन्वंतरी चंद्रमा देख ।
ऐसी ही साहा झालीं ऐक । आणिक सांगतों ॥ १२॥

कामधेनु ऐरावत । रंभा देवांगना नेमस्त ।
अश्व सप्तमुखी शोभत । ऐसी दशक जाहलीं ॥ १३॥

विष धनुष्य आणि शंख । चवदावें अमृत देख ।
ऐसीं चतुर्दश रत्ने अमोलिक । काढिलीं देखा ॥ १४॥

ऐसीं काढिलीं चतुर्दश रत्नें । देव दैत्य विभाग करिते झाले जाण ।
कोणी घेतले कोण कोण । तें सांगतों तुझा ॥ १५॥

शंकरें घेतलें चंद्रमा विष । कौस्तुभ शंख लक्ष्मी विष्णूस ।
अमृत दोधलें देवांस । तयेवेळीं ॥ १६॥

पांच प्राप्त झालीं इंद्रासी । पारिजातक रंभा धनुष्यासीं ।
ऐरावत कामधेनूसीं । घेता झाला ॥ १७॥

सुरा दीघली दैत्यांसीं । उच्चैःश्रवा दीघला सूर्यासीं ।
धन्वंतरी स्वर्गासीं । राहिला देखा ॥ १८॥

ऐसा चतुर्दश रत्नांचा विभाग केला । विष्णु परमसंतोषी झाला ।
आनंदें करूनी डोलों लागला । तयेवेळीं ॥ १९॥

विष्णूची परमतृप्ती झाली । नेत्रांतून आसुवें बाहेर पडलीं ।
त्यांतून तुळसी निघाली । तात्काळ जाणा ॥ २०॥

शामवर्ण चतुर्भुज । कर्णीं कुंडलें सतेज ।
नेत्र कमळाकार सहज । असती देखा ॥ २१॥

ऐसें देखोनि तियेसीं । विष्णूनें आलिंगिली हृदयासीं ।
परम होउनी संतोषो । तिजप्रती बोलता झाला ॥ २२॥

तुळसीसीं करितां भाषण । स्वर्गीं सुरवर पाहती आपण ।
काय बोलतो नारायण । तें श्रवण करूं आम्ही ॥ २३॥

तंव बोले नारायण । तुजहून प्रिय आणीक नाहीं जाण ।
तूं माझी वडभा पूर्ण । हें सत्य वचन जाण पैं ॥ २४॥

आणीक ऐक तुळसी देवी । अखंड तूं मजपासीं असावी ।
प्रीति माझी असे आघवी । तुझे ठाई ॥ २५॥

तुजवीण मज दुर्लभ नसे । तुझे ठाई माझा परम संतोष ।
म्हणोनी धरून हृदयास । पुन्हां आलिंगिली ॥ २६॥

आणीक बोले लक्ष्मीकांत । तुळसी तूं ऐक निश्चित ।
तुज सांगतों यथार्थ । प्रीतिपूर्वक ॥ २७॥

नानापुष्पजाती असती । त्यांची पुष्पें मज समर्पिती ।
तेही माझे भक्त होती । यथार्थ जाणा ॥ २८॥

मुक्ताफळांनी पूजा करिती । सुवर्णपुष्पें मज वाहती ।
तेही भक्त मज प्रिय होती । यथार्थ जाणा ॥ २९॥

नानाप्रकारचीं रत्ने । पूजा करिती समर्पणें ।
रौप्यपुष्पें वाहती जाण । मजकारणें प्रीति करूनी ॥ ३०॥

परी संतुष्ट नसें तुझे पत्रावीण । ऐसा माझा भाव पूर्ण ।
तुज सांगतों जाण । निश्चयेसीं ॥ ३१॥

आणि सुवर्णाचे पर्वत । रत्नांच्या लाखोल्या वाहती नित्य ।
पुण्याचे पर्वत सदोदित । स्फटिकरत्नां मिती नाहीं ॥ ३२॥

इतुक्यांचें फळ सांगतों देख । सद्भावें वाहतां तुझें पत्र एक ।
तुझ्या तों पत्रावांचून आणीक । मज प्रिय नाहीं ॥ ३३॥

ऐसें तुझे ठाई माझें मन । बोलोनी तुळसीपत्रांची माळ घातली जाण ।
कंठापासोनि पादांगुष्ठ प्रमाण । तयेवेळीं ॥ ३४॥

मग होऊनि हर्षायमान । म्हणे तूं माग कांहीं वरदान ।
मागसील तें देईन । तुजलागीं येसमई ॥ ३५॥

ऐसें बोलिला सर्वेश्वर । मग तुळसी मागती झाली वर ।
तोही ऐका सादर । चित्त देऊनियां ॥ ३६॥

म्हणे शंकराची तुझी प्रीती माझे ठाई । अखंड असावी पाहीं ।
मजवीण आणीक कांहीं । तुम्हांसी दुर्लभ नसावें ॥ ३७॥

आणीक मागतें देवाधिदेवा । तें मज देई गा केशवा ।
ऐसें बोलोनि तेव्हां । विनविती जाहली ॥ ३८॥

माझें रोप लावोनि जो करी पाळण । त्याचें किल्मिष जाईल निर्दाळून ।
स्वर्गलोकाची प्राप्ती त्याकारणें । केली पाहिजे ॥ ३९॥-२
जो करील माझें वृंदावन । उदक घालील नित्यान ।
त्यासीं वैकुंठवास आपण । दीवला पाहिजे ॥ ४०॥

जो नित्य करील माझें पूजन । नैवेद्य दाखवी दीप लाऊन ।
त्यासीं आपुली समता पूर्ण । दोधली पाहिजे ॥ ४१॥

अखंड वंदी माझें तीर्थ । प्रदक्षिणा करील सात ।

त्यासीं आपुली स्वरूपता निभ्रांत । दीधली पाहिजे ॥ ४२॥

महापातकी असेल निभ्रांत । तो माझी सेवा करील एकचित्त ।
त्यासीं करावें पुण्यवंत । देवाधिदेवा ॥ ४३॥

पापाचे पर्वत जाहले असती । तुझें नाम स्मरण जे न करिती ।
अंतीं त्यांचे मुखीं घालिती । एकपर्ण माझें ॥ ४४॥

त्यांसीं द्यावी उत्तम गती । मुक्ती द्यावी निश्चिती ।
माझी सेवा जे करिती । तयांलागीं ॥ ४५॥

चतुर्मास मजपासीं लाविती दीप । माझी पूजा करिती साक्षेप ।
त्यांसी लक्ष्मी द्यावी अमूप । स्वामिनाथा ॥ ४६॥

जो अखंड करी माझें भजन । त्यावरी आपण कृपा करावी पूर्ण ।
ऐसें मागीतलें वरदान । तुळसीदेवीनें ॥ ४७॥

विष्णु म्हणे तथास्तु । तुझे पुरतील मनोरथु ।
ऐसें बोलोनि अकस्मातु । विष्णु अदृश्य जाहला ॥ ४८॥

स्वर्गीं सकळ सुरवर । आश्चर्य करिती थोर ।
म्हणती तुळसी सवें अपार । भगवंत बोलिला ॥ ४९॥

धन्य धन्य भाग्य तुळसीचें । महिमान न वर्णवे इवें ।
ऐसें बोलोनियां वाचे । देव गेले निजधामा ॥ ५०॥

ऐसी कथानैमिषारण्यासीं । सूत सांगती ऋषीश्वरांसी ।
तुळसीची उत्पत्ति जाहली ऐसी । ते सांगीतली तुम्हांप्रती ॥ ५१॥

स्वर्गीं इंद्र प्रह्लादासीं । गुरु सांगे उभयतांसीं ।
श्रवण करितां मानसीं । उभयतांसीं संतोष ॥ ५२॥

त्यांचीं उच्छिष्ट उत्तरें ऐसीं । प्राप्त जाहलीं वक्तयासीं ।
तींच श्रुत केलीं श्रोतयांसीं । श्रवणें दग्ध होती महादोष ॥ ५३॥

भाव धरोनि मानसीं । जो श्रवण करील तुळसी माहात्म्यासीं ।
त्यासीं कृपा करील हृषीकेशी । विठ्ठलदास रुद्र म्हणे ॥ ५४॥

इति श्रीस्कन्दपुराणे तुळसीमाहात्म्ये द्वादशोऽध्यायः ॥ १२॥

## १३. त्रयोदशोऽध्यायः

श्रीगणेशाय नमः ।
नैमिषारण्यों सकळ ऋषीश्वर । सूताप्रति बोलती समग्र ।
तुळसीचे कीर्त्तीचा विस्तार । आम्हांस सांगीतला पाहिजे ॥ १॥

परिसोनि ऋषीश्वरांची प्रश्नोक्ती । सूत सांगती तयांप्रती ।
सावधान होऊनि चित्तीं । श्रवण करावें ॥ २॥

सूत म्हणती तुळसीचीं दोन रूपें । तेजोमय दिव्य स्वरूपें ।
कैसीं जाणाल साक्षेपें । सांगतों तुम्हां ॥ ३॥

एक श्यामवर्ण । दुसरें शुभ्र संपूर्ण ।
परी दोहीं रूपांचे ठाई नारायण । सर्वदां असे ॥ ४॥

दोनी रूपें सांगीतलीं निर्धार । आतां सांगतों कीर्त्तीचा विस्तार ।
श्रवण करितां भवरोग दुस्तर । निरसे देखा ॥ ५॥

प्रत्यहीं आपादतळमस्तका । तुळसीचे खालील मृत्तिका ।
सर्वांगासीं लावितां देखा । सर्व पापें भस्म होती ॥ ६॥

जरी निरंतर भक्षी पर्ण । तरी त्यासीं घडे सहस्त्र गोदान ।
परमपुण्यात्मा होय आपण । भक्षितां नर ॥ ७॥

नित्य तीर्थ प्राशन करी । तो पुण्यपावन होय संसारीं ।
विष्णुलोकी निरंतरीं । करी वास्तव्य ॥ ८॥

शाळिग्रामासीं तुळसीपर्ण । समर्पिल्या वीण न घे अन्न ।
ऐसा ज्याचा नेम पूर्ण । त्याची फळश्रुती ऐका ॥ ९॥

लक्ष्मी निरंतर राहे घरीं । दिव्यदेही होय शरीरीं ।
अंतकाळीं वास्तव्य करी । विष्णुभुवनीं ॥ १०॥

सर्व पाकनिष्पत्ति जालियावरी । तुळसीपत्रे तीर्थ प्रोक्षी वरी ।
तो नैवेद्य शाळिग्रामासीं समर्पी जरी । तरी तृप्त होय भगवान ॥ ११॥

कर्त्यां पुरुषासीं नाहीं अभावना । पुत्र पौत्र संपूर्ण धन धान्या ।
पावोनियां जाणा । विष्णुपद प्राप्त होय ॥ १२॥

तुळसी वृंदावनीं करी श्राद्ध । तरी त्यासीं पुण्य घडे अगाध ।
एके श्राद्धी दश श्राद्धे । जालीं त्याचीं ॥ १३॥

पतिव्रतेसीं नलगे आणिक उपाव करावा । तिसीं दुर्लभ पतिसेवा ।
पतिसेवेची देवाधिदेवा । आवडी मोठी ॥ १४॥

परी तिनें सेवा तुळसीची करितां । सद्भावें प्रदक्षिणा घालितां ।
हळदी कुंकुम सुवासिनीसीं समर्पितां । सौभाग्यवर्धन होय तिचें ॥ १५॥

पुत्रांसी भक्ति माता पित्यांची । गरज नाहीं इतर साधनांची ।
जे जे पदार्थों वासना त्यांची । पुरविता मी होय ॥ १६॥

दुर्लभ सेवा गोब्राह्मणांची । अखंड सेवा दोंठाई ज्याची ।
त्यासीं प्राप्ती होय सर्वसिद्धींची । येणेंची करूनी ॥ १७॥

परम दुर्लभ विष्णूची भक्ती । ऐसा भाव धरून चितीं ।
सेवा कर्त्यांसीं होय प्राप्ती । सायुज्यता ॥ १८॥

शिष्यासीं दुर्लभ गुरूची सेवा । गुरुसेवेनें पावे परतीरठेवा ।
सदा स्वरूपी होईल राहवा । गुरुसेवेनें ॥ १९॥

जैसी ही दुर्लभ आघवी । तैसीच तुळसीची सेवा जाणावी ।
सर्व मनकामना पुरवी । तुळसी देवी ॥ २०॥

यास्तव श्रीरामें सरयूतीरीं । सेवा केली बहुत दिवसवरी ।
ज्ञान व्हावें मज अंतरीं । सर्वकाळ ॥ २१॥

मग तुळसी होऊनि प्रसन्न । देती जाहली वरदान ।
अपार दीधलें ज्ञान । रामचंद्रासीं ॥ २२॥

दुसरें अनुष्ठान । श्रीरामें केलें आपण ।
सीताशुद्धी करोनि रावण कुंभकर्ण । निर्दाळावया ॥ २३॥

श्रीरामें करितां अनुष्ठान । पूर्णता जाहली परिपूर्ण ।
मग तुलसी होऊनि सुप्रसन्न । वर देती जाहली ॥ २४॥

श्रीरामा तुझे मनोरथ । सर्व पूर्ण होतील यथार्थ ।
ऐसा बोलोनि वाक्यार्थ । आशीर्वाद दीघला ॥ २५॥

हनुमंत म्हणे तुळसी देवी । मज सीताशुद्धी व्हावी ।
श्रीरामकृपा संपादावी । तात्काळ देखा ॥ २६॥

शुद्धी करोनि म्यां व्हावें विजयी । पुनरपि रामासीं सांगावया येई ।

हेंच मज देई । म्हणोनी अनुष्ठान केलें ॥ २७॥

मग तुळसी प्रसन्न झाली तेसमयीं । हाणे तुझी कार्यसिद्धी झाली पाहीं ।
चिंता न करीं कांहीं । विजयी होसी हनुमंता ॥ २८॥

श्रीरामशरें पडिला वाळी । तारा नमन करी तेवेळीं ।
म्हणे पुन्हा खंडावी जन्मावळी । प्राणनाथाची ॥ २९॥

मिळणी होय सायुज्यतेसीं । पुन्हा येणें नलगे गर्भवासी ।
ऐसिया अनुष्ठानासीं । करूं आतां ॥ ३०॥

मग तुळसीचें करूनि अनुष्ठान । वर मागीतला आपण ।
म्हणे पतीचें येणें जाणें । चुकवीं माते ॥ ३१॥

मग प्रसन्न झाली तुळसी । म्हणे पुनर्जन्म नाहीं वाळीसीं ।
ऐसें बोलोनि त्या समयासीं । तुळसी अदृश्य जाहली ॥ ३२॥

याचपरी तुळसीचें अनुष्ठान । केलें कृष्ण कामना धरून ।
तें मी सांगतों तुम्हां लागुन । ऐका आतां ॥ ३३॥

गोमतीचे तीरीं । उत्तम वृंदावन केलें झाडकरी ।
सहस्र रोप लाविले ते अवसरीं । श्रीकृष्णनायें ॥ ३४॥

म्हणे दोन संकल्प माझे मानसीं । ते मी सांगतों तुजपासीं ।
चित्त देऊनि परीयेसीं । तुळसी देवी ॥ ३५॥

कंसाचें करावें निर्दाळण । गोकुळ रक्षावें आपण ।
हाचि मज वर देई जाण । म्हणोनी अनुष्ठान करिता झालों ॥ ३६॥

श्रीकृष्णें एकचित्तें । अनुष्ठान केलें दिवस बहुत ।
मग तुळसी मूर्तिमंत । भेटती जाहली ॥ ३७॥

उभयतांसीं झालें आलिंगन । आलिंगिली परम प्रीतीकरून ।
मग बोलती झाली वचन । श्रीहरीप्रती ॥ ३८॥

तुमचे पुरतील मनोरथ । कंसासीं माराल निभ्रांत ।
गोकुळ रक्षाल त्वरित । निश्चयेंसीं ॥ ३९॥

ऐसें दीधलें वरदान । संतोष पावला जगज्जीवन ।
मग बोलता जाहला आपण । तुळसीप्रती ॥ ४०॥

म्हणे जितुके ठायीं माझा वस्ती । तें मी सांगतों तुजप्रती ।
श्रवण करीं एकचित्तीं । दुश्चिंतन व्हावें ॥ ४१॥

क्षीरसागरीं माझें स्थान । वैकुंठ हें माझें भुवन ।
मध्यान्हीं रविमंडळी असें जाण । निश्चयेंसीं ॥ ४२॥

आणिक वास्तव्य स्थळ द्वारका । कीं हरिकीर्तनीं उभा देखा ।
ऐसे बोलतां यदुनायका । तुळसी देवी आनंदली ॥ ४३॥

इतुके स्थळीं माझी वस्ती । परी तेथें नाहीं सुखनिवृत्ती ।
अखंड तुझें ध्यान चित्तीं । असे देखा ॥ ४४॥

मी सर्वकाळ असें तुजजवळी । ऐसें बोले वनमाळी ।
परिसोनि गोपांगना सकळी । आश्चर्य करिती ॥ ४५॥

मग तुळसीसीं आलिंगुनी । रासक्रीडा खेळे वृंदावनीं ।
सकळ पाहती नयनीं । सर्वजन ॥ ४६॥

सकळ गोपिकां समवेत । क्रीडा करी भगवंत ।
मुरली वाजवी तेणें समस्त । आनंदमय जाहलें ॥ ४७॥

आतां याच समयासीं । यात्रेकरी जाती द्वारकेसीं ।
तेही वृंदावनासीं । नमस्कारासीं पैं जाती ॥ ४८॥

क्रीडा केली भगवंतें । म्हणोनी अवश्य जाती तेथें ।
पुण्यवंत ते दर्शनातें । करिती देखा ॥ ४९॥

अखंड करिती तुळसीचें पूजन । लेती तुळसीकाष्ठाचें भूषण ।
कर्णी कंठी दंडी मनगटी आपण । माळा घालिती देखा ॥ ५०॥

नर अथवा नारी । तीं पुण्यवंत होती शरीरीं ।
त्यांमागें श्रीहरी । अखंड धांवे ॥ ५१॥

जैसी वत्सा कारणें । धेनु धांवे सत्राणें ।
तैसा तुळसीभक्तांसीं नारायण । मागें पुढें सांभाळी ॥ ५२॥

जो असे तुळसीचा भक्त । तो मज प्रिय अत्यंत ।
त्यासीं मजसीं यथार्थ । दुजा अर्थ कांहीं नसे ॥ ५३॥

असो भगवंतासी तुळसी समर्पिल्यावीण । सर्वार्थी अन्न नाहीं भक्षण ।
ऐसा ज्याचा नेम संपूर्ण । त्याची फळश्रुती ऐका ॥ ५४॥

त्यासी विघ्न बाधूं न शके सर्वथा । जैसी बाळकासीं रक्षी माता ।
ऐसा होय रक्षिता । श्रीहरि त्यासीं ॥ ५५॥

भगवंतासीं तुळसी समर्पाविया कारण । पर्णे तोडावीं आपण ।
तोडावयाचा मंत्र पूर्ण । सांगतों तुम्हांसी ॥ ५६॥

मंत्र ।

मोक्षैकहेतोर्धरणिप्रसूते जगत्समस्तं तु गुरोः प्रियाय ते ।
आराधनार्थं द्विदलं भवत्यास्तदामि देवि मम तत्क्षमस्व ॥ ५७॥

यामंत्रे प्रार्थना करून । मग पण तोडावीं आपण ।
तीं समर्पावी हरिकारणें । भावपूर्वक ॥ ५८॥

नखें तोडिल्या पान । तो दीर्घद्वेषी होय आपण ।
बोटेंच करोनी जाण । तुळसीपत्रे तोडावीं ॥ ५९॥

द्वादशीस तोडील तुळसीपर्ण । तो असुरयोनींत जन्मेल जाण ।
म्हणोनी द्वादशीस सर्वथा पर्ण । तोडोंच नये ॥ ६०॥

शाळिग्रामास पर्ण समर्पिल्यावीण । सर्वथा अन्नचि नाहीं भक्षण ।
ऐसा नेम असेल तेणें । काय करावें ॥ ६१॥

ऐसी आशंका घराल चित्तीं । तरी त्याची सांगतों ऐसी युक्ती ।
तेही ऐका निश्चिती । चित्त स्थिर करूनियां ॥ ६२॥

निर्माल्यपत्रे उदकीं धुवोनी । तीं समपीवीं शाळिग्रामा लागुनी ।
परी द्वादशीस तोडों नये । ऐसें पुराणीं बोलिलें आहे ॥ ६३॥

विष्णुरूप शाळिग्राम । दोहीं मध्ये नाहीं मिथ्या भ्रम ।
याकारणें धरोनि प्रेम । तुळसी अर्पण कराव्या ॥ ६४॥

हे जन तारावयासी । तुळसीनें वास्तव्य केलें प्रयागासी ।
तेथें स्नान करील त्यासीं । मोक्ष होय ॥ ६५॥

बिंदुमाधवीं वास तुळसीसीं । तेथें दर्शन होय ज्या प्राणियासीं ।
तो जाईल मोक्षपदासीं । सत्य जाणा ॥ ६६॥

यमलोकींचे पितर । ते स्वर्गवास करिती निरंतर ।
यास्तव तुळसी स्थिर । गयेसीं झाली ॥ ६७॥

स्थिर जाहली असे तेथें । भक्तांचे आगमन इच्छित ।
जे जावोनि दर्शन करिती त्वरित । पूर्वज त्यांचे उद्धरती ॥ ६८॥

ऐसी कथा ऋषीश्वरांसी । सूतें सांगीतली स्वमुखेसीं ।
स्वर्गी इंद्रप्रह्लादांसीं । देवगुरु सांगतसे ॥ ६९॥

तोचि हा सारांश । वक्त्तयानें श्रुत केला श्रोतयांस ।
अगाध महिमा तुलसीचा विशेष । विठ्ठलदास रुद्र म्हणे ॥ ७०॥

इति श्रीस्कन्दपुराणे तुळसीमाहात्म्ये त्रयोदशोऽध्यायः ॥ १३॥

## १४. चतुर्दशोऽध्यायः

श्रीगणेशाय नमः ।
नैमिषारण्यीं सर्व ऋषीश्वर । बैसले असती समग्र ।
त्यांतून मरीचि ऋषीश्वर । सूताप्रती पुसतसे ॥ १॥

तुळसीचें महिमान । परिसाया कारण ।
उदित माझें मन । तरी सांगीतले पाहिजे ॥ २॥

तयाचा परिसोनि आदर । सूत सांगे सविस्तार ।
तंव बोलता झाला सत्वर । गरुड तेव्हां ॥ ३॥

सुतासीं करी विनंती । म्हणे श्रीहरी नारदाप्रती ।
तुळसोमहिमा आपुले मुखोद्गती । सांगता जाहला ॥ ४॥

तें म्यां केलें श्रवण । आज्ञा कराल तरी सांगेन ।
ऐसें परिसोनी जाण । सूतें आज्ञा दीघली ॥ ५॥

मग गरुड मरीचीप्रती । सांगता झाला यथामती ।
जें जें बोलिला होता श्रीपती । स्वमुखें नारदासीं ॥ ६॥

उत्तम करोनि वृंदावन । सहस्त्रावधी रोपें लाउन ।
उदक घालोनि पूजार्चन । नित्य करी ॥ ७॥

त्यासीं घडलें वेदाध्ययन । शास्त्रांचे श्रेय आलें जाण ।
यासीं संशय न धरावा कवणें । ऐसें गरुडें सांगीतलें ॥ ८॥

तुळसीमुळींची मृत्तिका । प्रत्यहीं लाऊनि स्नान करी देखा ।
त्याचीं सप्त कुळें उद्धरती ऐका । निश्चयेंसीं ॥ ९॥

तुळसीच्या तीर्थें स्नान करून । ऐसा नेम जयाचा पूर्ण ।
त्यासीं सर्व तीर्थांचें स्नान । झालें जाणा ॥ १०॥

कर्णीं खोवी तुळसीदळ । तो सदां असे निर्मळ ।
तयाचे अंगीं विटाळ । बाधक न होय ॥ ११॥

तुळसीचे एक पर्ण । जो नित्य करी भक्षण ।
त्याचें सर्व पाप जाय जाण । ऐसें नारायण बोलिले ॥ १२॥

शाळिग्रामासीं तुळसी समर्पिल्या वोण । प्राणांतीं नाहीं करणें भोजन ।
ऐसा नेम जयाचा असेल पूर्ण । त्याची फळश्रुती आइका ॥ १३॥

विमानी बैसवोनि त्यासीं । नेतील वैकुंठभुवनासीं ।
बैस बोले हृषीकेशी । आपुले स्वमुखें ॥ १४॥

अभिषेक करी तुळसीसीं । धूप दीप नैवेद्य समर्पी सद्भावेंसीं ।
मंगळ आरती करी गजरेंसीं । चतुर्मास ॥ १५॥

त्याचे पितर कुंभीपाकांतून निघती । त्यांसीं तात्काळ वैकुंठप्राप्ती ।
पुण्य सरल्या उत्तम योनी जन्मती । सत्य जाण ॥ १६॥

कार्तिक शुद्ध द्वादशीसीं । पूजा करी गजरेंसी ।
हरिकथा करूनी खिरापती सीं । वांटी देखा ॥ १७॥

त्याचें सहस्त्र जन्माचें जाय पाप । लक्ष्मा प्राप्त होय अमूप ।
अंतीं विमानी बैसोनि विष्णुसमीप । जाय देखा ॥ १८॥

अखंड दीप लावी तुळसी जवळी । खंड होऊं नेदी कोणे काळीं ।
तरी त्याचे गृहीं सर्वकाळीं । लक्ष्मी वसे ॥ १९॥

ये विषयीं एक ऐका कथा । श्रवण करावी श्रोता ।
सावधान करूनि चित्ता । पुढील वार्ता ऐकावी ॥ २०॥

लुब्धक नामें एक शुद्र होता । त्याची ऐकाजी कथा ।
तुम्हांप्रती सांगतों आतां । गरुड म्हणे ॥ २१॥

माता पिता असती तयासीं । स्त्रीपुत्र असे त्यासीं ।
बंधुसहित गृहासी । काळक्रमणा करीतसे ॥ २२॥

तो मार्गस्थांचा वधकरी । आणखी उदंड जीव मारी ।

ऐसें नित्य पाप करी । लुब्धक तो ॥ २३॥

ऐसे मारितां दिवस लोटले बहुत । पापाचे पर्वत झाले अपरिमित ।
म्हणोनीयां पाहोनि शास्त्रार्थ । सांगती तया ॥ २४॥

घरचीं अवधीं करिती उपदेश । या कर्मे तुज घड ला बहुत दोष ।
आतां तूं पापकर्मास । प्रवर्त नको ॥ २५॥

ऐसें नित्यानित्य त्यास सांगती । नाइकतां धनुष बाण घेऊनि हातीं ।
नित्य जाय वनाप्रती । लुब्धक तो ॥ २६॥

ऐसें करितां एके दिवशीं । श्वापदे न देखे अरण्यासीं ।
मार्गस्थही न भेटती वाटेसीं । परम चिंतातुर जाहला ॥ २७॥

ऐसा हिंडतां वनांतरीं । क्षुधेनें पीडिला भारी ।
खरसी आली मुखाभीतरीं । प्राण जाऊं पाहतसे ॥ २८॥

तंव अकस्मात देखिलें हरण । अतिसुंदर मनोहर जाण ।
मग हातीं घेऊनि धनुष्य बाण । त्याचे पाठी लागला ॥ २९॥

तो चमकोन गेला तुळसीवनांत । हाही धांवोन गेला तेथ ।
तंव तो गुप्त झाला अकस्मात । तयेवेळीं ॥ ३०॥

तंव लुब्धक प्रवेशला तुळसी वनांत । क्षुधेनें मूर्छित पडिला तेथे ।
मागुती मृग त्वरित । निर्माण झाला ॥ ३१॥

इंद्र देवांसह वर्त्तमान । कौतुक पाहावया आले आपण ।
कनकाचा कैसा आहे हरिण । तो दृष्टां पाहूं ॥ ३२॥

ऐसें झालें त्यास्थळासीं । तव श्रुत झालें यमासीं ।
तेणें आपुलिया भृत्यांसीं । आज्ञा केली ॥ ३३॥

म्हणे तुझीं जावें त्यास्थळासीं । बांधोनि आणा लुब्धकासीं ।
ऐसी आज्ञा दीघली त्यांसीं । यमरायें ॥ ३४॥

ते आले महाभयानक । श्यामवर्ण विक्राळ देख ।
स्थूळपिंगटवर्ण मस्तक । हातीं पाश गोफणी ॥ ३५॥

एकाचे हातीं लोहाचीं मुसळें । एकाचे करीं टोणपे सगळे ।
एक गिळू म्हणती बळें । लुब्धकासीं ॥ ३६॥

ऐसे ते आले त्यास्थळा । परि स्पर्श न करवे त्याला ।
तुळसीवनांत असे पडिला । म्हणोनीयां ॥ ३७॥

परस्परें एकमेकांतें । विचार करूं लागले तेथें ।
आम्हांसीं न धरवे यातें । हा तुळसीवनांत पडिला असे ॥ ३८॥

ऐसा जंव विचार करिती । तंव अंतरी जाणवलें विष्णुप्रती ।
मग विष्णुदूतांसी लक्ष्मीपती । आज्ञा करिता जाहला ॥ ३९॥

लुब्धक पडिला तुळसी वनाप्रती । यमदूत न्यावया आले असती ।
त्यांसीं न धरूं द्यावें हातीं । लुब्धकासीं ॥ ४०॥

युद्धासी सरसावले तरी युद्ध करणें । शिक्षा लावोनि बाहेर घालवणें ।
लुब्धकासीं घेऊन येणें । मजपासीं ॥ ४१॥

जैं तुळसीस्पर्श तेणें केला । तेणेंचि तो माझा परम भक्त झाला ।
ऐसी आज्ञा भृत्यांला । श्रीहरीने केली ॥ ४२॥

मग ते आले विष्णुदूत । तेजोमय लखलखीत ।
अंगकांती झळकत । सूर्यासारिखी ॥ ४३॥

द्वादश टिळे रेखिले असती । तुळसीमाळा गळां शोभती ।
महापुण्यवंत दिसती । श्यामरूपें ॥ ४४॥

गदा चक्र करीं शोभती । दिव्यांबरें परिधान केली असती ।
रत्न मुगुट विराजती । शिरीं देखा ॥ ४५॥

कर्णी कुंडलें देदीप्यमान । ऐसे ते पावले तुळसीभुवन ।
मग यमदूतांप्रती वचन । बोलते झाले ॥ ४६॥

तुम्हांसीं काय कारण यावया येथें । ते म्हणती न्यावया आलों लुब्धकातें ।
परिसोनि त्यांचिया वचनातें । प्रत्युत्तर त्यांसीं देती ॥ ४७॥

विष्णूची आज्ञा आहे ऐसी । यासीं घेऊनि यावें विष्णुलोकासीं ।
तरी तुम्ही जावें आपुल्या स्थळासीं । आम्ही यासीं घेऊनि जाऊं ॥ ४८॥

ते म्हणती यमाची आज्ञा आम्हासीं । यासीं आणावें यमलोकासीं ।
तरी आम्ही नेऊ यासीं । तुम्ही जा आपुले स्थळा ॥ ४९॥

तेथें नेलिया यासीं । निवाडा होय पाप पुण्यासीं ।
मग जें सांगती तें निश्चयेंसीं । भोगणें लागे ॥ ५०॥

विष्णुदूत म्हणती हें बोलतां वाउगें । तुझीं जावें आलिया मार्गें ।
युद्ध करणें असेल याप्रसंगें । तरी सुखें करावें ॥ ५१॥

ऐसें त्यांचें निष्ठुर बोलणें । ऐकोनि विचार करिती आपण ।
यांसीं युद्ध करितां संपूर्ण । पराभवती आम्हांसीं ॥ ५२॥

ऐसा विचार करोनि त्यांहीं । मग गंतव्य केलें पाही ।
यमाजवळी जाऊनि ते समयीं । सकळ वृत्तांत श्रुत केला ॥ ५३॥

यमदूत विष्णुदूतांचें भाषण । लुब्धकें केलें श्रवण ।
म्हणे धन्य भाग्य माझें पूर्ण । भगवंतें अंगिकारिलें ॥ ५४॥

म्यां कुटुंबाकारणें । नाना कर्मे केली जाण ।
शेवटीं लागलें भोगणें । माझें मज ॥ ५५॥

कोणाच्या रांडा कोणाची पोरें । पुण्यपाप भोगिलें शरीरें ।
बरोबर कोणी नये हें तों खरें । दिसताहे ॥ ५६॥

अंतीं कोणी कोणासीं । सर्वथा न येती कार्यासीं ।
धिग धिग म्यां जन्मासी । व्यर्थ गमाविलें ॥ ५७॥

म्यां आयुष्य व्यर्थ गमाविलें । सर्वथा नाहीं हरिभजन केलें ।
ऐसें अनुतापें ज्ञान झालें । तुळसीच्या प्रसादें ॥ ५८॥

मग स्मरता जाहला श्रीहरीसीं । तंव विष्णुदूतें नेलें त्यासीं ।
नेऊनि विष्णुभुवनासी । श्रीविष्णूस भेटविला ॥ ५९॥

त्यासीं ठेविलें आपणापासीं । कृपाळु झाला ऋषीकेशी ।
हे कथा मरीची ऋषीश्वरांसी । गरुडें सांगीतली ॥ ६०॥

स्वर्गीं इंद्र प्रह्लादांसीं । बृहस्पती सांगे उभयतांसी ।
कथा सांगीतली ऐसी । तुळसीमाहात्म्याची ॥ ६१॥

तोचि संवाद श्रोतयांसीं हर्षे । वक्त्यानें सांगीतला उल्हासें ।
विकल्प न धरावा मानसें । विठ्ठलदास रुद्र म्हणे ॥ ६२॥

इति श्रीस्कन्दपुराणे तुळसीमाहात्म्ये चतुर्दशोऽध्यायः ॥ १४॥

# १५. पञ्चदशोऽध्यायः

श्रीगणेशाय नमः ।
मागुती मरीची ऋषीश्वरांसीं । गरुड सांगता झाला तुळसीमाहात्म्यासीं ।
म्हणे कथा सांगतों तुम्हापासीं । ते ऐका आतां ॥ १॥

मागें सांगीत दें । लुब्धकाच्या कथेसीं ।
तो परम पुण्यवंत जाहला परियेसीं । त्याचे झालिया दर्शनसीं । पापी पुनीत होती ॥ २॥

याउपरी एके समयासीं । दुर्वास देवें शापिलें इंद्रासीं ।
तो भयभीत होऊनि मानसीं । कांपों लागला ॥ ३॥

बहुत भाकोनि काकुळती । उःशाप मागे दुर्वासाप्रती ।
तेव्हां दुर्वास उःशाप त्याप्रती । देता जाहला ॥ ४॥

म्हणे समुद्राचे होईल मंथन । त्यांतून निघतील चतुर्दश रत्ने ।
त्यांतून तुज प्राप्त होईल तेणें निरसन । याशापाचे होईल ॥ ५॥

यास्तव केलें समुद्रमंथन । त्यांतून काढिलीं चतुर्दश रत्नें ।
त्यांचा विभाग संपूर्ण । द्वादशाध्यायीं कथियेला ॥ ६॥

पांच प्राप्त झाली इंद्रासीं । उःशाप घडला त्यासीं ।
विष्णु परम झाला संतोषी । लक्ष्मी प्राप्त जाहली ॥ ७॥

मग अति प्रेमें ते अवसरीं । आसवें आलीं नेत्राबाहेरी ।
त्यांतून निघाली झडकरी । तुळसी देवी ॥ ८॥

हे पूर्वी । सांगीतली कथा ।
मागिले अध्यायीं तत्त्वतां । समयानुसार आतां । किंचित सांगीतलें ॥ ९॥

मग तेच अवसरीं । विष्णूनें बैसविली मांडीवरी ।
समुद्रांतील अमृतकुंभभरी । विभागासीं ठेविलें होतें ॥ १०॥

त्यांतून बिंदुपडिला तुळसीवरी । म्हणोनी अमर झाली पुरो ।
ऐसें ग्रंथांतरीं । सांगीतलें आहे ॥ ११॥

नित्य विष्णूस अर्पी तुळसीपर्ण । तो पुरुष देवांसीं वंद्य जाण ।
सर्व देव त्याचे दर्शन करून । तृप्त होती ॥ १२॥

तुळसीकाष्ठ उगाळून । विष्णूसी समर्पी जाण ।

तरी त्याच्या हृदयीं नारायण । निरंतर राहे ॥ १३॥

श्राद्धीं करितां भोजन । तुळसीमाहात्म्य होय श्रवण ।
तरी त्याचे पितृगण । वैकुंठासी गेले ॥ १४॥

ऐका ब्राह्मणाची कथा । ते सांगतों आतां ।
श्रवण करा एकात्मता । एकचित्तें करोनी ॥ १५॥

वरमेधा सुमेधा ब्राह्मण । हे उभयतां बंधु असती जाण ।
वरमेधा ज्येष्ठ आपण । कनिष्ठ तो सुमेधा पैं । ॥ १६॥

परम पवित्र उभयतां । वेदाध्ययनीं तत्त्वतां ।
शास्त्राची संपूर्णता । दोषांसीं असे ॥ १७॥

त्यांसीं द्रव्य असे अपार । मग करिते झाले उभयतां विचार ।
नाशिवंत हैं शरीर । सारासार साधावा ॥ १८॥

ऐसें विचारूनि मानसीं । मग निघते झाले तीर्थयात्रेसीं ।
प्रदक्षिणा करूनि तीर्थासीं । उत्तरदेशी पातले ॥ १९॥

जातां जातां उत्तरदिशेसीं । कांतारवन देखिलें दृष्टीसीं ।
मग प्रवेश केला तया समयासीं । वनामाजी ॥ २०॥

तेथें तुळसीवन असे सुंदर । देखोनि संतोषले द्विजवर ।
मग सांष्टांग केला नमस्कार । उभयतांनीं ॥ २१॥

तंव समीप असे वटवृक्ष एक । तो महाविस्तीर्ण सुंदर देख ।
त्यासीं देखून परम हरिख । दोघे विप्र पावले ॥ २२॥

तंव ज्येष्ठ म्हणे कनिष्ठासीं । आली श्रमन आलों यावनासीं ।
विश्रांती पावलों या स्थळासी । तुळसीवन देखनी ॥ २३॥

धन्य धन्य आमुचें पुण्य । दृष्टीं देखिलें तुळसीवन ।
ऐसें बोलोनियां अनुष्ठान । तुळसीचें करिते झाले ॥ २४॥

चातुमासपर्यंत । पूजन अर्चन केलें तेथें ।
जप तप सदोदित । करितसे तुळसीपासीं ॥ २५॥

अनुष्ठानाचें अगाध झालें पुण्य । मग विष्णूने पाठविलें विमान ।
दिव्यांबरें वस्त्रे भूषण । त्यांसीं पाठविलीं ॥ २६॥

तेजोमय कल्लोळी । विमान उतरलें भूमंडळीं ।
विष्णुदूत तये वेळीं । बोलते झाले ॥ २७॥

तुम्ही केलें तुळसीचें अनुष्ठान । म्हणोनि प्रसन्न झाले नारायण ।
दिव्यांबरे आणि विमान । तुम्हांकारणें पाठविलें ॥ २८॥

तरी हीं अळंकार भूषणें । दिव्यांबरे करा परिधान ।
ऐसें बोलूनियां आपण । पुढे ठेविते झाले ॥ २९॥

मग त्यांसीं करोनि नमस्कार । आपण लेइले अळंकार ।
वस्त्रे परिधान करूनी सत्वर । विमानीं बैसते झाले ॥ ३०॥

तात्काळ विमान गेलें विष्णुभुवनासीं । मग उतरोनि चरण चालीसीं ।
येते झाले हरीपासीं । तेसमयीं ॥ ३१॥

चतुर्भुज पीतांबरधारी । रत्नजडीत मुगुट शिरीं ।
वैजयंती शोभे हृदयावरी । भगवंताच्या ॥ ३२॥

सुनीळ नीळाचा गाभा । कोटिसूर्याच्या सारखी प्रभा ।
त्याप्रकाशें अतिशोभा । दश दिशा उजळल्या ॥ ३३॥

शंख चक्र गदा शोभती । ऐसा दुरी देखिला लक्ष्मीपती ।
राही रुक्मिणी समस्ती । उभ्या दोनी भागीं ॥ ३४॥

सत्यभामा चवरें ढाळी । नारद विणा वाजवी जवळीं ।
ऐसा देखिला वनमाळी । उभयतांनीं ॥ ३५॥

मग साष्टांग घातला नमस्कार । स्तुति करिती अपार ।
मग आपला समाचार । वरमेधा श्रुत करी ॥ ३६॥

म्हणे मज पूर्वी ब्रह्महत्या घडली होती । यास्तव गेलों सर्पयोनीप्रती ।
इंद्रांचे आनंदवनांत वस्ती । म्यां धरली होती ॥ ३७॥

त्यावनीं देवांगना नृत्य करिती । त्यास लुब्ध होय मी चित्तीं ।
ऐसे कित्येक दिवस त्या स्थळाप्रती । म्यां कर्मिले जाण ॥ ३८॥

तंव एके दिवसीं अकस्मात । लोमहर्षण आला तेथें ।
त्यानें देखोनियां मातें । वन दग्ध केलें ॥ ३९॥

मग मी अग्निसंगें जळालों । सर्वेचि ब्रह्मराक्षस झालों ।
एका वृक्षावरी असें बैसलों । रात्रंदिवस ॥ ४०॥

ऐसे क्रमिले दिवस बहुत । तंव तेथें लोमहर्ष आले अकस्मात ।
त्यांसीं देखोनियां त्वरित । मस्तक चरणीं ठेविला ॥ ४१॥

कींव भाकि ली बहुत । मग ते झाले कृपावंत ।
आतां ब्राह्मण जन्म पावसी नेमस्त । येथून सुटका झाली तुझी ॥ ४२॥

तुज सांग घडेल वेदाध्ययन । तूं होसी शास्त्रज्ञ संपूर्ण ।
द्रव्यवंत बहुत होसी जाण । चिंता न करीं ॥ ४३॥

प्रपंचीं भोगिसौ सुख । मग तीर्थयात्रा करिसी देख ।
मग तुळसीवन देखसी एक । अपूर्व नयनीं ॥ ४४॥

तेथे करसील तुळसीचें अनुष्ठान । तेणें प्रसन्न होईल नारायण ।
श्रीहरी दाखवील आपुले चरण । तैं तुझें गमन खुंटेल ॥ ४५॥

ऐसें बोलिला कृपामूर्ती । तेंचि जालें निभ्रांती ।
आणि तुझे चरण लक्ष्मीपती । म्यां देखिले ॥ ४६॥

ऐसें सांगोनि तेसमंई । साष्टांग नमस्कार केला पाही ।
हरी म्हणे आतां चिंता कांहीं । न करा तुझी ॥ ४७॥

तुळसीचें अनुष्ठान । तुम्हां अगाध जोडलें पुण्य ।
आतां मज सन्निध राहोन । आनंद करीं ॥ ४८॥

तुळसीप्रसादें करून । ब्राह्मण झाले परम पावन ।
श्रीहरीनें वैकुंठीं नेऊन । अक्षय पदीं स्थापिले ॥ ४९॥

ऐसी कथा मरीचीऋषीपासीं । गरुडें सांगीतली त्या समयासीं ।
ऐकोनियां सर्वांसी । समाधान जाहलें ॥ ५०॥

प्रथमाध्यायीं मंगलाचरण । तुळसीकाष्ठाचे गंध उगाळून ।
करावें श्रीविष्णुपूजन । ब्राह्मण संतर्पण सांगीतलें ॥ ५१॥

तुळसी खुडावयाची युक्ती । दूर्वा वाहावयाची प्रमाणोक्ती ।
सर्वदेवांच्या अनुष्ठानाची प्रचीती । सांगीतली द्वितीयाध्यायीं ॥ ५२॥

दशरथानें केलें अनुष्ठान । तुळसी झाली सुप्रसन्न ।
चौघे पुत्र तयातें देऊन । तृतीयाध्याय संपविला ॥ ५३॥

चौथे अध्यायाचे अंतीं चरित्र । सोळा नामें सांगीतलीं परिकर ।

पातकी पौंडरीकाचा करूनि उद्धार । वैकुंठपदीं स्थापिला ॥ ५४॥

दोष घडला पार्वतीस । कौंतेया ब्राह्मणाचे सांगोनि चरित्रास ।
तुळसीनें स्वस्थळाप्रति पाठविली तीस । हेचि कथा पांचव्यांत ॥ ५५॥

साहवे अध्यायाचे अंतीं कथा । बह्मयास झाली शापमुक्तता ।
सुमालिनी झाली पुत्रवंती तत्वता । तिच्या चरित्रा वर्णिलें ॥ ५६॥

सप्तमाध्यायीं कथा सुरस । राजे आणि ऋषि आले स्वयंवरास ।
देवसेनेसी दाखऊनि श्वेतद्वीपास । तिच्या मनोरथास पुरविलें ॥ ५७॥

आठवे अध्यायीं कथन । उदयनराजा राणी सुशीळा जाण ।
तयाचें वार्धक्य जाऊन । पुत्रवंती जाहली ॥ ५८॥

समस्त ऋषि स्कंदासीं शरण येत । शिववरदें अनुष्ठान करित ।
मंत्रसिद्धी सांगोनि तारका वधित । हेंचि वदत नवमाध्यायीं ॥ ५९॥

कृष्णजोशी ज्ञान कर्महीन । तुळसीप्रसादें झाला पडशास्त्री निपुण ।
यमदूत पुण्याचा लक्षांश गेले मागोन । दशमाध्यायी हेचि कथा ॥ ६०॥

एकादशाध्यायीं कथा विशेष । श्रीहरी सांगती नारदास ।
पूजाविधि मंत्रयुक्त सुरस । तुळसीची सांगीतली ॥ ६१॥

द्वादशाध्यायी कथा प्रसिद्ध । समुद्रमंथनीं चौदा रत्लें काढिलीं अभेद ।
प्रेमोदकें तुळसी उत्पत्ति सांगीतली सुबद्ध । वरदान युक्त तेधवां ॥ ६२॥

त्रयोदशाध्यायीं निरोपण कृष्णे केलें अनुष्ठान । द्वारकेंत रासक्रीडा खेळोन ।
तेथून प्रयागस्थळीं । राहिली ॥ ६३॥

चतुर्दशाध्यायीं कथन । मनोहर मृत्तिका आख्यान ।
पातकी लुब्धक तुळसीनें उद्धरोन । वैकुंठभुवनीं पाठविला ॥ ६४॥

इंद्रास घडतां शाप दारुण । चतुर्दश रत्नें विभागें झालें शापमोचन ।
वरमेधा सुमेधा वैकंठीं स्थापून । पंचदशाध्याय संपविला ॥ ६५॥

हे पंधरा अन्न ध्याय तुळसीमाहात्म्य । केवळ पंधरा खणांचे मंदिर परम ।
यांत तुळसीसहित पुरुषोत्तम । घवघवित विराजे ॥ ६६॥

सद्भावें करितां पूजन अर्चन । संतोषोनी जनार्दन ।
चिंतिलें फळ प्राप्त करून । शेवटीं अक्षय फळ प्राप्त करी ॥ ६७॥

वक्ता विनवी श्रोतयांस । तुळसी माहात्म्य ऐसें असे ।
श्रवणें महापातकांचा होय नाश । विठ्ठलदास रुद्र म्हणे ॥ ६८॥

येथूनि तुळसीमाहात्म्य झालें संपूर्ण । लिहून केलें कृष्णार्पण ।
भक्तांसी तारी श्रीनारायण । परमात्मा श्रीहरी ॥ ६९॥

इति श्रीस्कंदपुराणे । तुळसीमाहात्म्यकथने ।
ऋषिसंवादपरिसणें । पंचदशोऽध्याय गोड हा ॥ ७०॥

इति श्रीस्कन्दपुराणे तुळसीमाहात्म्यकथने ऋषिसंवादपरिसणें पञ्चदशोऽध्यायः ॥ १५॥

॥ समाप्तोऽयं ग्रंथः ॥

Encoded by Rushikesh Ghatole

Proofread by Rushikesh Ghatole, Mandar Puranik

*Tulasi Mahatmyam Marathi*

pdf was typeset on July 14, 2026

Please send corrections to *sanskrit@cheerful.com*